७१२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

RFFBK-0003560

ग. सं. ठाणे

# धरण-संजीवनी.

भा. १ ला.

प्रकाशक.

## ग. दा. सावरकर.

झानें
तयार करण्
दमा, खोक
अजीर्ण, अ
कंठ
वा
नि

याचे
लागते,
लागते ... निजते
लागते व
...
खेड्यांतसुद्धां
फार खर्चाचें
सव आप-

शके १८५०. सन १९२८

श्रद्धानंद कार्यालय, मुंबअी.

# 'झेनिथ' द्राक्षासव

**झेनिथ द्राक्षासव** प्रसिद्ध आयुर्वेदिक पद्धतीनें सशास्त्र तयार करण्यांत आलें आहे. याचे सेवनानें क्षयाची प्रथमावस्था, दमा, खोकला वगैरे छातीचे विकार, सर्दी पडसें, अरुचि, अजीर्ण, अपचन, बद्धकोष्ठ, आंवट ढेंकर येणें, आम्लपित्त, वांती, कंठरोग वगैरे साफ बरे होतात. लहान मुलांच्या डांग्या खोकल्या-वर याचा चांगला उपयोग होतो. हें घेण्यास स्वादिष्ट असून याचे नियमित सेवनानें शोचास साफ होऊन सणसणीत भूक लागते, पचनक्रिया सुधारते व अन्न रुचीनें जाऊं लागतें. रात्रीं निजते वेळीं **झेनिथ द्राक्षासव** घेतल्यानें झोंप चांगली लागते व सकाळीं उठल्यानंतर काम करण्यास हुरूप व तरतरी वाटते.

" **झेनिथ** ... व खेड्यांतसुद्धां प्रत्येक दुकानीं ... फार खर्चाचें होतें, तरी आ... **द्राक्षासव** आप-लेच गांवीं घेणें ...

१॥ पौंडाची किंमत १ रु. १२ आणे. १ पौंडाची १। रु. व अर्ध्या पौंडाची १२ आणे. प्यार्किंग व व्ही. पी. खर्च निराळा.

**दि झेनिथ केमिकल वर्क्स,**
**अरब बिल्डिंग, मुंबई नं. २.**


RFFBK-0003560
३५६०


# यशासाठीं रोज एक पै

तुमचा आत्मविश्वास जागा करून पैसा कमाविण्याचे अचुक मार्ग दाखविणारें—

किर्लोस्कर खबर हेंच एक मासिक महाराष्ट्रांत आहे. खबरच्या वाचनानें स्वतः-चा उत्कर्ष करून घेतल्याबद्दल असंख्य प्रशंसापत्रें आलीं आहेत. वा. वर्गणी २ रु. व्ही. पी. नें २। रु.



**किर्लोस्कर खबर, किर्लोस्करवाडी, (सातारा)**



मजबूत व टिकाऊ
बरोबर वेळ दाखविणारें
सुबक घड्याळ वापरा

**रेल्वे रेग्युलेटर**

सेकंड काट्यासह घरपोंच किं. ३।।.

या शिवाय इतर सर्व प्रकारचीं घड्याळें माफक किंमतीत मिळतील.

मिळण्याचें एकच ठिकाण

**राजपुरा एजन्सी, मुंबई नं. ४**

---

# इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स

करितां:—

बी. एल. ठोसर, पब्लिक अकौंटंट
यांचाच सल्ला घ्या.

पत्ता:—४९५-९७, काळबादेवीरोड,

टे. नं. २२९९७. मुंबई, नं. २.

सुधारून वाढविलेली

लेखक

प्राचीन व अर्वाचीन इतिहास

एकंदर ४३ प्रकरणांचे हृदयंगम विवेचन

पृष्ठसंख्या ४२०

आर्ट पेपरवरील तीनरंगी चित्रें ५

विद्वान लेखकांचे उत्कृष्ट अभिप्रायः—रा. ब. महाजनी, रा. पी. व्ही. काणे M. A. L. L. M., श्री. काशीबाई कानिटकर, सर नारायण चंदावरकर, प्रो. भानू, वे. शा. गणेश शर्मा, रा. न. चिं. केळकर व श्री. ईश्वरदास मश्रूवाला B.A. इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

रा. रा. वासुदेव गोविंद आपटे B.A. या सुप्रसिद्ध साहित्यसेवकानें लिहिलेली भारदस्त प्रस्तावना.

संस्कृतीचा साधार इतिहास

सुबक कापडी बांधणी

सं. नि. ५५

हिंदु

# संघटण—संजीवनी.

भा. १ ला.

प्रकाशक,

ग. दा. सावरकर.

शके १८५०.

सन १९२८

श्रद्धानंद कार्यालय, मुंबई.

मूल्य २॥ आणे.

सं.नि.२८८

# प्रास्ताविक दोन शब्द.

श्रद्धानंद पत्रांतील शुद्धिसंघटनविषयक लेख अनेकांस फार आवडले व ते संकलित करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्यास प्रचार-कार्यास त्यांचा चांगला उपयोग होईल असें आम्हांस लेखी वा तोंडी कळवून हें काम लवकर हातीं घेण्याविषयीं आम्हांस कांहीं गृहस्थांनीं प्रेमपूर्वक आग्रहाची विनंति केली. त्यांच्या या स्नेहपूर्ण आग्रहामुळेंच ही पुस्तिका इतक्या लवकर आमच्या हातून प्रका-शित होत असल्यानें, ही हिंदु 'संघटन–संजीवनी' हिंदु जन-तेच्या चरणीं सादर करण्याच्या या शुभसमयीं, उल्लेखित गृहस्थांचे आमच्याप्रमाणें वाचकांनींहि आभार मानणें अवश्य होय.

प्रचाराच्या दृष्टीनें या पुस्तकाचें मोल शक्य तितकें कमी ठेवावयाचें असा आमचा प्रथमपासून मनोदय असल्यानें, पुस्तक लहानसेंच–फार तर १०० पृष्ठांचें–करावें, असा आमचा विचार होता. पण लेखांची निवड करूं लागल्यानंतर, बरेच लेख, त्यांतील महत्त्वपूर्ण विचारांमुळें, प्रस्तुत पुस्तकांत घेतल्या-विना आमच्यानें राहावेना. तरी पण पृष्ठसंख्या १५० वर गेल्यानें कांहीं लेख, मनापुढून दूर होत नसतांहि, निरुपायामुळें सोडून देणें भाग पडलें. तसेंच संघटणविषयक अेक कार्यक्रमहि प्रस्तुत पुस्तकांत देण्याचा आमचा विचार होता. कारण जेथें जेथें

 [redacted]

‘ हिंदु सभा ’ स्थापन होतात तेथें तेथें ‘ कार्य काय ’ असा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहतो आणि या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देण्यावर संघटन कार्याचें यश बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. पण हाहि विचार स्थलसंकोचास्तव स्थगित करणें प्राप्त झालें. तथापि आमची ही नम्र सेवा हिंदु जनतेला मान्य झाल्यास, प्रस्तुत पुस्तकाच्या पुढील आवृत्तींत वा अन्य पुस्तकाच्या द्वारा संघटन कार्यक्रम इतर लेखांसह जनतेस सादर करण्याचा आमचा विचार आहे. हिंदुसंघटनाची अभिमानी देवता हा आमचा विचार सफल करो !

प्रकाशक

# हिंदूंचें एकतागान.

[ चाल—तूं टाक चिरुनि ही मान ]

तुम्हि आम्ही सकल हिंदू । बंधु-बंधु ॥
तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदूं ॥ ध्रु० ॥
ब्राह्मण वा क्षत्रिय चांग । जरि झाला ॥
कसलेंहि रूप वा रंग । जरि त्याला ॥
तो महार अथवा मांग । सकलांला ॥
ही एकच आई ' हिंदु जाति ' आम्हांस तिला वंदूं ॥ १ ॥
एकचि देश हा अपुल्या । प्रेमाचा ॥
एकचि छंद जीवाच्या । कवनाचा ॥
एकचि धर्म हा आम्हां । सकलांच ॥
ही हिंदु जातिची गंगा आम्ही तिचे सकल बिंदू ॥ २ ॥
रघुवीर रामचंद्राचा । जो भक्त ॥
गोविंद-पदांबुजिं जो जो । अनुरक्त ॥
गीतेस गाउनी पूजी । भगवंत ॥
तो हिंदुधर्म-नौकेंत बसुनियां तरतो भवसिंधु ॥ ३ ॥
उभयांनिं दोष उभयांचे । खोडावे ॥
दुपासि दुष्ट रूढीसी । सोडावें ॥
सख्यासि आइच्यासाठीं । जोडावें ॥
अम्हि अपराधांसि विसरुनि, प्रेमा पुन्हां पुन्हां सांधूं ॥ ४ ॥
लेंकुरें हिंदु जातीचीं । हीं आम्हीं ॥
आमुच्या हिंदु धर्मासी । त्या कामीं ॥
प्राणही देउनी रक्षूं । परिणामीं ॥
या झेंड्याखालीं पूर्वजांचिया एकाची नांदूं ॥ ५ ॥

—वि. सावरकर.

# ' हिंदु ' शब्दाची व्याख्या.

( श्रद्धानंद ता. २८।७।२७ )

आसिंधुसिन्धुपर्यंता यस्य भारतभूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥

पुण्यास अर्धसरकारी रीतीनें एक नवीन निर्बंध करण्याचा घाट घातला जात असून त्यांत जैनांनाहि पंजाबांतील शीख लोकांप्रमाणेंच " हिंदु " समाजांतून फोडून निराळा समाज करण्याच्या धोरणाचें विषबीज पेरिलें जात आहे, हें पाहून तत्रस्थ सर्व हिंदुसमाज त्याविरुद्ध प्रतिवाद करूं निघाला आहे. हिंदूंची सांघटनिक शक्ति वृद्धिंगत होण्याचे आधींच तिला हाणून पाडण्यासाठीं, या नाहीं त्या रूपानें, हिन्दु म्हणून आजपर्यंत सर्व जग ज्यांस मानीत आलें आणि जे स्वतःहि आजपर्यंत आपणास हिंदु म्हणूनच म्हणवीत आले अशा समाजांस हिंदु संघांतून फोडून टाकण्याचे प्रयत्न वारंवार आणि निरनिराळ्या रूपानें अहिंदु लोकांनीं करूं लागावें हें साहजिकच आहे. त्या त्यांच्या प्रयत्नांस आरंभींच तीव्र विरोध करण्याचें आपणा हिंदूंचें कर्तव्य पुण्याच्या जागरूक जनतेनें तात्काल आरंभिलें, याविषयीं त्यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करितों. त्यांतहि ज्या जैनांस अहिंदुवर्गांत ढकलण्याचा वरील दुष्ट निर्बंधाचा हेतु आहे त्या आमच्या धर्मबंधु जैनांनींहि त्या वर्गीकरणाचा, तें स्वतःच्या जातीचा उपमर्दच आहे असें समजून, निषेध केला आहे ही तर अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

परंतु येतां जातां हिंदूमधील या किंवा त्या पंथास फोडून त्याचें अहिंदु म्हणून वर्गीकरण करण्याचे प्रयत्न करण्यास विपक्ष कां धजतो, याचें मूळ शोधून त्यासच खचो केल्यावांचून आपणां हिंदूमागचा हा ससेमिरा कधींहि सुटणार नाहीं. मागें शीख लोक हिंदु नाहींत हें त्यांच्या मनांत भरवून देण्याचा विपक्षानें इतका अट्टाहास केला कीं, शेवटीं कांहीं शीख तरी त्या आमिषाला बळी पडून स्वतःला एक नवीनच जाति समजूं लागले. कारण शीख हिंदु नाहींत ही कोल्हेकुई विपक्षानें सुरू करतांच त्यास निरुत्तर करण्यासारखें उत्तर चटकन् आपणा हिंदूंसच देतां आलें नाहीं ! जों जों अनेक विद्वान् हिंदु पुढारी शीख हिंदु कां आहेत, याची चर्चा करूं लागले, तों तों त्यांच्या त्यांच्यांतच इतकें मतवैचित्र्य दिसून येऊं लागलें कीं, विपक्षाच्या कोटिक्रमापेक्षां या समर्थकांच्या कोटिक्रमानेंच शीख लोकांतील कित्येक प्रज्ञाहीन आणि अल्पशिक्षित लोकांचा, आपण खरोखरच हिंदु नाहीं असा विकृत समज होऊं लागला. कोणी म्हणाले, "वेद मानील तो हिंदु." शीखांत अनेक म्हणाले, "पण आम्हीं एक गुरुग्रंथ तेवढा मानितों." कोणी म्हणे, "गोभक्त तो हिंदु." कोणी म्हणतो, शेंडी ठेवतो तो : कोणी म्हणे मूर्तिपूजा करितो तो : अगदीं आधुनिक विद्वान् म्हणाले, जो हिंदु निर्बंध—हिंदु कायदा—मानितो तो. पण विपक्षाच्या फुसलावणीनें शीखांच्या लग्नासारख्या महत्त्वाच्या संस्कारास हिंदु निर्बंधाहून अन्य स्वरूप देणाऱ्या आनंदविवाहाचा निर्बंध शीखांनीं ठरवून घेतला. असा सगळा घोंटाळा उडाला. कारण

शीख 'हिंदु' कां हें कोणालाच नक्की सांगतां येईना. तेव्हां शेवटीं जो स्वतःला 'हिंदु' म्हणेल तो हिंदु, या अत्यंत ढिल्या, धरसोडीच्या आणि अगदीं निरुपाय होईल तरच आणि तेथेंच स्वीकार्य अशा चालूचलाऊ उत्तरावर सर्वांना बळबळें समाधान मानून घ्यावें लागलें. जी स्थिति मागें शीखांची झाली, तीच जैनांची होणार, बौद्धांची होणार, आर्यसमाजाची होतच होती; पण थोडक्यांत बचावलें! प्रत्येक दहाव्या वर्षी सरकारी जन-गणनेंत (सेंसस) हिंदु गटांतून जातीमागून जाती भराभर फोडल्या जात आहेत त्या याच घोटाळ्याचे पायीं होत.

या सगळ्या घोटाळ्याचें मुख्य कारण हें होय कीं, आपण हिंदूंनीं हिंदुत्वाची पक्की व्याख्या ठरवून ती सरकारासुद्धां सगळ्या विपक्षांच्या तोंडावर अजून फेंकून दिली नाहीं. शीखांच्या प्रकरणांत वेद मानील तो हिंदु असा हट्ट धरल्यानें त्यांच्यांतील कांहीं अज्ञ लोक बिथरले आणि गुरू ग्रंथास दुय्यम स्थान देण्याचा हा ब्राह्मणी कावा आहे असें म्हणून हिंदुत्वापासून दूर रहाणें बरें असें म्हणूं लागले. मूर्तिपूजा आणि पुराणें मानणें म्हणजे हिंदुधर्म अशी भलतीच व्याख्या केल्यानें आर्य समाज एकदां अगदीं बंड करण्याच्या बेतांत येऊन, आम्ही आर्य-हिंदु नाहीं म्हणून म्हणूं लागला होता. हिंदुत्वाच्या वरच्यासारख्या, आंशिकतः सत्य असल्या तरी सर्वग्राही आणि सर्वंकष नसणाऱ्या व्याख्या केल्यानें हा घोटाळा माजला.

आतांहि जैन हिंदु कां, हें आपणांस चटकन एकमुखानें आणि निश्चितपणें जर सांगतां आलें नाहीं, तर विपक्षाची हातचलाखी थोडीबहुत तरी यशस्वी झाल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून नुसता निषेध करून भागावयाचें नाहीं. वारंवार फणा वर काढून डसावयास धावूं पहाणाऱ्या या विपक्षाच्या कूटनीतीचें डोकें एकदांचें पूर्णपणें ठेचल्यावांचून प्रत्येक जनगणतीच्या वेळीं आपल्या हिंदुसमाजांतून गटामागून गट अहिंदुवर्गांत जे शिरकावले जातात त्यास आळा बसणार नाहीं.

एतदर्थ आपण आतां हिंदुधर्माची नव्हे तर हिंदुजातीची—एक निश्चित आणि सर्वकष असूनहि अतिव्याप्त न होणारी व्याख्या, त्या धर्माचा ध्येयविषय जो परमेश्वर, त्याच्याप्रमाणेच अव्याख्येय आहे. त्या वादांत कोणीच पडूं नये. अव्याख्येयता एवढीच हिंदूधर्माची तात्विक व्याख्या आहे. आणखी त्याची दुसरी जी एक व्यावहारिक व्याख्या करतां येण्यासारखी आहे, ती हिंदु जातीच्या व्याख्येवरच अवलंबून असणार. एतदर्थ मुख्यतः या हिंदु जातीची, हिंदुत्वाच्या राष्ट्रीय स्वरूपाची व्याख्याच निश्चित करणें अवश्य आहे आणि शक्यहि आहे. हा विषय वॅ. सावरकर यांनीं ' हिंदुत्व ' नामक इंग्रजी पुस्तकांत आणि त्याच्या मराठी भाषांतरांत * प्रमुखपणें विशद केलेलाच आहे. आणि आजपर्यंत हिंदुत्वाची व्याख्या करण्याचे जे शेकडों प्रयत्न झाले त्या

* दोन्ही पुस्तकें व्यवस्थापक, 'श्रद्धानंद' मुंबई क्रमांक ४, या पत्त्यावर मिळतात.

सर्वांचा मथितार्थ काढून त्या पुस्तकांत हिंदुत्वाची व्याख्या ठरविलेली आहे. तिला हिंदुसंघटनाच्या बहुतेक पुरस्कर्त्यांनीं व्यक्तिशः संमत केली आहे. त्या व्याख्येच्या पायावरच महाराष्ट्रांतील नागपूर, पुणें, नाशिक, रत्नागिरी इत्यादि अनेक प्रमुख हिंदु सभांनीं आपली प्रतिष्ठापना केलेली आहे. आणि महाराष्ट्राबाहेर तर आर्यसमाजाच्या प्रमुखांनीं आणि शिखांतील अनेक विचारी गृहस्थांनीं त्या व्याख्येविषयीं पूर्ण आनुकूल्य प्रकट केलें आहे.

कारण आजच्या परिस्थितींत तरी या व्याख्येइतकी निःसंदिग्धपणें "हिंदु कोण" या प्रश्नाचें जातीयदृष्ट्या अवश्य तितकें सुस्पष्ट उत्तर देणारें दुसरें साधन आपणापाशीं नाहीं. ती व्याख्या म्हणजे—

आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥

ही होय. ज्याची ज्याची हिंदुस्थान ही पितृभूमि आणि पुण्यभूमि ( धर्मभूमिः ज्या भूमींत त्याचे धर्मसंस्थापक उत्पन्न झाले ती भूमि ) आहे, तो हिंदु. या व्याख्येची विस्तृत चर्चा 'हिंदुत्व' पुस्तकांत वॅ. सावरकर यांनीं केलेलीच आहे. येथें नुसतें इतकें सांगितलें तरी पुरे आहे कीं, या दोन शब्दांनीं हिंदु समाज अहिंदु समाजापासून, चिरा काढून काढावा तसा, भिन्नपणें सुस्पष्ट रीतीनें विलग करितां येतो. मोठे बिकट, वादाविवादग्रस्त प्रश्न दोन आकड्यांत सुटतात. शीख हिंदु आहेत का ? अर्थात्;

कारण त्यांची पितृभूमि हिंदुस्थान आहे. कारण त्यांचे धर्मसंस्थापक गुरु नानक देवादि दश गुरू या हिंदुस्थानांत या हिंदूंच्या पोटींच जन्मले आणि धर्म स्थापिते झाले. ज्याची पितृभू आणि पुण्यभू भारतवर्ष आहे तो हिंदु. जैन ? त्यांची पितृभूमि कोणती ? प्रत्येक जैन म्हणणारच, भारत ! त्यांची धर्मीयभू–धर्मस्थापना केलेली त्यांची धर्मभू कोणची ? प्रत्येक जैन म्हणणारच, हें भारत– येथें वृषभ देवापासून महावीरपर्यंत सर्व तीर्थंकर निवसत होते ! तर मग जैन ' हिंदु ' आहेतच आहेत. तीच स्थिति आर्यसमाजाची, लिंगाइतांची, सनातनीयांची, वैष्णवांची, स्पृश्यांची, अस्पृश्यांची, संताळांची, भिल्लांची ! पण मुसलमान ? त्यांची पितृभूमि कचित् ते भारत म्हणून सांगूं शकतील; पण त्यांची पुण्यभूमि Holy Land–अरबस्थान ! म्हणून ते हिंदु नव्हत. खिश्चन ? त्यांची पुण्यभूमि सीरिया; ते हिंदु नव्हत अशा रीतीनें या व्याख्येच्या एका घावासरशीं हिंदु कोण आणि अहिंदु कोण, या विकट प्रश्नाची गुंतागुंत साफ कापून काढिली जाते. प्रत्येक व्याख्येंत दोन्ही टोकांशीं अस्पष्टपणा असणें अवश्यंभावीच आहे. कारण व्याख्या म्हणजेच अखंडांत खंड कल्पिणें होय. परंतु त्या प्रश्नाची सविस्तरपणें चर्चा करणारांसाठीं ' हिंदुत्व ' पुस्तकाकडे अंगुलिनिर्देश करणेंच प्राप्त आहे. तथापि सध्यां चालचालऊ कार्यास या व्याख्येसारखी सोपी व निःसंदिग्ध अशी दुसरी कोणतीहि ' हिंदु ' शब्दाची व्याख्या उपलब्ध नाहीं, ही गोष्ट वरील थोड्या उदाहरणांवरूनहि वाचकांच्या लक्षांत येण्यासारखी आहे.

एतदर्थंच स्वामी श्रद्धानंदांना तर ही व्याख्या आणि तें पुस्तक पाहून इतका आनंद झाला कीं ते साश्चर्य गांभीर्यानें म्हणाले, " अहो ! कोणत्या शुभकालीं लेखकाला ही स्फूर्ति झाली बरें ! " हिंदुमहासभेचे सध्यांचे अध्यक्ष धर्मवीर डॉ. मुंजे यांनीं तर महासभेच्या भर अधिवेशनांत हीच व्याख्या सयुक्तिक आणि स्वीकरणीय होय म्हणून आपलें मत देऊन, त्या व्याख्येस अंगीकृत केलेलें आहे. आम्हींहि त्यांसच या लेखाच्या द्वारें अशी सार्वजनिक विनंति करितों कीं, हिंदुमहासभेचे अध्यक्ष या अधिकारानें धर्मवीर डॉ. मुंजे यांनीं सरकारास या जैन, बुद्ध इत्यादि प्रकरणीं स्पष्टपणें कळवावें कीं, सरकारनें पुढील कोणत्याहि जनगणतीचे प्रसंगीं किंवा कोणत्याहि धार्मिक वर्गीकरणाचे प्रसंगीं हिंदुत्वाच्या याच व्याख्येनुरूप ' हिंदु कोण ' हा प्रश्न सोडविला पाहिजे. याचप्रमाणें ठिकठिकाणच्या प्रांतिक हिंदु सभांनीं सार्वजनिक रीतीनें आपआपल्या अधिवेशनांमधून या व्याख्येसच आपली संमति दर्शवावी. महासभेच्या सध्यांच्या हिंदुपणाच्या वर्णनांतहि ढिलेपणानें कां होईना पण 'हिंदुस्थानांत स्थापिल्या गेलेल्या कोणत्याहि धर्माचा जो अनुयायी आहे तो हिंदु' असें या व्याख्येचेंच भाषांतर केलेलें आहे. आतां सुस्पष्ट आणि निःसंदिग्धपणें त्या संस्थेनें हीच व्याख्या अंगिकारावी म्हणजे एका श्लोकांत--दोन शब्दांत, हिंदु कोण आणि अहिंदु कोण, याचा जातीपुरता तरी निकाल कोणासहि लावितां येईल.

मुसलमान कोण--तर जो कुराणास आणि महंमदास मानितो तो. ख्रिस्ती कोण--तर जो बायबलास आणि ख्रिस्तास मानितो

तो. पण हिंदु कोण ? आजपर्यंत या प्रश्नाचें उत्तर धार्मिक दिशेनें विचारवंत पुरुषांहि धुंडाळित सुटल्यानें तें वरच्या उत्तरासारखें सुटसुटित असें सांपडत नसे. जवळजवळ मुळींच सांपडत नसे. पण आतां त्याच प्रश्नाकडे जातीय दृष्टीनें–हिंदुत्वाचे दृष्टीनें पाहतांच तें चटकन सांगतां येतें कीं, ज्याची पितृभू आणि पुण्यभू हिंदुस्थान तो हिंदु !

धार्मिक प्रश्न बाजूस ठेवून केवळ व्यावहारिक निर्वाहास्तव ही व्याख्या सर्व हिंदूंनीं अंगिकारून घरोघर मुखोद्गत करून घ्यावी आणि महत्वाच्या सर्व संघटनसंस्थांनीं सरकारास हिंदुत्वाची ही व्याख्या मान्य करणें भाग पाडावें. म्हणजे पुनः हे असे घोटाळे उत्पन्न करण्याची विपक्षाची छातीच व्हावयाची नाहीं. जोंवर सनातनीयांना हिंदु कोण, हेंच सांगतां येत नाहीं, जैनांना–शीखांना–समाजीयांना ' ते हिंदु कां ' हें स्वतःलाहि समजावून देतां येत नाहीं, तोंवर अहिंदु लोक–हा हिंदु नाहीं, तो हिंदु नाहीं म्हणून म्हणणारच; बुद्धिभेद करूं पाहणारच. कारण सरकारनें म्हटलें, " जैन हिंदु नाहींत " तर आपण जोंवर नुसते ओरडत राहूं, " हें काय ! जैन हिंदूच आहेत ! " तोंवर कूटनीतिप्रविण सरकार म्हणणार, " पण जैन हिंदु कशावरून ? " त्यास आणि इतर विपक्षीय कपटी वावदूकपणास, हिंदुत्वाची वरील बहुमान्य, ऐतिहासिक आणि शास्त्रीय कसास उतरणारी असूनहि व्यवहारांत अत्यंत उपयोगी आणि हिंदु समजांतील कोणत्याही घटकावयवास आपापले धार्मिक विश्वास रतिमात्र सोडावे न लागतां जी मान्य

करावीच लागते अशी ही व्याख्या हें बिनतोड उत्तर आहे. तेव्हां जैन हिंदु कां ? तर आसिंधुसिंधु भारतवर्ष हीच त्यांची पितृभूमि आणि पुण्यभूमि ( Holy land ) आहे म्हणून !

---

# पं. मालवीयांचा हिंदुसंघटनार्थ सूत्रमय उपदेश

[ श्रद्धानंद ता. २४।२।२७ ]

माननीय पं. मदनमोहन मालवीय यांनीं त्रिवेणी संगमावर मौनी अमावास्येच्या दिवशीं हिंदूंच्या प्रचंड समुदायाला जो उपदेश केला तोच त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व हिंदूंना संक्षिप्त साररूपानें उपयोगी पडावा म्हणून श्लोकबद्ध केला आहे. तो आम्ही जशाच्या तसा वाचकांसाठीं देत आहोंत.

—संघे शक्तिः कलौ युगे—

हिताय सर्वलोकानां निग्रहायच दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय प्रणम्य परमेश्वरम् ॥ १ ॥
ग्रामे ग्रामे सभा कार्या ग्रामे ग्रामे कथा शुभा ॥
पाठशाळा मल्लशाळा प्रतिपर्व महोत्सवः ॥ २ ॥
अनाथा विधवा रक्ष्याः मंदिराणि तथाच गौः ॥
धर्मसंघटनं कृत्वा देयं दानं च तद्धितम् ॥ ३ ॥
स्त्रीणां समादरः कार्यो दुःखितेषु दया तथा ॥
अहिंसका न हन्तव्या आततायी वधार्हणः ॥ ४ ॥

सं. नि. ...

अभयं सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं धृतिः क्षमा ॥
सेव्यं सदाऽमृतमिव स्त्रीभिश्च पुरुषैस्तथा ॥ ५ ॥
कर्मणां फलमस्तीति विस्मर्तव्यं न जातुचित् ॥
भवेत्पुनः पुनर्जन्म मोक्षस्तदनुसारतः ॥ ६ ॥
स्मर्तव्यः सततं विष्णुः सर्वभूतेष्ववस्थितः ॥
एक एवाऽद्वितीयो यः शोकपापहरः शिवः ॥ ७ ॥
पवित्राणां पवित्रं यो मंगलानां च मंगलम् ॥
दैवतं देवतानांच लोकानां योऽव्ययः पिता ॥ ८ ॥
सनातनीयाः सामाजाः शिका जैनाश्च सौगताः ॥
स्वे स्वे कर्मण्यभिरता भावयेयुः परस्परम् ॥ ९ ॥
विश्वासे दृढता स्वीये परनिंदाविवर्जनम् ॥
तितिक्षा मतभेदेषु प्राणिमात्रेषु मित्रता ॥ १० ॥
श्रूयतां धर्मसर्वस्वं श्रुत्वा चाप्यवधार्यताम् ॥
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् ॥ ११ ॥
यदन्यैर्विहितं नेच्छेदात्मनः कर्म पूरुषः ॥
न तत्परस्य कुर्वीत जानन्नप्रियमात्मनः ॥ १२ ॥
न कदाचिद्बिभेत्कश्चिन्न कंचन बिभीषयेत् ॥
आर्यवृत्तिं समालंब्य जीवेत्सज्जनजीवनम् ॥ १३ ॥
सर्वेच सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ॥ १४ ॥
इत्युक्तलक्षणा प्राणिदुःखध्वंसनतत्परा ॥
दया बलवतां शोभा न त्याज्या धर्मचारिभिः ॥ १५ ॥

पारसीयैर्मुसलमानैरीसाईचैर्यहूदिभिः ॥
देशभक्तैर्मिलित्वा च कार्या देशसमुन्नतिः ॥ १६ ॥
पुण्योऽयं भारतो वर्षो हिंदुस्थानः प्रकीर्तितः ॥
वरिष्ठः सर्व देशानां धनधर्मसुखप्रदः ॥ १७ ॥
गायन्ति देवा किल गीतकानि ।
धन्यास्तु ये भारतभूमिभागे ॥
स्वर्गापवर्गस्य च हेतुभूते ।
भवंति भूयः पुरुषाः सुरत्वात् ॥ १८ ॥
मातृभूमिः पितृभूमिः कर्मभूमिः सुजन्मनाम् ॥
चातुर्वर्ण्यं यत्र सृष्टं गुणकर्मविभागशः ॥ १९ ॥
उत्तमः सर्वधर्माणां हिंदुधर्मोऽयमुच्यते ॥
रक्ष्यः प्रचारणीयश्च सर्वलोकहितैषिभिः ॥ २० ॥

---

# हुतात्मा श्रद्धानंद व प्रत्येक हिंदूचें कर्तव्य

[ श्रद्धानंद ता. १०।१।२७. ]

हिंदु समाजांत इतक्या थोड्या अवधींत इतकी मोठी सामाजिक क्रांति प्रत्यक्ष आचरणांत घडवून आणण्यास संन्यासी शंकराचार्यानंतर हा स्वामी श्रद्धानंदच निघाला.

त्याच्या जीवनाचा घात करण्यास शत्रु टपले आहेत, हें माहीत असतांहि आज चार वर्षे एकटा घोर अरण्यांत सिंह संचार करितो

तसा, हा संन्यासी निर्भयपणें आपल्या हिंदु जातीच्या हितार्थ, कर्तव्यमार्गानें ह्या जगांत संचरत होता आणि शेवटीं आततायी हत्येच्या गव्हरांत तो कर्तव्याचा मार्ग नीट जात आहे, असें दिसतांच त्यानें त्या घातक गव्हरांत दृढ पदानें प्रवेश केला, पण कर्तव्याच्या मार्गापासून एक पाऊलहि विचलित झाला नाहीं; हिंदुत्वाचें रक्षणार्थ झुंजत असतां ज्याचें "अभिमुख शस्त्राघातीं समरमखामाजि वेंचिलें काय" असा वीरगतीस वरणारा संन्यासी स्वामी श्रद्धानंदांपूर्वी कोणी विरळाच निघालेला असेल !

लाला मुनशीराम मारले गेले:—महात्मा मुनशीराम अमर असो ! स्वामी श्रद्धानंद मारले गेले; हुतात्मा श्रद्धानंद अमर असो ! !

ह्या अमर श्रद्धानंदाच्या ह्याच हुतात्मतेच्या यज्ञीय पायावर, त्याच्या राजकीय आणि सामाजिक श्रद्धेचें कार्य, हेंच प्रत्येक हिंदुमात्राचें कार्य असल्यामुळें, तें अखंड पुढें चालविण्यासाठीं प्रत्येक हिंदूनें प्रतिज्ञाबद्ध झालें पाहिजे. हुतात्म्याच्या भस्माहून अधिक शक्तिशाली अंगारा या जगांत कोणता मिळणार ! तोच अंगारा हिंदूंनो ! पुन्हां आपल्या मस्तकास लावून संघटण व शुद्धि यांचा प्रचार व प्रसार करा. "श्रद्धानंदाच्या" पवित्र नांवाचा उच्चार, हिंदुहिंदूच्या तोंडीं एकसारखा रुळो आणि त्या जपानें त्या वीर संन्याशाची **स्मृति, स्फूर्ति, आणि चेतना आम्हां सकळांचे हृदयांत एकसारखी प्रज्वलित राहो !**

# प्रत्याघाताचें धैर्य हिंदूंत नाहीं असें समजूं नका.

[ श्रद्धानन्द ता. १०।१।२७ ]

स्वामी श्रद्धानंदजींच्या हत्येविषयीं चाललेल्या चर्चेत एक अत्यंत भ्रामक आणि तेजोभंग करणारें विधान पुष्कळांनीं केलेलें आहे. तें विधान हें होय कीं, "हिंदु धर्म कोणावरही प्रतिप्रहार करण्यास आज्ञा देत नाहीं. प्रत्येक अपराधाची क्षमा करा, कोणत्याही छळाचा सूड उगवूं नका, हीच क्षमाशील वृत्ति हिंदु धर्माचें सर्वस्व आहे. आणि म्हणून हिंदूंनीं कोणत्याही प्रतिकाराची, प्रतिरोधाची, सूड उगविण्याची इच्छा मनांत आणूं नये आणि श्रद्धानंदजींच्या हत्येनं लवलेश विचल न होता शांत रहावें."

या आपसांत यादवी पेटविणाऱ्या हत्येचा ठिणगी प्रतिरोधाच्या सूडाच्या झडपण्यानें शक्य तों प्रज्वलित करण्याचें सोडून, हिंदूंनीं त्या घोर यादवीचा प्रसंग आपल्या क्षमाचे बळानें पुनः एकदां टाळण्याचा प्रयत्न करावा, ही इच्छा आम्हां सर्वांच्याच मनांत उत्कट रीतीनें वसत आहे. परंतु 'शांत रहा! हाहि आघात सोसा!' असें म्हणणें निराळें आणि हिंदु धर्म प्रत्याघातास निरपेक्षतः निषिद्ध मानितो, क्षमा हीच हिंदुधर्माची एकमेव शिकवण आहे, हिंदुधर्म म्हणजे 'मार खात जा, पण मारूं नकोस' अशा क्लैब्याचीच काय ती गाथा आहे, असें खुळचट, तेजोघातक आणि अत्यंत हानिकारक विधान करणें हें निराळें.

नाहीं: हिंदुधर्म क्लैब्यांची गाथा नाहीं. हिंदुधर्म निःसंशय सात्त्विक क्षमाशील आहे. हिंदुधर्म निःसंशय सात्त्विक क्रोधशील आहे. ' क्लैव्यं मा स्म गमः पार्थ ' ही हिंदुधर्माची गर्जना आहे. ' अहिंसा परमो धर्मः ' ही ज्या हिंदुधर्माची व्याख्या आहे, त्याच हिंदुधर्माची अगत्याची तेजस्वी आज्ञा आहे कीं, " आततायिन-मायान्तं हन्यादेवाविचारयन् "; आणि या दोन्ही आज्ञांचा समन्वय हिंदुधर्मच उत्तम प्रकारें लावूं शकतो. हिंसेच्या आणि अहिंसेच्या अर्थाचा आजकालच्या अर्धवट आचार्यांनीं जो गोंधळ माजविला आहे, त्यामुळें तीं वचनें परस्पर विरुद्ध दिसोत; परंतु हिंदुधर्माचे मर्मज्ञ आचार्य, पूर्वीपासून या शब्दाचा जो अर्थ करीत आले तो ध्यानांत धरिला असतां, ' तस्मादुत्तिष्ठ कौंतेय, युद्धाय कृतनिश्चयः ' हें गर्जत आपलें सुदर्शन उंच उभविणारा कंसकंदन कृष्ण आणि त्याची ती गीता अशीं दोन्ही हिंदुधर्माचीं आणि राष्ट्राचीं प्रमुखतम आराध्य दैवतें कां झालीं हें सर्वांचे ध्यानांत येण्यासारखें आहे.

पण तो प्रस्तुत प्रश्न नाहीं. प्रस्तुत इतकेंच सांगणें पुरे आहे कीं, रावणाला वधून श्रीराम विजयी झाले असतां सीतादेवी जेव्हां त्यांचेकडे परत आली तेव्हां लोकरीतीप्रमाणें तिला स्वीकारावें कीं स्वीकारूं नये, अशा विपण्ण शंकेनें ग्रस्त होऊन रामचंद्र म्हणाले होते, " सीते तूं परत जा, तुझ्या प्राप्तीसाठीं मीं रावण मारिला नाहीं; तर रावणानें रघुकुलाचा जो घोर उपमर्द केला त्याचा सूड उगविण्यासाठीं मारिला ! सर्प जो डसतो तो सीते, रक्त पिण्यासाठीं डसत नाहीं, तर पुच्छाघाताचें वैर उगविण्यासाठीं

होय ! " हें सांगणाऱ्या श्रीरामास हिंदुधर्म आदर्शपुरुष म्हणून पूजित असतो.

आणि ज्या युधिष्ठिराचें उदाहरण गांधीजींनीं आपल्या नेहमींच्या गोंधळ्या प्रवृत्तीनें हिंदु लोकांस या वेळेस उदाहरणीय म्हणून उपमान योजिलें आहे, त्यांनींच तर अठरा दिवस महाभारत लढविलें ! अर्जुनाला कर्ण मारावयास उशीर झाला, तेव्हां हा 'क्षमेचा पुतळा' युधिष्ठिर संतापानें लाल होऊन त्याच्या पौरुषास धिक्कारिता झाला ! त्याचें नांवच 'क्षमास्थिर' नसून 'युधिष्ठिर' आहे—म्हणजे क्षमेच्या भागूबाई व्याख्येनें विचल न होतां युद्धामध्यें स्थिर राहणारा ! त्या युधिष्ठिराची उपमा गांधींजींच्या लेखांत दिली आहे !—हें सिद्ध करण्यासाठीं कीं, हिंदु लोकांना 'आत्यंतिक क्षमा' हाच धर्म आहे ! आत्यंतिक क्षमेचा पुतळा म्हणून युधिष्ठिराचें उपमान अशा प्रसंगीं हिंदु लोकांपुढें ठेवणें म्हणजे स्वतःच्या वाक्याविरुद्ध स्वतःच अर्थ व्यक्त करणें होय. शकाराच्या उपमा देखील इतक्या अनर्थक आणि हास्यास्पद नसत !

तेव्हां हिंदु लोकांस क्षमेचा उपदेश देणें आणि तरीहि शांत रहा म्हणून जें सांगणें तें सद्यःपरिस्थितींत शक्य तों यादवीचा वणवा पेटूं नये आणि हिंदूंना व मुसलमानांना उभयपक्षीं घोर हानि सोसावी लागेल ती लागूं नये म्हणून होय. हें त्या शांतवृत्तीचें सयुक्तिक कारण आहे. हिंदुधर्म हा निरपेक्षतःच प्रत्याघाताच्या विरुद्ध आहे किंवा प्रतिरोध, वैरनिर्यातन किंवा सूड हा हिंदुधर्मांत अगदीं पंचमहापातकांहूनहि अत्यंत निषिद्ध मानिलेला

आहे हें नव्हे, ही गोष्ट खोटी आहे. हिंदुधर्माची अशी मलतीच आणि विकृत शिकवण देऊन राष्ट्र अधिक पंगु करण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

जातां जातां आमच्या मुसलमान बंधूंसहि एक आग्रहाची सूचना द्यावी लागत आहे. अब्दुल रशीदनें स्वामी श्रद्धानंदांस कोणत्याहि वैयक्तिक लोभालाभासाठीं मारिलें कीं नाहीं तें सर्व न्यायालयांत सिद्ध वा असिद्ध होईल. आपण हें गृहीत धरूं कीं, त्यानें केवळ इस्लामच्या हितासाठीं म्हणून श्रद्धानंदजींस मारिलें. शेकडों मुसलमान त्यास, त्याची ही समजूत अयोग्य वाटली तरीहि त्याच्या धार्मिक हेतूसाठीं "गाझी" म्हणून गौरवितील. शेंकडों त्याची समजूत योग्यच होती म्हणून त्यास आजच गौरवीत असून, त्याचीं चित्रेंहि "गाझी" म्हणून विकलीं जात आहेत. हीहि गोष्ट नाहीं कीं, ज्यास त्याच्या समजुतीचा तीव्र तिरस्कार वाटत आहे आणि त्याच्या या धर्मोन्मत्ततेचा संताप येत आहे, त्यांस देखील त्या कृत्येंत अब्दुल रशीदनें जें धैर्य आणि जीवाची निःस्पृहता व्यक्त केली त्याविषयीं आश्चर्य आणि नवलहि वाटतें. मुसलमान तर त्या धैर्याची प्रशंसाच करितील. हिंदु असून आम्हींहि त्याच्या धैर्याची आणि धर्मभक्त नसला तरी धर्मोन्मादी आत्मत्यागाची प्रशंसाच करितों, ज्याप्रमाणें आपण एखाद्या सापाच्या हिंसक आवेशाची प्रशंसा करितों, ज्याप्रमाणें दुर्योधनाच्या दुष्ट शौर्याची प्रशंसा करितों; ज्याप्रमाणें समाजकंटक अशा एखाद्या दरवडेखोराच्या निर्दय धाडसाची प्रशंसा करितों. हें सर्व साहजिकच आहे आणि म्हणून कोण्या मुसलमा-

नांनीं त्या हत्त्याऱ्याच्या धैर्याविषयीं आणि हिंसक आत्मत्यागाविषयीं गुप्त वा प्रकट वाहवा केली तर त्यांत आम्हांस कांहीं वैषम्य वाटणार नाहीं.

पण या धैर्याचे प्रशंसेमागोमागच मुसलमानांनीं एक गोष्ट मात्र विसरतां कामा नये. मारणारा मुसलमान आणि मेला तो हिंदु—इतक्याच गोष्टीनें अनेक प्रसंगीं पुष्कळ लोकांचा असा समज होण्याचा संभव आहे कीं—मुसलमानच तेवढा मारूं शकतो आणि हिंदु तेवढा केवळ मरूंच शकतो. स्वधर्मार्थ किंवा स्वराष्ट्रार्थ स्वतःचें शिर हातांत घेऊन, विपक्षाचें शिर उडविण्याची अलोट प्राणनिःस्पृहता आणि धैर्य हिंदूंत येऊंच शकत नाहीं, अशी आजहि पुष्कळांची समज आहे. गेल्या वर्षीच्या दंग्यांची नामावळी वाचून आणि तींत बहुतेक हिंदूच मेले—निदान पहिल्या पहिल्यानें तरी—हें ऐकून इंग्लंडहून एक गृहस्थ अलिकडेच सांगते झाले होते कीं मुसलमान हा प्राणी जात्याच "Virile" आहे, कडवा आहे क्रूर आहे आणि हिंदू नाहीं ! या उंटावरून शेळ्या हांकू पाहणाऱ्या विलायती पंडिताप्रमाणेंच अबदुल रशीदच्या धैर्यानें मुग्ध होणारेहि लोक क्वचित् समजूं लागतील कीं, असें धैर्य मुसलमानच करूं जाणत !

पण तसें जर कोणी समजतील आणि म्हणून हिंदूंच्या आणखी दोवां तिघां पुढाऱ्यांवर हात टाकण्यास जर कोणी आततायी पुढें सरसावतील, तर त्यांनीं हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, त्यांची ती फार मोठी चुकी होणारी आहे. हिंदु हा मुसलमानासारखा

चेंडगळ कडवा नाहीं. पण हिंदु कडवा आहे; हिंदु मुसलमानासारखा धर्मोन्मत्त वीर नाहीं; पण हिंदु धर्मवीर आहे. नाहींतर तो ह्या जीवनकलहांत आजवर जगलाच नसता ! अब्दुल रशीदचें धैर्य काय ? एका निःशस्त्र संन्याशास मारिलें. पण ह्या गेल्या दहावीस वर्षांतच एक नाहीं, दोन नाहीं, शेंकडों हिंदु तरुण असे निघाल नाहींत काय कीं ज्यांनीं हिंदुस्थानचे स्वातंत्र्यार्थ हंसत हंसत फांसावर आरोहण केलें, गव्हरनर जनरलांना हजारों गाऱ्या सैनिकांच्या नागव्या तरवारींचे पहाऱ्यांतून हत्तीवरील हौद्यांत आहत केलें ? अठरा अठरा वर्षाच्या मुलांनीं ! ज्या डिंगराच्या देशभक्तीची आणि अतुल धैर्याची स्तुति चर्चिल आणि लॉइड जार्ज यांनीं करून त्यास रोमच्या अत्यंत श्रेष्ठ हुतात्म्याशीं तुललें, तो मदनलाल डिंगरा हिंदूच होता हें कोणीं विसरूं नये. आजपर्यंत जर कोणी मुसलमानांवर हात टाकिला नाहीं तर तें धैर्य नव्हतें म्हणून नाहीं, तर ती इच्छाच नव्हती म्हणून.

येथें हें स्पष्टपणें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, अबदुल रशीदचे धैर्याची जे वाहवा करितात ते ज्याप्रमाणें त्या हत्येचा नीच आणि अधमपणा त्यामुळें कोणत्याहि प्रकारें कमी करूं इच्छितातच असें नाहीं, त्याचप्रमाणें लॉइड जार्ज किंवा चर्चिल किंवा आम्ही कोणी केवळ धैर्याचा आणि प्राणनिरपेक्ष ध्येयनिष्ठेचाच केवळ प्रश्न असतां त्या धैर्याच्या म्हणून वर दिलेल्या क्रांतिकारकांच्या उदाहरणांवरून त्यांच्या मार्गाची किंवा कृत्यांची कोणत्याहि प्रकारें स्तुति करूं इच्छितोंच असें नाहीं. तो प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे. ज्या हिंदूंत

ध्येयासाठीं फांसावर मरणारे किंवा अंदमानांत मृत्यूच्या जबड्यांत असतां क्रांतिगीतें आणि स्वातंत्र्यस्तोत्रें गाणारे शेंकडों तरुण आणि वृद्ध लोक निघाले, आजकाल निघताहेत, त्या हिंदूंत अबदुल रशीद निघणार नाहींत, अशी वेडी समजूत करून घेऊं नका. नाहीं तर फसाल, इतकेंच काय तें सांगणें आहे.

आणि जर हिंदूंतहि धर्मोन्मादी नसले तरी प्रत्याघाती अबदुल रशीद शेंकडों निघूं शकतात, तर मग हिंदु पुढाऱ्यांस तुम्ही मारावें आणि त्याचा सूड उगविण्यास त्या हिंदूंनीं तुम्हांस मारावें अशी यादवी माजणें हें हितकारक आहे का? राष्ट्रसभेच्या अध्यक्षांस आतांच कोणी निनांवीं पत्रें धाडलीं आहेत कीं, श्रद्धानंदांच्या मृत्यूसाटीं कोणी तरी मुसलमान पुढाऱ्याचा बळी पडणार आहे. अशी भयंकर परिस्थिति उत्पन्न होणें हें, हिन्दुहित राहूं द्या, पण मुसलमानी हितास तरी उपकारक आहे काय? यादवीनें दोघेहि आपली हानि करून घेतील! म्हणून मुसलमानबंधूंनो, वेळींच उमजा आणि ही हिंसेची प्रवृत्ति तुमच्या समाजांतून नष्ट करून टाका. हिन्दु वैरनिर्यातन करण्यास सज्ज होऊंच शकत नाहींत अशा घातक विश्वासानें फसूं नका! ईश्वर तुम्हांस सद्बुद्धि देवो, आम्हांस सद्बुद्धि देवो आणि ही यादवी टळो! कारण, "प्रासं प्रासमुपासीन हृदयेनापराजितः" ही हिन्दुधर्माची प्रतिज्ञा आजपर्यंत त्याला अनेक सहस्र वर्षांच्या अशा व ह्याहूनहि भीषण परिस्थितींत संरक्षित करीत आलीच आहे.

---

# हुतात्मा श्रद्धानंदांचा सूड उगवा !

## हिंदुसंघटन प्राणपणानें पूर्णतेला न्या !

## ह्मण—शिवेन ! स्वीकारीन ! !

[ श्रद्धानंद ता. ३-२-२७

अमर्षशून्येन जनस्य जन्तुना ।
न जातहार्देन न विद्विषादरः ॥

आपल्या जातीच्या, राष्ट्राच्या आणि धर्माच्या गौरवासाठीं आणि कल्याणासाठीं झटत असतां हुतात्मा श्रद्धानंद मारिले गेले. केवळ आपणां हिंदूंसाठीं मारिले गेले. ज्या आम्हां हिंदूंसाठीं ते मारिले गेले त्या आम्हांस त्यांच्या मृत्यूचा सूड जर घेतां आला नाहीं तर आमच्यासाठीं आमचें पुढारीपण स्वीकारून झुंजण्यास पुनः कोणी तरी सिद्ध होईल काय ? ज्या सेनेंत पुढाऱ्यांच्या पुढें तर राहोच, पण मागोमाग जाण्यासहि भिणारे आणि जो "एकहि बाण न सुटला नाहीं अद्यापि झळकला सदसि " तोंच वीरांच्या पहिल्या ललकारीसरशींच शेपट्या घालून पळ काढणारे भेकडच भेकड भरलेले असतात, त्या सेनेचें आधिपत्य स्वीकारण्यास कोणचा सेनानी सिद्ध होणार आहे ! सिंहगडावर शत्रूंच्या वारासरशीं विव्हळ होऊन पडलेल्या तानाजीस पाहातांच, जेव्हां मराठी सैन्य धैर्य सुटून उधळून जातें कीं काय असें दिसलें, तेव्हां त्याचा प्रत्यक्ष भाऊ सूर्याजी त्यांस थोपवून म्हणाला कीं, " जातां कोठें ? हा तुमचा बाप येथें मरून पडला आहेना ! " त्यासरशीं तें

सैन्य उलटलें व तानाजीचा सूड घेतला गेला, पराजयाचा विजय झाला, गडाचा सिंहगड झाला ! म्हणूनच आपण पडलों तरी आपलें कार्य चालविणारे शेंकडों वीर आपल्या रक्ताची शपथ घेऊन पुढें होतील, आपला सूड उगवतील आणि आपल्या शत्रूस आपणांस मारल्याची प्रौढी सांगण्याची छाती देखील होऊं नये असा वचपा काढून आपलें कार्य सिद्धीस नेतील अशी निश्चिति महाराष्ट्रमंडळांत ज्याच्या त्याच्या हृदयांत उत्पन्न झाली आणि एकासारखे एक वीर, बाजीप्रभूसारखे विजयाच्या दुर्गावर चढण्याचे आर्धांत आणि तो विजयदुर्ग आपल्या राष्ट्रास चढतां यावा म्हणूनच वाटेवरील प्रयत्नांच्या खिंडींतच आपले कर्तव्या-साठीं प्राणत्याग करून गेले. आपल्यावर झालेल्या आततायी आघाताचा प्रतिकार केलाच पाहिजे, दंशाचे दांत पाडलेच पाहि-जेत, हाच आमचा रामदासीय बाणा आहे. जोंवर दुःशासनानें केलेल्या अपमानाचा सूड उगविला गेला नाहीं, तोंवर द्रौपदी वेणी घालित नाहीं आणि तिचा तो ‘ पण ’ त्या दुःशासनाच्या दुष्कृत्यांचा सूड उगवून भीमसेन पुरविल्याविना राहात नाहीं. तथापि त्यास श्रीकृष्णानें असें सांगितलें नाहीं कीं, “ अरे, अरे ! थोडा विचार कर, थोडा शांत हो, बापा भीमा, क्षमा हाच धर्म. वैरनिर्यातनाची इच्छा ही असुरी होय. थोबाडांत खाणें हा आर्य-धर्म होय. आततायीनें थोबाडांत दिली तर त्याचा सूड उगविणें हा राक्षसी धर्म होय ! तूं आपलें दूसरें थोबाड पुढें कर कसा ! ” तर उलट त्या प्रतिशोधाच्या, त्या न्याय्य सूडाच्या इच्छेला चवदा

वर्षे फुंकरानें प्रज्वलित राखीत शेवटीं जेव्हां भीमसेन दुःशासनाशीं बिलगला, तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला, " बापा ! भीमा ! बलिष्ठ देवा ! हूं ! " त्या श्रीकृष्णाची भगवद्गीता आम्हीं हिंदु लोक आमचा धर्मग्रंथ मानितों. आम्हीं आमच्या राष्ट्रासाठीं अन्यायानें ठार मारण्यांत आलेल्या आमच्या श्रद्धानंदांचा न्याय्य सूड उगविणें हें आमचें धर्मकृत्य मानितों.

आणि म्हणूनच हिंदु लोकांमध्यें जे जे कोणी श्रद्धानंद मेले असतांहि हंसत खेळत बसले असतील, तळमळत नसतील, संसाराच्या घरकोंबडेपणांत गुंगले असतील, त्यांस आम्ही त्याच सूर्याजीच्या शब्दांत ललकारितों, " अरे करितोस काय ? हा आपला बाप येथें मरून पडला आहे ना ! ऊठ ! प्रथम त्याचा सूड उगविला पाहिजे, सूड ! "

श्रद्धानंदांच्या हत्येनें निरुत्साह न होतां उलट सात्विक क्षोभानें संतप्त होऊन त्यांचा सूड घेण्याची प्रबल इच्छा हिंदु लोकांत अनेक ठिकाणीं उत्पन्न झालेली आहे हें स्पष्ट आहे. त्या इच्छेनें व्यक्तिस्वभावानुरूप निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं रूपें धारण केलीं आहेत. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांस गौहत्तीसच कांहीं पत्रें अशा अर्थाचीं धाडण्यांत आलीं होतीं कीं, " श्रद्धानंदांच्या रक्ताचें प्रतिमोल म्हणून कांहीं मुसलमानी पुढाऱ्यांसहि आपल्या प्राणांस मुकावें लागेल. " हिंदु लोकांतील कांहीं मनुष्यांनींच जर हीं पत्रें धाडलीं असतील तर श्रद्धानंदांच्या हत्येचा सूड घेण्याच्या इच्छेनें त्यांचे हृदयांत असें " दांतास दांत आणि डोळ्यास डोळा " हें

एकांगी स्वरूप धारण केलें आहे हें उघड आहे; परंतु अशा व्यक्तिविषयक मोलाप्रतिमोलाच्या गणनेनें या हत्येच्या उत्क्षोभांत आपसांतील यादवी अधिकच भीषण स्वरूप धारण करील व असें कृत्य करूनहि तो श्रद्धानदांचा सूड उगविला जाणार नाहीं असें आम्हांस वाटतें. श्रद्धानंदांच्या हत्येचा प्रतिशोध अशा रीतीनें घेतला जावा कीं, त्यायोगें चालू यादवीस अधिक भीषण स्वरूप देण्याचा दोष कोणच्याहि रीतीनें हिंदूंवर न पडतां त्या हुता-त्म्याचा बळी ज्या कार्यासाठीं पडला तें शुद्धिसंघटनेचें कार्य तर अधिक चिरपरिणामी आणि अधिक यशस्वी व्हावें.

श्रद्धानंदांचा सूड दांतास दांत आणि डोळ्यास डोळा अशा प्रमाणानें व्यक्तिशः उगविण्याची धमक आणि प्राणनिरपेक्ष वीरता हिंदु लोकांत आजहि वास्तव्य करीत आहे, हें आम्हांस ठाऊक आहे. गेल्या वीस वर्षांचा इतिहास विपक्षासहि हें सत्य पटवून देण्यास समर्थ असल्यानें त्याचे पोटांतहि थोडें धस्स झालें असावें, हें त्यांच्यापैकीं कित्येक पुढाऱ्यांच्या तोंडून निघालेल्या उद्गारांवरून स्पष्ट होत आहे. उदाहरणार्थ महमद अल्लींनीं थोड्याशा प्रौढीनें गौहत्तीस असे उद्गार काढले कीं, “जर श्रद्धानंदांच्या हत्येचें प्राय-श्चित्त माझें रक्त सांडून होण्यासारखें असेल तर मी तें तसें करण्यास सिद्ध आहें.” महंमद अल्ली तें तसें प्रायश्चित्त घेण्यास सिद्ध असोत वा नसोत, आमच्या हिंदु बंधूंस आमची आग्रहाची विनंति आहे कीं, कोणीहि मुसलमानी मनुष्यास व्यक्तिशः तसें प्रायश्चित्त करण्याची संधि देऊन त्यास नसता

मोठेपणा देऊं नये. श्रद्धानंदांची योग्यता आणि आम्हां हिंदूंवर त्यांचे झालेले उपकार हे इतके मोठे आहेत कीं, त्यांची फेड कोणा एखाद्या व्यक्तीच्या प्रतिवधानें पूर्ण होणारी नाहीं. वाघाच्या पिलास दुखविलें तरी त्या रागानें तो उंदिरांची मृगया करण्यासाठी त्यांच्या बिळांपुढें दबा धरून बसत नाहीं किंवा त्यांच्यामागें पळत त्यांस नसतें महत्व देत नाहीं. श्रद्धानंदांचा खरा सूड उगविण्याचा सध्यांच्या परिस्थितींत एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे हा कीं, हिंदु संघटनाचें त्यांचें आणि आपलें कार्य अशा चिकाटीनें आपण पार पाडावें कीं, एक काय, दोन काय, शेंकडों अब्दुल्ली किंवा औरंगजेबही जरी हिंदु संघटनास विरोध करावयास आले तरी आमच्या हिंदु राष्ट्राचें लवमात्रहि अशुभ करण्याची त्यांची छाती होऊं नये. 'श्रद्धानंदांस आम्हीं मारिलें' या प्रौढीनें कोणासहि वर डोकें करण्याची लाज वाटून तें कृत्य आम्हीं आमच्यावर आलेलें महत् संकट होतें असें त्यांच्या इतिहासकारांस खालीं मान घालून दुःखाश्रूंत भिजलेल्या पानांवर लिहिणें भाग पडावें.

श्रद्धानंदांचा सूड उगविलाच पाहिजे आणि तो उगविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे हें हिंदु-संघटनेचें महत्तम कार्य पुढें रेटण्यास आतां प्राणपणानें प्रत्येक हिंदूनें पुढें येणें हाच होय. प्रत्येक हिंदूनेः कारण आपल्या राष्ट्राच्या उन्नत्यर्थ इतर जीं कांहीं कार्यें करावयाचीं आहेत आणि जे संघटनेचे प्रयत्न चालले असतां त्याबरोबरच करीत राहिलेंच पाहिजे, त्या

कार्यांत कांचित् प्रत्येक हिंदूस महत्वाचा भाग घेणें अशक्य असेल—कोणांत तितकें धैर्य नसेल, कोणापाशीं तितकी धनसंपन्नता नसेल, कोणी कारागृहास भीत असेल, कोणी रक्तपाताच्या आणि प्राणदानाच्या भयंकर दिव्यास तोंड देण्यास धजत नसेल, पण अशा सर्व हिंदूंसहि संघटनेचें कार्य त्यांस अशक्य वाटणाऱ्या स्वार्थत्यागावांचून आणि त्या असह्य संकटांस तोंड देण्यावांचूनहि थोड्या फार अंशानें प्रत्यक्षपणें करितां येण्यासारखें आहे. संघटनेचा दूरचा कार्यक्रम क्षणभर विचारांत न घेतां अगदीं आजच्या हातीं घेतलेल्या कार्यक्रमांतील बहुतेक कामें केवळ तुमच्या इच्छेवर काय तीं अवलंबून आहेत. तुमच्या हातीं सैन्य नाहीं, शस्त्रें नाहींत, सत्ता नाहीं पण—

## इतकें तर तुमच्या हातीं आहेना ?

कीं आपल्या सात कोटी अस्पृश्य बंधूस हिंदुत्वाचे अधिकार अर्पण करावे ! जेथें कोणी हिंदु अनाथ असेल तेथें तेथें तो परधर्माचे पंजांत गवसण्याचे पूर्वीच त्याचे संगोपनाची आणि संरक्षणाची व्यवस्था करावी ! आणि जे कोणी शुद्ध होऊन हिंदु समाजांत परत येऊं इच्छितील त्यांस तसें परावर्तित करून घेऊन आणि त्यांच्यांशीं सर्व सामाजिक व्यवहार मनोभावानें आणि प्रीतिपूर्वक करूं लागून त्यांस समाजांत ममत्वानें प्रस्थापित करावें !

हिंदु-संघटनेच्या शुद्धि आणि अस्पृश्योद्धार या दोन अत्यंत महत्वाच्या कार्यासाठींच श्रद्धानंद मुख्यतः झटले आणि मुख्यतः मारिले गेले. त्यांचा खरा सूड त्याच कार्यास शतपट अधिक

नेटानें चालविण्यांत उगविला जाणारा आहे आणि तीं कार्यें इतकीं सोपीं कीं तीं करावयास तुमच्या इच्छेचा काय तो खोळंबा !

अस्पृश्योद्धारचाच प्रश्न घ्या; हे सात कोटि आपले हिंदु, रक्ताचे, धर्माचे, राष्ट्राचे, बंधु, ह्यांस आपण तो अब्दुल रशीद, तो औरंगजेब, ते मोपले, ते पूर्व बंगाल्यांत हिंदूंच्या कत्तली करणारे इतर विधर्मीय धर्मोन्मत्त यांना जितके जवळ करितों, त्यांना जसें आणि जेथपर्यंत घरांत येऊं देतों, तेथपर्यंत आणि तसें देखील वागवीत नाहीं. ते धर्मशत्रू घरांत आले असते तर त्यांस तुम्हीं गादीवर बसवून 'या खानसाहेब' म्हणून मांडीशीं मांडी लाविली असतीत. पण जरी या अस्पृश्य हिंदूंतील अगदीं संत, सालस, सरळ, विठोबाचा वारकरी स्नान करून घराशीं आला तरी त्याला आम्ही आंत घेणार नाहीं, त्याची सांवली देखील घेणार नाहीं ! हीं सात कोटी आम्हां मनुष्यांसारखीं मनुष्यें. आम्ही कुत्र्यामांजरांसारख्या गदळ प्राण्यांस, म्हशी गायींसारख्या पशूंस शिवूं, पण त्यांस शिवत नाहीं ! त्यायोगें हा सात कोटी हिंदुसमाज आपल्या पक्षास असून नसून सारखाच झालेला आहे; इतकेंच नव्हे तर त्याहून भयंकर संकट आपणावर कोसळण्यास कारणीभूत होणारा आहे. कारण त्यांच्यावर जो अमानुष बहिष्कार आम्हीं टाकिला, त्यामुळें ते आपल्यास उपयोगी पडत नाहींत. उलट शत्रूस आपल्या घरांत भेद पाडण्यास सुलभ साधन होतात. आणि अंतीं बाटून आपले शत्रूच होऊन आपल्या अपरिमित

र्थनीस कारणीभूत होतात ! ह्यासाठीं—आणि विशेषत: न्यायासाठीं त्यांस त्यांचे मनुष्यत्वाचे अधिकार आपण होऊन जर आपण देऊं तर आपल्या हिंदु समाजावर आघात करण्यासाठीं विधर्मीयांनीं उचललेल्या भ्रष्टीकरणाच्या तरवारींची धार अर्धी अधिक बोथट होऊन जाईल. मग अर्धे अस्पृश्य आम्ही घेतों म्हणून म्हणणारी अल्लींची जीभ, आणि सगळे अस्पृश्य आमचेच आहेत म्हणून अधिकार सांगणारी निजामी आणि सिंधी मौलवींची धृष्टता ठिकऱ्या ठिकाणीं लुली पडेल. ख्रिस्त्यांची अर्धी अधिक मिशनें ओस पडतील आणि हें सर्व अत्यंत दूरवर परिणाम करणारें महत्कार्य करण्यास कांहीं तुरुंगांत जावें लागेल काय ? मुळींच नाहीं ! फांशी ? नांव नको ! कांहीं लाखों रुपयांचा निधि उभारावा लागणार आहे ? नाहीं ! कवडीचा खर्च नाहीं. एक दिवसहि कारागृह पाहणें नको. केवळ इच्छा धरा म्हणजे तें महत्कार्य आपोआप झालें ! केवळ मनांत निश्चय करा ' मी महारास शिवणार ! ' बस, या एका उच्चारासरशीं श्रद्धानंदांचा भयंकर सूड तुम्हीं अर्धा अधिक उगवूं शकाल ! कुत्र्यास शिवतोस, सापास दूध पाजितोस, उंदिराचें रक्त प्रत्यहीं पिणाऱ्या मांजरास ताटांत तोंड घालूं देतोस—तर मग हे हिंदु ! या माणसासारख्या माणसास, या तुझ्या रामाची पूजा करणाऱ्या तुझ्या देशबंधूस—या तुझ्या महारास शिवण्याची तेवढी तुला इतकी कसली लाज वाटते । सोड ती लाज. त्या लाजेचीच तुला वाटूं दे लाज आणि या श्रद्धानंदांच्या हृदयांतून त्या हत्याऱ्याच्या गोळीसरशी बाहेर पडलेल्या रक्ताच्या चिळकांडीची

शपथ घेऊन म्हण कीं, " शिवेन, मी महारास शिवेन, मी अस्पृश्यास निदान सार्वजनिक कार्यांत तरी माझ्याजवळ बसूं देईन ! "

बस् इतकी इच्छा केलीस, इतका नुसते हात पुढें करून महारास शिवलास कीं, हा अस्पृश्यतेचा इतका अत्यंत महत्वाचा प्रश्न फट्कन सुटला ! शाळेंतून, नगरसंस्थेंतून, सभांतून, सार्वजनिक मार्गांवरून अस्पृश्य हिंदूंस नुसतें शिवायचें कीं श्रद्धानंदांचा सूड उगविला गेलाच ! इतकें महत्कार्य आणि तें साध्य करण्याचा हा इतका सोपा उपाय !

तर चल म्हण, " शिवेन ! जो मी शत्रूच्यापुढें ' या साहेब ! या महाराज ! ' म्हणून लाळ घोटण्यास लाजत नाही, तो मी माझ्या हिंदु बंधूंस शिवण्यास लाजणार नाहीं. आतां या क्षणीं उटेन आणि माझ्या महारचांभारादिक हीन दीन हिंदु बंधूंच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवीन ! मग आकाशांतून वज्र जरी पडावयाचें असलें तरी पडो ! "

पुरे: इतका निश्चय करून तूं बाहेर पड आणि त्या हीन दीन हिंदु बंधूंच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरव कीं, त्या एका हात फिरविण्यानें तूं या हिंदु जातीचें भाग्यचें भाग्य परिणामकारकपणें फिरवूं शकशील आणि तुझ्यावर या सत्कृत्यासाठीं आकाशांतून वज्र नाहींच पण पारिजातकाच्या फुलांचा वर्षाव पडेल !

आणि तीच गोष्ट या संघटनात्मक कार्याच्या एका अत्यंत महत्वाच्या उपांगाची आहे. आपल्या पूर्वार्जित घरांत, पूर्वी जे छलबलानें हिसडून नेले गेले, त्या आपल्या रक्ताच्या आणि राष्ट्राच्या

विध्वंस, ते आपल्या समाईक समाजकुटुंबांत सप्रायश्चित्त आले असतां त्यांस ममत्वानें आपलें म्हणणें हें तें दुसरें उपांग होय. हीच शुद्धि. हिच्यासाठीं श्रद्धानंद मुख्यतः मारले गेले. जिचा आपण अंगिकार केला असतां मुसलमान ख्रिश्चनादिक अशेष विधर्मीयांचा भ्रष्टीकरणाचा व्यवसाय टार बुडालाच पाहिजे, तीच ही शुद्धि. ज्या चळवळीनें गेल्या दोन वर्षांत जवळ जवळ दोन लाख लोक हिंदुसमाजांत आणि राष्ट्रांत परत समाविष्ट करून घेतले, तीच ही शुद्धि. आजपर्यंत प्रतिवर्षी लाख लाख लोक हिंदु समाजांतून हिसडून नेले जात. असा क्रम अव्याहत एक हजारांवर वर्षें चालला. लाखांनीं या आपल्या राष्ट्रमातेच्यीं पोटच्यीं पोरें या भ्रष्टीकरणाच्या प्रेगास बळी पडत आलीं; पण त्यांतून एकासहि वांचवून परत घरीं आणील अशी औषधि आजपर्यंत निघाली नव्हती. परंतु भ्रष्टीकरणाच्या प्रतिवर्षी लक्षावधि जीवांचा संहार करणाऱ्या घातक प्रेगावर एक अमोघ औषधि आतां सांपडली आहे. ती ही शुद्धि. ही संजीवनी या आपल्या हिंदुजातीच्या देवसेनेंतील कोणी सैनिक सहसा भ्रष्टीकरणाच्या बाणानें विद्ध न होऊं देतां पूर्वीप्रमाणें लाखांनीं प्रतिवर्षी होणारा संहार टाळते. इतकेंच नाहीं तर पूर्वी संहार झालेल्या त्या आपल्या धर्ममृत सैनिकाच्या लाखों प्रेतांस प्रतिवर्षी पुनः जिवंत करीत आहे, म्हणूनच या सवाई संजीवनीची विद्या श्रद्धानंदांनीं देवगुरुपुत्र कचाप्रमाणें आपल्या देवशिबिरांत आणिल्यापासून विधर्मीयांच्या गोटांत धस्स झालें आहे. ते गडबडले आहेत. श्रद्धानंद मारले गेले

कां ? कीं शुद्धि मरावी ! श्रद्धानंद मारिले जाण्याचा खरा सूड घ्यावयाचा असेल तर श्रद्धानंद मेले तरी शुद्धि मेली नाहीं हेंच सिद्ध केलें पाहिजे.

आणि हें सिद्ध करण्यास कांहीं एक विशेष त्रास, हिंदु बंधुहो ! तुम्हांस घेणें नको. कपटानें किंवा बळानें आम्हांस शुद्धीकरण करावयाचें नाहीं. केवळ प्रामाणिकपणें जे हिंदु राष्ट्रांत परावर्तित होऊन येऊं इच्छित असतील त्यांची पुनः प्रस्थापना करून त्यांस समत्वानें वागविणें, त्यांस आपले म्हणणें, त्यांचा मनःपूर्वक स्वीकार करणें, इतकें केलें कीं पुरे. एक वेळ शुद्धि करण्यास पैसा आणि प्रयत्न यांचें पाठबळ लागेल. तें देण्यास संस्था झाल्या आहेत, होतील. तें काम तुमच्यांतील राष्ट्रनिष्ठ प्रचारक आणि धुरंधर पुरुष करीत आहेत. तुम्हां आम्हां सामान्य लोकांना—प्रत्येक हिंदु मात्रा तुला, त्याची विशेष चिंता नको. तूं केवळ इतकें कर, केवळ इतकें मनांत आण कीं, मी शुद्धीकृत हिंदूचा स्वीकार करणार ! पुरे, हे प्रत्येक हिंदुमात्रा, तूं समाजांत जिथें कुठें असशील त्याचे आजूबाजूस तुझी दृष्टि पोहोंचेल तोंवर इतकें बघ कीं, कोणी हिंदु अनाथ विधर्मीयांच्या पंजांत तर फसत नाहीं ना ? कोणी हिंदु स्त्री एक पाऊल चुकलें म्हणून पापभीतीनें भांबावून आपल्या हिंदु अपत्यासह अनंत पाऊलांच्या घसरणीवर बळानें कोसळून घेऊन धर्मांतराच्या नरकांत पडत नाहीं ना ? असें दिसेल तर त्वरित हिंदु समाजास आणि हिंदु सभांस ती बातमी कळीव. तुझ्या भाग्यीं त्या स्त्रीस धीर देऊन किंवा त्या

अनाथास हात देऊन धर्मांतराच्या गर्तेपासून परत फिरवणें शक्य नसेल तर निदान नुसती बातमी तरी कळीव. जे शुद्ध झालेले असतील त्यांचा हात प्रेमानें हातांत धर, 'बरें आहे ना' इतकें ममत्वानें विचार. संक्रांतीस, दसऱ्यास, दिवाळीस त्यांना नुसतें भेटून रामराम कर आणि फुकटचें सोनें वाट; त्यांस कोणीं हिण-विलें तर त्यांचा पक्ष घेऊन नुसतें इतकें म्हण कीं, "चुकी कोणाकडून घडत नाहीं! पापप्रवणता हा मनुष्यस्वभाव आहे. प्रायश्चित्त हा मनुष्यधर्म आहे. आमचीं पापें अजून लपलेलीं आहेत म्हणून ज्यांचीं उघडकीस आलीं त्यांची प्रमाणाबाहेर निंदा करणें हेंच खरें पतितत्व! पतित? जो हिंदु पतितपावनाच्या मंदिरांत पुनः शिरला तो पावन झालाच. तो माझ्या इतकाच रक्ताच्या बिंदुबिंदुपर्यंत हिंदु झालाच!" पुरे इतकें जरी, हे प्रत्येक हिंदुमात्रा, तूं करशील तरी शुद्धीचें कार्य तुझ्यापुरतें तूं केलेंस असें होईल. याला पैसा नको, केवळ प्रेम हवें. बाँब नकोत, 'मशीनगन्स' नकोत, सेना नको, कारागार नको, प्रयत्न नको, केवळ शुद्धीकृतास मी 'स्वीकारीन' इतकें म्हण कीं कार्य झालें.

कालच आम्हांस एका अत्यंत प्रामाणिक शुद्धीकृताचें पत्र आलें आहे त्यांत ते लिहितात, "संक्रांतीचा मला मिशनरींनीं हिंदुधर्मात प्रविष्ट झालों म्हणून राग न मानितां तिळगुळ धाडला. माझ्या मुलांस दहा दहा रुपयांचा खाऊ धाडला. दर आठवड्यास माझी विचारपूस लांब लांबून ते करितात, यांतील मर्म मी जाणून आहे. परन्तु ते त्यांच्या धर्माच्या झेंड्याखालीं आणण्यासाठीं जर

परकीयांशीं इतकें गोड बोलतात, तर आमच्या हिंदु धर्माच्या ध्वजाखालीं आपण सर्व उभे असतां आमच्या स्वजनांनीं परस्पर तरी किती गोड बोललें पाहिजे ! पण ! मीं आणि माझीं मुलें मार्गानें चाललीं कीं, माझे हिंदु बंधु तिरस्कारानें हंसतात आणि आड वाटेनें निघून जातात. कोणाच्या ओंटीवर आम्हांला अजून बसतां येत नाहीं. सणावारीं सुखाचा शब्द देखील कोणी येऊन विचारीत नाहीं. इतकें जरी आहे तरी मी सुद्धां हिंदु पूर्वजांच्या वास्तूंत येऊन राहिलों आहें, या एका आत्मिक साधनापुढें मला हीं विपक्षाचीं प्रलोभनें आणि स्वपक्षाचा तिरस्कार यांचें कांहींच वाटत नाहीं. 'मी हिंदु आहें' या भावनेचें सुख मला उपभोगितां येतें हें मला पुरे आहे.

आतां शुद्धीकृतांच्या या सामाजिक यातना दूर करण्याचें सर्वस्वी तुमच्या इच्छेवर, केवळ इच्छेवरच अवलंबून नाहीं काय ? त्यांची विचारपूस करण्यास, सणावारीं आपल्या समाजांत त्यांस ममत्व वाटावें अशा रीतीनें त्यांस 'बसा' म्हणण्यास, संक्रांतीस चार तिळगुळाचे दाणे हातावर ठेवून "गोड बोला" म्हणून हंसत मुखानें त्यांस विनविण्यास तुमची कवडी तरी खर्च होणार आहे काय ? यांत एक क्षणभर देखील तुरुंगांत उभें राहण्याचें भय आहे काय ? नाहीं ! नाहीं ! केवळ 'तुम्हांस आम्हीं स्वीकारलें' असें म्हणावयाचें कीं, लाखों शुद्धीकृत तुमचे झाले—जे कोटी कोटी अजून पतित आहेत ते "शुद्धीकृतांस तुम्ही स्वीकारतां" असें पाहतांच आपण होऊन तुमच्यांत आलेच !

इतकें तरी केवळ तुमच्या हातांत आहेना ? यांत इंग्रज आड येत नाहीं, दारिद्य आड येत नाहीं, मरणाचें भय आड येत नाहीं, फांशी आड येत नाहीं, कांहीं नाहीं, तर नुसतें म्हण, ' मीं शिवेन– मीं स्वीकारीन. ' हे हिंदुमात्रा ! तूं एकेकटा जेथें असशील तेथें– इतरांची वाट न पाहतां म्हण कीं, मीं माझ्या कोटि कोटि अस्पृश्यांस शिवेन, मी शुद्धीकृतांस स्वीकारीन–कीं " अस्पृश्योद्धार आणि शुद्धि " हीं दोन्ही अत्यंत महत्वाचीं राष्ट्रकार्यें सिद्धीस गेलीं असें समज !

श्रद्धानंद तुझ्यासाठीं मेले. हे हिंदुमात्रा, तूं हाडाचा हिंदु असशील तर त्यांचा सूड उगविलाच पाहिजे आणि तो केवळ इच्छामात्रें करून उगवितां येण्यासारखा आहे.

म्हण कीं, जो माझा हात मी कुत्र्याचे पाठीवर प्रेमानें फिरवितों तो माझा हात मी भ्रातृप्रेमानें माझ्या अस्पृश्य गणल्या गेलेल्या हिंदुधर्मीयांचें–माझ्या रक्ताच्या, राष्ट्राच्या भावांचे पाठीवरून फिरवीन ! म्हण शिवेन ! कीं अस्पृश्यता मेली आणि तुझ्यापुरता तूं श्रद्धानंदांचा अर्धा सूड उगविलास !

आणि निश्चय कर मी शुद्धीकृत हिंदूस ममत्वानें ' तूं माझा ' म्हणून त्याला म्हणेन. म्हण स्वीकारीन ! कीं शुद्धि दृढमूल झाली आणि तूं तुझ्यापुरता तरी श्रद्धानंदांचा पुरता सूड उगविलास !

तरी श्रद्धानंदांच्या रक्ताची शपथ आहे, हे हिंदुमात्रा ! आतां आज तूं हे दोन्ही शब्द मनःपूर्वक उच्चार कीं, " शिवेन ! आणि स्वीकारीन ! " या दोन शब्दांच्या मनःपूर्वक उच्चारा-सरशीं श्रद्धानंदांचा आत्मा संतुष्ट होईल आणि इतक्यानें शत्रूंचा

जितका भयंकर सूड उगविला जाईल तितका दुसऱ्या कोणत्याहि संतप्त कृत्यानें होणार नाहीं.

इतकें महाग कर्तव्य इतकें स्वस्त कधींहि झालें नव्हतें; म्हणून इतकें तरी कर! हें सर्वस्वी तुझ्या हातचें आहे! म्हण—शिवेन! व स्वीकारीन!

---

# संख्याबल, हेंहि बळच आहे!!

( श्रद्धानंद ता. १७।२।२७ )

असाराणां हि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।
तृणैराबध्यते रज्जुस्तेन नागोपि बद्ध्यते ॥

हिंदु संघटनावर येन केन प्रकारेण कांहीं तरी आक्षेप काढून त्याला विरोध करण्याची चटक ज्या कांहीं लोकांना लागली आहे, त्यांपैकीं कांहींजण अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धि या संघटनाच्या दोन महत्वाच्या उपांगांवर इतर सर्व आक्षेपांचीं तोंडें बंद झालीं म्हणजे असा एक मेणचुणा आक्षेप काढीत असतात कीं, अहो! अस्पृश्य बाटले आणि हिंदुसमाज कमी झाला किंवा पतितांना परावर्तित करण्याचें शुद्धिकार्य अंगीकृत न केल्यानें हिंदुसमाज वृद्धिंगत न झाला तरी काय बिघडलें? नुसत्या संख्येंत काय आहे? आपण जे थोडेबहुत अजून हिंदु आहोंत, त्यांचीच उत्तम प्रकारची उन्नति करवू म्हणजे झालें. मूठभर इंग्रज आज जगावर राज्य करीत आहेत. तेव्हां संख्येंत खरें बळ नसून समाजांतील व्यक्तींच्या

अंगांतील तेजादिक गुणांतच सर्व बळ आहे. म्हणून हिंदु समाजांतील लोक परधर्मात जातात म्हणून निष्कारण आरडाओरड न करतां जातील ते सुखेनैव जाऊं द्यात आणि राहतील तेवढ्यांचीच उन्नति करीत रहा.

येथपर्यंत या आक्षेपकांची भाषा एकरूप असते; परंतु यापुढें त्यांच्यांतील कांहीं लोक आपलीं तोंडें थोडीशीं फिरवून पुढें बोलूं लागतात. जे आक्षेपक 'जुनें तें सोनें' असें समजणारे जुन्या रूढीचे अंध अनुयायी असतात, ते म्हणतात 'अशा रीतीनें हिंदु समाजाची संख्या घटते या भयाचा बागुलबोवा निरर्थक ठरत असल्यानें आणि नुसत्या संख्येंत कांहीं अर्थ नसल्या, तुम्ही अस्पृश्यतानिवारणाचा आणि शुद्धीच्या नव्या रूढि पाडण्याचा खटाटोप सोडून द्या.' या लोकांचा संख्येंत कांहीं अर्थ नाहीं, या सिद्धांतावरून काढिलेला उपसिद्धांत निदान विसंगत तरी नसतो. परंतु या आक्षेपकांत जे कांहीं लोक आयुष्यांत इतर सर्व प्रकरणीं रूढीस धाब्यावर बसवावयास कमी करीत नसतात इतकेंच नव्हे तर रामायण किंवा महाभारत हे इतिहासात्मक ग्रंथ नसून केवळ आध्यात्मिक रूपकें आहेत, शिवाजी, प्रताप इत्यादि आधुनिक राष्ट्रपुरुष तर काय पण राम कृष्ण यांनाहि—जर मी त्यांचे काळांत असतों तर ( आणि जरी त्या खरोखरच देहधारी व्यक्ती असतीलच तरीहि ) त्यांनाहि—तुम्हीं रावण, कंस, अफजुल इत्यादिकांची हत्या केलीत आणि शस्त्र धारण केलें ही गोष्ट हिंसात्मक आणि पापास्पद केलीत म्हणून दोष दिला

असता, असें म्हणण्याइतके जुन्याचे आणि शास्त्रांचे आणि रूढीचे कट्टर विरोध असतात ते, संख्येंत कांहीं अर्थ नाहीं या सिद्धांतावरून, अस्पृश्यतानिवारणाविरुद्ध एक अक्षरहि न बोलतां, केवळ शुद्धीविरुद्ध मात्र त्या आक्षेपाचा उपयोग करितात आणि म्हणतात, 'अहो संख्येंत काय आहे! जे हिंदु धर्मांत गेले किंवा जात आहेत ते जाईनात. त्यांना परत घेण्याची नसती उठाठेव करून परधर्मीय—आणि विशेषत: मुसलमान समाजाचीं मने कां दुखवितां! वाटवूं द्यात ना त्यांना हिंदूस. त्यांच्या बाटविण्याच्या तडाख्यांतून जे आपण उरलों आहोंत किंवा उरूं, त्यांची शारीरिक, मानसिक, आत्मिक इत्यादि सर्व प्रकारची उन्नति आपण केली कीं, पुरे! नुसत्या संख्येंत काय आहे! खरें बळ गुणांत आहे. म्हणून सोडा ती शुद्धि आणि तें संघटन.'

या आक्षेपकांतील वर वर्णिलेल्या दोन पोटजातींपैकीं जो पक्ष रूढीचा अंध अनुयायी असल्यानें अस्पृश्यता आणि शुद्धि या दोन्हीं चळवळींविरुद्ध बोलतो, त्याचा तो आक्षेप कितीहि भ्रामक असला तरी निदान सुसंगत असतो. परंतु या दुसऱ्या पक्षाचा, संख्येच्या बळांत कांहीं अर्थ नाहीं हा आक्षेप जेव्हां केवळ शुद्धीविरुद्धच आणण्यांत येतो आणि तोहि विशेषतः मुसलमानांना हिंदु करून घेण्याच्याविषयीं तीव्रतेनें पुढें आणण्यांत येतो तेव्हां तो केवळ भ्रामक असतो, इतकेंच नव्हे तर अगदीं मेणचुणा असतो. कारण या वर्गांतील लोक अस्पृश्यतानिवारणासाठी अकांडतांडव करीत असतात. इतकेंच नव्हे तर त्यांच्यांतील कांहीं लोक अस्पृ

ऱ्यांबरोबर प्रकटपणें अन्नपानादिक व्यवहारहि करतात. त्यांना सुधारणेचा बाऊ वाटत नसतो. ते प्रचलित राजकारणांत मुरलेले असतात. मुसलमान, ख्रिश्चन, इतकेंच काय पण जगांतील प्रत्येक समाज आणि संस्कृति आपआपली संख्या वाढविण्याच्या खटपटींत आहेत हें त्यास अवगत असतें. परंतु इतकें असूनहि ते जेव्हां केवळ शुद्धीविरुद्धच काय तें ' संख्येंत काय आहे' म्हणून रडगाणें गाऊं लागतात, त्यांतहि मुसलमान चिडतात म्हणून ' शुद्धि सोडा' या ध्रुवपदाच्या ठेक्यावर जेव्हां ते रडगाणें गातात, तेव्हां त्यांचा तो आक्षेप जवळजवळ अप्रामाणिकच असतो. मुसलमानांस कसेंबसें आपल्या पक्षास ओढून आणण्यासाठीं योजलेली ती एक युक्ति असते. पण ती इतकी आत्मघातकी असते कीं, तिचे भयंकर परिणाम गेलीं सहा वर्षें हिंदुसमाजास भोगावे लागल्यानें त्याची अपरिमित हानि झालेली आहे आणि तरीहि अजून जेव्हां " नुसत्या संख्येंत काय आहे " म्हणून हे लोक साळसूदपणें उपदेशीत शुद्धीविरुद्ध लोकांचा बुद्धिभेद करण्याचें अमंगल कार्य करण्यास मागें पुढें पहात नाहींत, तेव्हां त्यांच्या या कोटिक्रमाचा एकदां पुरता समाचार घेऊन टाकणें आतां अगदीं अवश्य झालें आहे.

संख्येंत काय आहे : सोडा ती शुद्धि : या आक्षेपांस वर आम्हीं दर्शविलेल्या हिंदूंतील दोन वर्गांप्रमाणेंच हसननिझामी आदि करून मुसलमानहि उपदेश देत असतात हें प्रथमतः ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. हसन निझामी आदि लबाड प्रचारक आपणें

स्वतः मुसलमानांची संख्या वाढविण्याचें काम अव्याहत आणि अनेक सुष्ट दुष्ट उपायांनीं चालवीत असतां केवळ हिंदूंस मात्र जेव्हां शिष्टपणाचा आव घालून उपदेश देतात कीं, " हिंदूंनो, शुद्ध करून घेण्याच्या भानगडींत पडून आम्हां मुसलमानांचें व्यर्थ वैर कां संपादन करतां ? तुम्ही अजूनहि बावीस कोटि आहांत ! आहांत त्यांचीच उन्नति आणि गुणवर्धन करा म्हणजे झालें. आणखी शुद्धीच्या झंजाटास कां मागें लावून घेतां ? संख्येंत तें काय आहे ? " तेव्हां या त्यांच्या मार्जारसाधुत्वांतील मर्म इसापनीतींतल्या त्या कोंबडीसारख्या भाबड्या प्राण्याच्याहि ध्यानांत येण्यासारखें असतें. पण तरीहि तें ध्यानांत आलें नाहीं असें भासवून मुसलमानांच्या रोषास भिणारे आणि स्वकीयांच्या विरुद्ध जें तोंडास येईल तें बकणें म्हणजेच साधुपणा होय अशी घातक समजूत करून घेतलेले हिंदूंतीलच कांहीं लोक त्या विपक्षाच्या ढोंगी कोटिक्रमाचीच री ओढून हिंदूंस सांगतात, " अरे, खरेंच संख्येंत काय आहे ! आपलें गुणबळ वाढवा ! "

परंतु नुसत्या संख्येंत जर खरेंच कांहीं एक नसेल तर मग हे थोर पुरुष हें आपलें नवाविष्कृत महान् तत्त्व प्रथमतः त्यांच्या आवडत्या मुसलमान आणि ख्रिश्चन बंधूंस कां शिकवीत नाहींत ! एखाद्या वैद्यापाशीं एखाद्या घातक रोगावर रामबाण औषध असेल तर तें औषध ज्यांस तो रोग झालेला नाहीं किंवा होतो आहे किंवा नाहीं याचें निदानहि निश्चित ठरलेलें नाहीं, त्याचे गळीं बळाबळानें ओतीत बसण्यापेक्षां त्या वैद्यानें जे त्या रोगानें इतके

पछाडले गेलेले आहेत कीं, त्यांस त्यांतून वांचविण्यासाठीं त्वरित कांहीं औषध न मिळालें तर त्या रोगास ते सर्वस्वी बळी पडण्याचें संकट ओढवणार हें निश्चितपणें दिसत आहे, त्यांचे घरीं प्रथम जाऊन त्यांस त्या मात्रेचे वळसे देणें हें अधिक भूतदयेचें आणि समयोचित कृत्य होईल नव्हे काय? हिंदूंच्या शुद्धीचें विचारीचें कायः आठवड्यास कुठें दहा बारा लोक देखील साऱ्या हिंदुस्थानांत संख्याबळासाठीं शुद्ध केले जात नाहींत. हें लहानसें हिंदूंच्या डोळ्यांतील कुसळ आपल्या सूक्ष्म दृष्टीस दिसतें आणि तें काढण्यास आपण डोळ्यांचें विच्छेदन ( operation ) करण्यासाटीं हें तात्त्विक शल्य खुपसूं लागले आहांत हे आपले उपकार आहेतच. पण आमचें आपणांस सांगणें आहे कीं, त्या आमच्या मुसलमान बंधूंच्या आणि मिशनऱ्यांच्या डोळ्यांत तें संख्याबळ वाढविण्याच्या लालसेचें भलें मोठें मुसळ घुसून ते पहा कसे अगदीं कासाविस झालेले आहेत. तर त्यांस प्रथम त्या यातनेपासून मुक्त करण्याचा प्रयत्न आपल्यासारख्या भूतदयेच्या भोक्त्यांनीं करावा. आमच्या डोळ्यांत शिरलेल्या या शुद्धीच्या कुसळाची कळ आम्ही थोडा वेळ सोसूं. पण आमच्या मुसलमानादिक बंधूंच्या डोळ्यांतील त्या तंझीम आणि तबलिघ आणि मिशनांच्या बहालाएवढ्या मुसळांच्या कळेनें ते पहा अगदीं विव्हळ होत आहेत. लवकर उपाय न झाल्यास त्यांचे बुद्धीचे डोळे अगदीं धर्मांध होणार आहेत--झालेच आहेत. तर उपकारी गृहस्थ हो, प्रथम आपण आपलीं रामबाण औषधि घेऊन

तिकडे धांवा आणि त्यांस सांगा कीं, "वेड्यांनो, संख्याबळ म्हणजे कांहीं खरें बळ नव्हे, गुणबळ हेंच खरें बळ आहे. सोडा ती तंझीम आणि बंद करा तीं मिशनें!" तें पहा, गुजराथेंत आगाखानी मुसलमान हिंदूंना बाटवून आपलें संख्याबळ वाढविण्याच्या रोगानें इतके पछाडले आहेत कीं, हजारों, लाखों रुपये खर्चून हिंदु धर्मावर अवास्तव आणि दुष्ट आरोप करणारीं चोपडीं हजारांनीं वांटीत आणि भावड्या हिंदूंतील शेंकडों अर्भकांस मुसलमान करीत हिंडत आहेत. तें हसन निजामीचें जाळें पहाः वेश्यांकडून देखील नीच वासनांच्या साधनांचाहि उपयोग करून हिंदूंस मुसलमान बनविण्यास कचरत नाहीं. त्या सिंध बंगाल्यांतील मुसलमानांच्या टोळ्या पहाः तरवारीनें, सुरीनें, बलात्कारानें हिंदु कुमारिका भ्रष्टवून हिंदु मुलें पळवून दर आठवड्यास केवढा उत्पात करीत आहेत. न्यायालयें देखील त्यांस शिक्षा देऊन थकत आलीं. तीं दिल्लीचीं मुसलमानी परिषदांतील भाषणें आणि ठराव पहाः महमद अल्लीपासून तों गांवगुंडापर्यंत प्रत्येक मुसलमानानें निदान दहा बारा हिंदूंना तरी बाटविलेंच पाहिजे, म्हणून आक्रोश करीत आहेत—कारण मुसलमानांची संख्या हिंदुस्थानांत हिंदूंहून अधिक केली पाहिजे! दोन वर्षांत सात कोटि मुसलमानांचे पंधरा कोटि करूं, पंधरांचे सत्रा कोटि करूं, सत्राचे वीस कोटि करूं म्हणजे अधिक अधिकार—हिंदुस्थानचें स्वामित्व—राज्यच आपल्या मुसलमानी हातांत येईल! ही स्पष्ट भाषा, या स्पष्ट प्रतिज्ञा, चालल्या आहेत! हीं मिशनें पहा—मुंबई कलकत्या-

सारख्या मोठमोठ्या नगरांपासून तों आसाम, छोटा नागपूर येथल्या जंगलांपर्यंत हिंदूंना ख्रिश्चन करण्याचा आणि ख्रिश्चनांची संख्या यावर्षी इतकी वाढली म्हणून इंग्लंड अमेरिकेंत उत्सव करण्याचा त्यांचा धूम धडाका चालला आहे. प्रत्येक वर्षी कमींत कमी दहा लाख लोक ख्रिश्चन समाज खाऊन पचवून सारखा वृद्धिंगत होत आहे आणि ते दहा लाख काय सद्गु-णांचे अगदीं मूर्तिमंत पुतळे तेवढेच निवडून त्यांस आपल्या समाजांत ते अंतर्भूत करून घेतात कीं काय ? छट् ! दुष्काळांतील मरणाचे दारीं बसलेल्या बायाबापड्यांपासून तों दहा दहादां शिक्षा आणि फटके आणि सश्रम कारावास भोगून ज्यांच्या पायांस चोरी-साठीं पडलेल्या बेड्यांचे घट्टे पडले आहेत अशा सज्जनांपर्यंत जो हातीं सांपडेल त्या हिंदूस धर, कीं कर ख्रिश्चन असा सपाटा त्यांचा चालला आहे.

हें काय आपणांस दिसत नाहीं ? हिंदूंच्या डोळ्यांतील आठ-वड्याकांठीं दहा पांच परधर्मीय लोकांस शुद्ध करून घेण्याचें हें शुद्धीचें लहानसें कुसळ ज्या आपल्या दृष्टीच्या टापूंत धूमकेतू-सारखें विस्तार पावून दिसूं शकतें, त्या तुमच्या दृष्टीस हें मुसल-मानांच्या आणि मिशनरींच्या संख्या वाढविणाऱ्या अट्टाहासाचें डोंगराएवढें मुसळ दिसत नाहीं, असें होणें शक्य नाहीं. मग आपण त्यांच्या तबलीघ परिषदांतून आणि मिशन हॉलमधून जाऊन कां व्याख्यानें देत नाहीं की " संख्याबळ तुच्छ आहे, वेड्यांनो ! तुम्ही नुसती संख्या कशास वाढवितां ! घेऊं द्या "

हिंदून तुमच्यांतले लोक शुद्ध करून. तुमची संख्या कमी झाली तर उरतील त्यांचें गुणबळ वाढविण्याचें कार्य तुम्हांस अधिकच आटोपसर आणि सुखावह होईल ! ”

हे जिना पहा, ते अबदुल रहीम पहा, ते गझनवी पहा, हा कारागृहांतून चोरीच्या दहा शिक्षा भोगून अकरावी चोरी करण्याची संधि साधितां येईतों खिलाफतचा स्वयसेवक होऊन भटकणारा गांवगुंड पहा—जो तो मुसलमान, ' संख्या ! संख्या ! ' म्हणून गर्जत आहे. आमची संख्या अधिक आहे म्हणून पंजाबांत वा बंगाल्यांत आम्हांस हक्काच्या अधिक जागा द्या ! आमची संख्या कमी आहे म्हणून मुंबई, मद्रासकडे विशिष्ट हितसंरक्षणार्थ अधिक जागा द्या ! गांवांत आमची संख्या इतकी म्हणून लोकलबोर्डांत जागा द्या, नगरांत इतकी संख्या आहे म्हणून नगरसंस्थेंत, इलाख्यांत संख्या इतकी म्हणून विधिमंडळांत अधिक जागा द्या. गव्हर्नराच्या जागेपासून तों पट्टेवाल्यापर्यंत आमची संख्या इतकी, म्हणून इतक्या आमच्या जागा राखून ठेवा ! म्हणून जिकडे तिकडे मुसलमानी तोंडांतून, डोक्यांतून, मनांतून “ संख्या ! संख्या वाढवा ! संख्या ! ” असा एकसारखा गडगडाट चाललेला आपल्या, शुद्धीची बारीक पिपाणी ऐकूं येईल इतक्या सूक्ष्म तंतूंनीं गठलेल्या कानांस ऐकूं येत नाहीं का ? मग त्यांस आपण जाऊन आपलें हें अमोलिक तत्व कां उपदेशीत नाहीं ? मुसलमान माझे बंधु आहेत, खिश्चन माझे स्नेही आहेत म्हणून म्हणणाऱ्या भूतदये ! संख्याबळाच्या वेडानें पिसाळून गेलेल्या या भूतांकडे तुझ्य

कृपेचा फेरा थोडा कां वळवीत नाहींस? प्रत्यहीं संख्याबळाचे नांवावर हिंदूंचीं मुलें आणि कुमारिका त्यांच्यांतील गुंडांकडून पळवून नेल्याच्या बातम्या प्रत्येक पत्रांत आणि खटले कित्येक न्यायालयांत येत असतां तुझ्या पत्रांतून किंवा तोंडांतून त्याचा उल्लेख देखील होत नाहीं हें कसें? हिंदूंवरच तुझी एवढी कृपा कां! थोडी दया कर आणि हिंदूंच्या बोकांडींच असें येतां जातां न बसतां, त्या संख्याबळाच्या वेडानें जर्जर झालेल्या तंझीम—तबलीवकडे आपला थोडा कटाक्ष टाक! हे वैद्यराज, कृपा करून आमचा आपणांस थोडासा विसर पडूं द्या!

प्रथम प्रथम शुद्धीची चळवळ निघाली तेव्हां तिच्यावर किंवा अस्पृश्योद्धारावर असे पोकळ आक्षेप येणें साहजिक होतें. पण श्रद्धानंदांच्या हत्येनतरहि शुद्धीसंबंधानें लिहितांना जेव्हां हे लोक गंभीरपणें उपदेश देण्याचा आव घालितात कीं, नुसत्या संख्याबळांत काय आहे, तेव्हां त्यांस एकदां खडकावून सांगणें भाग आहे कीं, तुमच्या म्हणण्याप्रमाणें शुद्धि ही नुसत्या संख्याबळाचे वाढीसाठीं आहे असें गृहीत धरलें तरीहि ती अवश्यच आहे. कारण संख्याबळ हेंहि बळच आहे. प्रथमतः हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, जर समाज असेल तरच त्याच्यांत गुणबळ वाढविण्याचा प्रश्न उद्भवतो. परधर्मीयांच्या सहस्र वर्षें चालत आलेल्या आणि प्रतिकार न केला तर आणखी अनेक वर्षें चालू पाहणाऱ्या प्रबळ दंडेलीनें एकेक करून सर्व हिंदु परधर्मांत लुटून नेले गेले, तर मग गुणबळ वाढविणार तरी कोणामध्यें? गुणाला अधि-

स्थानच जर नाहींसें झालें, ▼.‹ हिंदु समाजच उरला नाहीं, तर उन्नति तरी कोणाची करावयाची? जे उरतील त्यांची म्हणाल तर उरले आहेत तेहि गेले, त्याच्याप्रमाणेंच–प्रतिकार न केला तर–नष्ट किंवा भ्रष्ट होऊन जाणार. दुसरें कारण असें आहे कीं, कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा समाजाच्या गुणबळाच्या वाढीला मर्यादा आहे. मुंगीला शारीरिक आणि मानसिक वाटेल तितका खुराक चारला, तरी ती हत्ती होऊं शकणार नाहीं. गवताची काडी कितीहि खत घातलें तरी गवताची काडीच राहणार. तिला जर हत्तीला बांधावयाचें असेल तर गुणवर्धनाची मर्यादा संपूनहि जें बळ तिला संपादन करणें गुणवर्धनाच्या नैसर्गिक कक्षेच्या बाहेर असल्यानें अशक्य होतें, तें संख्याबळानेंच पुरें करून घ्यावें लागतें. गवताची काडी जरी काडीच राहिली तरी तशा अनेक काड्या, काथ्याचीं अनेक तुसें आणि दोऱ्यांचीं जुडगीं एकत्र करून म्हणजे त्यांचें संख्याबळ वाढवूनच, त्याचा एक संघटित नाडा किंवा दोरखंड बनवितां येतो आणि तो मात्र हत्तीला बांधू शकतो. भाताचें एकच रोपटें लावून त्याचें गुणवर्धन करण्याकरितां किती जरी प्रयत्न केला तरी त्याचेपासून एका कुटुंबाचें तर राहोच पण एका मनुष्याचें पोट भरण्याइतके दाणे उत्पन्न होणें दुर्घट आहे. पण तशीं अनेक रोपटीं लावून शेती केली तर तत्काल खंडीभर भात उत्पन्न करतां येतें. त्यांच्या संख्याबळाचे वर्धनानेंच उदरपोषणाची कामगिरी त्यांचेकडून करून घेतां येते. जर एखादे सज्जन गृहस्थ म्हणाले कीं, 'अरे, पोतीं भरभरून तांदूळ एकत्र

करण्याच्या खटपटींत कां पडतोस ? खुळा आहेस. संख्याबळ तुच्छ आहे. ह्या एक तांदुळाचा दाणा मी घेतों, त्याचे गुणवर्धनाकडे लक्ष पुरवितों आणि त्याचा तपेलीभर भात करून तुला देतों, थांब--नेऊं देत ते बाकीचे पोतीं पोतीं दाणे चोरांना. नाहींतर ते चोर रागावतील. ' तर त्याचे ते गुणवर्धनाचे प्रयोग यशस्वी होऊन त्या तांदुळाच्या एका दाण्याचा तपेलीभर भात होणें जितकें दुर्घट आहे, तितकेंच, बाटवूं द्यात जे बाटविले जातील त्यांना, आपण आपले जे उरत राहतील त्यांच्या गुणवर्धनाकडेच सर्व लक्ष देऊं असें म्हणणाऱ्यांचें हें तत्वज्ञानहि पोंचट आणि वेडसर आहे.

आणि म्हणूनच मोठमोठ्या दसहत्यारी अवतारांना मुद्धां संख्याबळाचा पाठिंबा घेतल्यावांचून आपल्या विपक्षीय समाजाशीं टक्कर देतां आली नाहीं. एवढे एकबाणी, अवतारी रामचंद्र; पण वानरांचे संख्यादळ त्यांस पाठीशीं घ्यावें लागलें तेव्हां लंकेवर स्वारी करतां आली. वानरांसारख्या असंस्कृत योनींतील प्राण्याचेंहि पाठबळ त्यांना घ्यावें लागलें--ते स्वतः अवतारी असून ! नुसतें गुणबळ संख्याबळांवांचून इतकें पंगु आहे. रावण तरी शरीरगुणवर्धनाची पराकाष्ठा होता. वीस हात आणि दहा शिरें ! पण हजारों राक्षसांचे संख्याबळावांचून लंका त्यास लढवितां आली इतके दिवस देखील लढवितां आली नसती. सुदर्शनधारी कृष्ण--पण एकट्यांना महाभारत लढवितां आलें नाहीं. सव्यसाची अर्जुनापासून तों राक्षसी घटोत्कचापर्यंत शेंकडों जणांचें आणि लक्षावधि सैनिकांचें संख्याबळ एकत्र करावें लागलें. गुणोत्कर्ष पावलेल्या श्रीकृष्णासारख्या विभू-

तींनाहि संख्याबळाची अगदींच उपेक्षा करविली नाहीं. तो महंमद पैगंबर पहा, मक्केंत एकटा होता तरी तो पैगंबरच होता; पण संख्याबळापुढें इतका दीन होता कीं, निमाज चोरून पढावा लागे. पण दास, दरिद्री, जे गुणी अवगुणी मिळतील ते अनुयायी जुळवीत जेव्हां तो मदिनेचें संख्याबळ पाठीशीं घेऊं शकला, तेव्हां मक्केंत प्रकट निमाज पढूं शकला. त्यासहि संख्याबळाची जाणीव होती म्हणूनच वाटेल त्या आभिघानें मुसलमानी समाजाचें संख्याबळ वाढण्यासाठीं तो त्यांचें गुणबळ वाढविण्याइतकाच झटला. मुसलमानी इतिहास तर संख्याबळाच्या लालसेच्या लाल शाईंतच लिहिलेला आहे. आफ्रिकेंत कोणताहि भाग जिंकिला गेला कीं, मुसलमान विजेता जी खंडणी मागे ती अर्धे पैसे आणि अर्धा त्या जित जातींच्या बायका घेऊन वसूल करण्यांत येई. कारण त्या बायकांत मोजून घेतलेल्या खंडणीची लूट त्या मुसलमानी सेनेच्या शिपायांत वांटली जाऊन तीपासून मुसलमानी संतति वाढे—संख्याबळ वाढे. चोर, पोर, पापी अशांनाहि बलात्कारानें वा लालचीनें जें अजून मुसलमान वा ख्रिश्चन करून घेण्यांत येतें, तें कांहीं तत्काळ त्या व्यक्तीचें गुणवर्धन करण्यासाठीं किंवा तशा नीच माणसांस समाजांत घेतल्यानें समाजाचें गुणवर्धन होतें म्हणून नव्हे तर मुख्यतः संख्यावर्धन होतें म्हणूनच होय. आणि आज जे त्यांचे कोटि कोटि अनुयायी जिथें त्यांचा एकहि अनुयायी दिसत नव्हता तिथें दिसत आहेत आणि डोईजड झालेले आहेत, ते त्यांच्या या संख्यावर्ध-

नाकडेहि पूर्ण लक्ष देणाऱ्या धोरणामुळेंच होत हें कोण नाकारूं शकेल ? जर हें संख्याबळ वाढविण्याचें चढाऊ धोरण न स्वीकारिता, तर महंमद पैगंबर मरेतों एकटा महंमदच राहिला असता-आज वीस कोटि मुसलमान जे जगभर विखुरले आहेत ते क्वचित्च दिसले असते. गेल्या महायुद्धांत जर्मन लोक काय सैनिक गुणबळांत इतर विपक्षीय राष्ट्रांहून कमी होते ? शास्त्र, शस्त्र आणि शूरता यांत व्यक्तिशः वा समाजशः ते कांकणभर अधिकच होते. पण त्यांच्यावर जी त्यांच्या विपक्षानें कुरघोडी केली ती मुख्यतः संख्याबळानेंच नव्हती काय ? अमेरिका युद्धांत पडल्यानें संयुक्त राष्ट्रांचें संख्याबळ एकाएकीं जर्मनीच्या एकाकी संख्याबळापेक्षां आवांक्याबाहेर अधिकता पावलें हेंच त्या पराजयाचें एक प्रमुख कारण आहे. अशी धडधडीत वस्तुस्थिति दिसत असतां आणि विपक्षीय लोक संख्याबळ वाढविण्याचे आटोकाट यत्न करीत असतां हिंदूंस तेवढें सांगणें कीं, " संख्येंत काय आहे ! बाटूं द्या ! लुटूं द्या ! तुम्ही आपले जे उरतील त्यांचें गुणबळ वाढवा म्हणजे झालें ! " ही आत्मवंचनेची पराकाष्ठा नव्हे काय ? पाळण्यापाशीं आजीबाई सांगतात त्या गोष्टींतील तो विशाल राक्षस–एकेका मुठींत दहा दहा माणसें धरणारा !–त्या राक्षसावर विश्वास ठेवणाऱ्या अल्लड मुलाला देखील हें कळतें कीं तो राक्षस मुठींत सर्व कांहीं मावणार नाहीं आणि त्याचा समाचार घेण्यास कांहीं तरी उरूंच !–पण संख्याबळाच्या महत्त्वाची ही इतकी साधी गोष्ट देखील या प्रतिष्ठित आणि सुज्ञ अल्लडांस कळूं नये ही केवढी

आश्चर्याची गोष्ट आहे ? किंवा आश्चर्याचीहि नाहीं: मुसलमानांस संतुष्ट ठेवावयाचें तर शुद्धीविरुद्ध कांहीं तरी बोललेंच पाहिजे. शुद्धीविरुद्ध न्याय्य अधिकाराच्या दृष्टीनें तर आतां कांहींच बोलणें शक्य नाहीं. तेव्हां या पुष्पित वाचेनें तरी तिचा निषेध केला गेला तर पहावें म्हणून हीं असलीं धडधडीत मेणबुणीं विधानें केलीं जातात कीं, हिंदूंनो जाऊं द्या ती शुद्धि ! हें पहा, संख्येंत काय आहे ! कोटि कोटि बाटले तर बाटूं द्यात. आपण आपले मूठभर जे राहूं तेच गुणबळानें वाढून वाढून वाढून—जणुं काय तोंवर इतर लोक गुणबळांत कमी कमीच होत जाणार आहेत ! तेहि गुणबळांत वाढतच जाणार आणि समान गुणांची झोंबी जुंपली म्हणजे अखेर संख्याबळाच्या प्रश्नावरच मुख्यत्वेंकरून राष्ट्राच्या व समाजाच्या जीवनमरणाचा प्रश्न अवलंबून राहणार.

परंतु त्यांतहि जर कोणी असें म्हणत असता कीं, आम्हांस नुसतें संख्याबळच वाढवावयाचें आहे तर एक वेळ हें उत्तर शोभतें कीं, आम्हांस नुसत्या संख्याबळानें सर्वत्र काम भागणार नाहीं. गुणबळाकडेहि दृष्टि दिलीच पाहिजे. परंतु शुद्धीची चळवळ किंवा अस्पृश्यतानिवारणाची खटपट ही केवळ संख्याबळाचे वर्धनासाठींच चाललेली आहे हें या आक्षेपकांस कोणीं सांगितलें ?

---

**गोडें व खोबरेल तेलाची वखार**—या ठिकाणीं बाजारभावाप्रमाणें फेणीचें व इतर तेलें मिळतील.

**आर. एस. लेले,**
**ठाकुरद्वार** नाका, मुंबई नं. २.

## २ संख्याबळच तेवढें आम्हांस पाहिजे आहे आणि गुणबळ नको आहे हें तुम्हांस कोणीं सांगितलें ?

गुणबळानें बरीच श्रेष्ठ अशी एक शंभर लोकांची टोळी घेतली, त्यांत प्रत्येक मनुष्य श्रीकृष्णासारखा चतुर आणि भीमासारखा बलवान् आहे असें गृहीत धरलें, तरीहि जर त्यांच्यावर या गुण-बळांत व्यक्तिशः पुष्कळ कमी असणाऱ्या एक हजार लोकांची टोळी तुटून पडली तर त्यांचा फन्ना उडाल्यावांचून राहणार नाहीं. टोळ, मनुष्यांपेक्षां गुणबळांत किती कनिष्ठ—यःकश्चित् कीट. परंतु जेव्हां तशा, असाराणाम् हि वस्तूनां संहतिः—ह्या टोळांच्या अगणित, संख्येची संहत धाड मनुष्यांवर पडते तेव्हां गांवेंचीं गांवें आणि प्रांतचे प्रांत ओसाड करून नेघून जाते. शिवाजी, रामदास गुणबळाचे—दैवी गुणबळाचे पुतळे होते—पण अफजुल्लापासून तों औरंगजेबाच्या सेनेपर्यंत त्यांस एकट्यांस कांहीं तोंड देववलें नाहीं. पुंडपाळे गारापर्यंत हजारों साधारण माणसांचें संख्याबळ एकत्र करूनच तें कार्य संपादावें लागलें. ही धडधडीत दिसणारी गोष्ट डोळ्याआड कर-ण्याची एकच चलाखी, हे शुद्धिसंघटनावरील बकवादी आक्षेपक करीत नाहींत, तर त्यांच्या " संख्याबळांत काय आहे, गुणबळ वाढवा " या कविराज किंवा भावड्या उपदेशांत आणखी एक हेत्वाभास भरलेला असतो. तो हा कीं, संघटनाच्या पुरस्कर्त्यांना

३५६०.

गुणबळ जणुं काय नकोच आहे; केवळ संख्याबळ वाढविण्याच्या मागें लागूनच त्यांची खटपट चाललेली आहे! पण आक्षेपकांत जे कोणी ही गोष्ट खरीच आहे असें मानण्याइतके भोळे असतील त्यांस आम्हीं आश्वासन देतों कीं, संघटनाच्या चळवळीचें प्रमुखांतील प्रमुख ध्येय म्हणजे वैय्यक्तिक आणि राष्ट्रीय गुणबळ वाढविणें हेंच आहे. आम्हांस आपल्या हिंदु राष्ट्राचें संख्याबळ तर वाढवावयाचें आहेच; पण आम्हांस त्यांचें राष्ट्रीय गुणबळहि वाढविणें आहे.

'संघटन' हा शब्द गुणबळवाचक नाहीं काय? राष्ट्रीय गुणांत श्रेष्ठांतील श्रेष्ठ प्रवृत्तींत संघटनाची गणना केलीच पाहिजे. ज्या हिंदूंत हिंदुत्व भावनेनें, स्वराष्ट्रभावनेनें प्रेरित झालेलें संघटन होत आहे त्यांचें राष्ट्रीय गुणबळ वाढत आहे. दुसरी गोष्ट अस्पृश्योद्धाराची घ्या. नुसतें संख्याबळ वाढवावें म्हणून कांहीं अस्पृश्यतानिवारण चाललेलें नाहीं. त्याचें कार्य तुमच्या डोळ्यासमोर आहे. बेळगांवच्या राष्ट्रीय सभेंत अस्पृश्यतानिवारण केलें पाहिजे म्हणून ठराव झाला. परंतु त्यांतील हजारों लोकांतील कितींनीं त्याप्रमाणें अस्पृश्यता सोडली? खादींत मढलेल्या लोकांचा विरोध, जेव्हां प्रत्यक्ष अस्पृश्यांत मिसळण्याचा प्रसंग येई तेव्हां, मुगटा नेसलेल्या सोंवळ्या भिक्षुकांहून कमी तीव्र नव्हता हें प्रत्येक अस्पृश्यतानिवारकास माहीत आहे. पण तीच चळवळ हिंदुसंघटनाचे पुरस्कर्त्यांनीं हातीं घेतांच केवढा फरक झाला हें पहा. अनेक ठिकाणीं संघटनाच्या वतीनें अस्पृश्यांच्या शाळा चालल्या आहेत; त्यांचीं

महारवाड्यांत जाऊन भजनें होत आहेत; त्यांच्यावर होणाऱ्या जमीनदारादिकांच्या छळापासून त्यांची सुटका करण्यासाठीं न्याया-लयांत त्यांची दाद फुकट लावून दिली जात आहे; त्यांच्यासाठीं प्रशस्त भूमि खरेदी करून सुंदर झोंपड्या बांधून प्रत्येकींत आरोग्य आणि स्वच्छतावर्धक साधनें ठेवून त्यांच्या स्वतंत्र वसाहती वस-विण्यांत येत आहेत. दुष्ट आहारापासून त्यांस निवृत्त करण्यांत येत आहे. सार्वजनिक सभांतून, नगरसंस्थांतून त्यांचा प्रवेश करवून दिल्यानें त्यांच्या राष्ट्रीय भावनेचा आणि अनुभवाचा विकास होत आहे. त्यांच्या हक्कांच्या स्थापनेसाठीं जुटीनें सत्याग्रह केले जात आहेत. या सर्व चळवळी जीं हिंदुसंघटनाचीं पुरस्कर्तीं माणसें करीत आहेत, तीं काय त्या अस्पृश्यांचें गुणबळ वाढवीत नाहींत? नगरेंची नगरें आणि गांवेंचीं गांवें आज वरील चळ-वळी प्रत्यक्ष आचरणांत आणून अस्पृश्यांचे पूर्ण स्पृश्य करून सोडीत आहेत. आणि त्या त्या मानानें शिक्षणाच्या, स्वाभिमा-नाच्या, राष्ट्रीय भावनेच्या, स्वच्छतेच्या, आरोग्याच्या, संघटित-पणाच्या गुणांचा विकास त्या पूर्वास्पृश्यांत होत आहे. तीच स्थिती हिंदु संघटनानें हातीं घेतलेल्या शारीरिक बळाच्या प्रयत्नांची होय. ही हिंदु जागृति झाल्यापासून ठिकठिकाणीं नव्या व्यायाम शाळा उघडल्या जात आहेत. आणि हजारांनीं विद्यार्थी त्यांत सांघिक आणि सैनिक शिक्षण घेत आहेत. ही काय शारीरिक गुणबळाची वाढ नव्हे? तीच स्थिति स्पृश्य वर्गाच्या अंतःसुधारणेची. बाल-विवाह बंद करावयास हिंदु संघटन झटतें; जातीजातींतील मूर्ख

मत्सर आणि भेदभाव दूर करून हिंदुमात्र तितका एकतेच्या राष्ट्रीय भावनेनें उत्स्फूर्त करण्यास झटतें; गीताजयंति, शिवजयंति इत्यादि राष्ट्रीय वृत्ति आणि थोरपण हिंदु जनतेंत संचरवितें; देवालय सुधाराची चळवळ करतें; कुंभमेळे आणि इतर यात्रोत्सव यांत सुव्यवस्था ठेवून मोठमोठ्या विद्वानांकडून धर्माचें, तेजाचें, इतिहासाचें शिक्षण लाखों लोकांत प्रसृत करतें—हें सर्व काम हिंदु राष्ट्रांत गुणबळ वाढविण्यासाठींच करण्यांत येत नाहीं काय? शुद्धीची चळवळ म्हणजे तर संख्याबळ आणि गुणबळ हिंदु समाजांत एकसमयावच्छेदेंकरून वृद्धिंगत करणारी परमौषधि होय. जेव्हां परधर्मांत केवळ हिंदु समाजाच्या कूपमंडूकवृत्तीनें, अहिंदूंच्या बलात्कारानें राहिलेला एक मनुष्य परत हिंदु समाजांत स्थापित करण्यांत येतो, तेव्हां त्या एका झटक्यासरशीं हिंदु समाजांतील अनेक दुर्गुणांवर एकसहा आघात करण्यांत येतो आणि त्या मानानें तितकें गुणबळ वाढतें. शुद्धीकृत मनुष्यांत त्या संस्कारानेंच हिंदु पूर्वजांविषयीं, हिंदुस्थान देशाविषयीं, हिंदु संस्कृतीविषयीं ममत्व-बुद्धि आणि पूज्यबुद्धि उत्पन्न होते, हा त्याचा राष्ट्रीय गुणविकास होतो. हिंदु समाजांतील पूर्वींची कूपमंडूकवृत्ति त्या मानानें नष्ट होते, अतिरेकी जातिभेदाचीं बंधनें त्या मानानें सैल होतात, हिंदु-मात्र तितका आपला बंधु आहे ही भावना उदय पावते, जुन्या रूढींचे पाश राष्ट्राला घातक होऊं लागतांच ते तोडून टाकणारें धैर्य उत्पन्न होतें, उभ्या समाजांत खळबळ सुरू होऊन प्रस्तुतच्या जातीय संकटाची माहिती आणि जाणीव उत्पन्न होते—मागचे

आणि आतांचे यांची तुलना करण्याची विलक्षण बुद्धि जागृत होते. या प्रत्येक परिणामानें हिंदु समाजांतील अनेक दुर्गुणांचा अस्त होण्यास आणि राष्ट्रीय गुणांचा विकास होण्यास अमोलिक साहाय्य होत असतें. गांवांत किंवा नगरांत एकादा नवीन शुद्धिसमारंभ झाल्याबरोबर जी खळबळ उडते ती ज्यांनीं पाहिली असेल, त्यांना हें तत्काळ पटेल कीं, राजकारणाच्या दहा सभांनीं समाजांतील वरच्या थरांतहि जी चळवळ आणि राष्ट्रीय जागृति उत्पन्न होत नाहीं, ती एका शुद्धिसमारंभानें उत्पन्न होऊन शेवटच्या थरापर्यंत कुळवाडी, कुणबी, महारमांगापर्यंत सामाजिक भावनेचा धक्का पोंचविला जात असतो. हें सर्व राष्ट्रीय गुणवर्धनाचें कार्यच नव्हे काय ? हिंदुसंघटन अनाथालयें काढते; त्यांत आजपर्यंत जीं दुर्दैवी अर्भकें मृत्यूच्या जबड्यांत जन्मतःच ढकलली गेलीं असतीं किंवा भूक भूक करीत भटकत फिरलीं असतीं, त्यांचीं शारीरिक, मानसिक आणि आत्मिक जोपासना केली जाते. त्यांस शिक्षण देण्यांत येतें. हिन्दुत्वाच्या आमच्या अभिमानाची जाणीव त्यांच्यांत उत्पन्न केली जाते हें सर्व हिंदु समाजाचें गुणबळ वाढविण्यास कारणीभूत होतें कीं घालविण्यास ? अशा अनेक राष्ट्रीय गुणवर्धक चळवळी ज्या हिंदु संघटनाच्या पुरस्कर्त्यांनीं चालविलेल्या आहेत आणि परदेशगमनापासून तों शुद्धीपर्यंत ज्या शेंकडों सुधारणा त्यांनीं हिंदुसमाजांत आज नुसत्या ठराव करून नव्हे तर प्रत्यक्ष आचारांत आणून प्रसृत केलेल्या आहेत, त्या त्यांस हिन्दु राष्ट्राचें गुणबळ होंहि वाढ-

विलेंच पाहिजे, हें कळतें आहे म्हणूनच होय. त्यांस ती गोष्ट शिकविण्यासाठीं कोणा अर्धवट गुरूची आवश्यकता नाहीं.

आम्हांस गुणबळ तर हवेंच आहे. पण आम्हांस संख्याबळहि हवें आहे. आमचें हिन्दु राष्ट्र आम्ही संख्येनेंहि घटूं देणार नाहीं; गुणानेंहि घटूं देणार नाहीं. अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धि या दुहेरी साधनांनीं आम्ही आमचें संख्याबळहि वाढवूं आणि गुणबळहि वाढवूं. केवळ गुणबळ पंगु आहे, केवळ संख्याबळ अंध आहे, हें सामाजिक सत्य तुमच्यापेक्षां आम्हांस पक्केपणीं कळलें आहे, "नुसत्या संख्याबळांत काय आहे" हें शहाणपण आम्हांस शिकविण्याची तसदी आपण घेऊं नये. अगदीं रहावतच नसेल तर तें शहाणपण मुसलमानादिक आपल्या भाईबंदांना जुम्मा मशिदींत जाऊन शिकवा. त्यांस त्याची खरोखर फार आवश्यकता आहे. अर्थातच जुम्मा मशिदीच्या पायरी, हें शहाणपण शिकविण्यासाठीं, चढण्याचें तुम्हांस धैर्य होत असेल तर !!!

---

**दमा—श्वास—कफ**—तात्काळ व कायमचा साफ हटवणारें दिव्यौषध! किं. रु. २॥. ट. ख. ८७ निराळा.

**एस्. एच्. फडके ॲण्ड कंपनी,**
कानजी खेतसी चाळ, कांदेवाडी, मुंबई नं. ४

# धर्माचें स्थान हृदय आहे, पोट नव्हे.

[ श्रद्धानंद, २५।८।२७ ]

वास्तविक पाहातां कोण्याही हिंदूनें मुसलमानाचें किंवा खिस्त्याचें अन्न खाल्लें किंवा पाणी घेतलें म्हणजे तो बाटतो ही कल्पनाच खुळी आहे. कारण धर्माचें स्थान पोट नसून हृदय हें आहे. ज्या मनुष्याच्या हृदयांत हिंदु धर्माची भक्ति कधींच मावळलेली नसेल तो मुसलमानाचे घरीं एकदां सोडून एक हजार वेळां जरी जेवला, तरी तो बाटला असें होत नाहीं. मुसलमानादिक लोक हिंदूंचें अन्न चुकूनच नव्हे तर लुबाडून घेऊन देखील खातात आणि पुन्हां मुसलमानचे मुसलमान रहातात. किंबहुना हिंदूंच्या अन्नावर परस्पर उपजीविका करून पुन्हां वेळ पडतांच त्याच हिंदूंस 'काफर' म्हणून म्हणणें हा त्यांच्यांत एक कुलाचारच पडत चाललेला आहे. मग मुसलमानाच्या अन्नानें हिंदूंचा धर्मच नष्ट व्हावा इतकी हिंदु-समाजाची पचनशक्ति क्षीण कां असावी ? आतां ती पचनशक्ति आपण अगस्तिसारखी सर्व जगत् पचविण्याइतकी तेजस्वी आणि प्रदीप्त केली पाहिजे. ह्या दृष्टीनें पहातां केवळ अन्नोदकासाठींच बाटलेले म्हणून समजल्या गेलेल्या मनुष्यास शुद्ध करण्याचेंच कांहींएक कारण नाहीं. पण आज जरी आपणांस ही गोष्ट क्षुल्लक वाटते—आणि तशीच ती वाटावी हेंच आपल्या वाढत्या बळाचें निदर्शक आहे—तरी जोंवर समाजांतील हजारों लोकांच्या मनां-

नून त्या खुळ्या कल्पनेचें बीज उखडलें गेलेलें नाहीं तोंवर कांहीं दिवस हे शुद्धिसमारंभही केले पाहिजेत. या कारणापेक्षांही एका अधिक महत्त्वाच्या कारणासाठींहि समारंभ केले पाहिजेत. इतकेंच नव्हे तर त्यांची चांगली प्रसिद्धीही करीत राहिलें पाहिजे. कारण हिंदूंच्या मनांत आजपर्यंत कोणाचा पाण्याचा थेंब तोंडांत पडला कीं, मनुष्य जन्मभरच नव्हे तर पिढ्यानपिढ्या बाटतो ही खुळी समजूत जशी बद्धमूल झालेली आहे, तशीच मुसलमानादिक अहिंदु समाजांतही उलट्या स्वरूपाची एक घातक समजूत दृढतर झालेली असते कीं, कोण्याही हिंदूस वेडसरपणांत किंवा उपासमारींत गांठून त्यास दोन घांस अन्न मुसलमानी हातानें खावविलें कीं तो मनुष्य, हिंदु लोक आपण होऊनच मुसलमान झाला, असें समजून त्यास आपल्या मुसलमानी वा खिश्चन समाजाच्या हातीं सोंपवून देतात.

आतां आपल्याला अन्नोदक व्यवहाराचें कांहीं महत्त्व वाटत नाहीं हेंच आपली ह्या विषयांत झालेल्या समाजहितकारक विचारक्रांतीचें निदर्शक आहे आणि म्हणूनच अन्नव्यवहारानें धर्म बाटतो ही समजूत खुळी आहे म्हणून समजणारी ही विचारक्रांति मुसलमानादिक सर्व अहिंदूंस घोषित करण्यासाठीं तरी कांहीं दिवस शुद्धीकरणाचे संस्कार चालू ठेवले पाहिजेत. ह्या शुद्धीकरणानें मुसलमानादिकांस लवकरच कळून येईल कीं, ते हिंदूंस बाटविण्यासाठीं म्हणून जें अन्न वांटीत बसतात तें आतां व्यर्थ जाणार आहे! त्यांचें अन्न खाऊन तें पचवून

टाकण्याइतका हिंदूंचा जठराग्नि प्रदीप्त झालेला आहे. असा अनुभव दोन तीन वर्षे त्या अहिंदु समाजास येत गेला कीं ते पुन्हां हिंदूस दुष्काळ, उपासमार, वेड अशा आपत्तींत गांठून त्यांस बाटविण्याचे दुष्ट हेतूनें पोपीत बसण्याचे विफल श्रम आपोआप करीतनासे होतील. आतां ते दिवस गेले कीं, एक दिवस हिंदूस दोन तुकडे चारले कीं तो आणि त्याची संतति मुसलमान होई. आतां हिंदूस इतक्या स्वस्त मूल्यावर विकत घेतां येणें शक्य नाहीं हें एकदां मुसलमानादिकांच्या पूर्ण प्रयत्यास आलें म्हणजे मिशनरींच्या धंद्यास देखील पार उतरती कळा लागलीच म्हणून समजा. अमेरिकनादि लोक मग अशा विफल साधनावर कोट्यावधि रुपये खर्चणार नाहींत. आज हिंदु पोसला–दहा वर्षे पोसला तरी संधि सांपडतांच तो आपला एक तुळशीपत्र खाईल कीं, पुन्हां हिंदूंचा हिंदु होतो असें पक्केपणीं कळलें कीं, ते पाद्री आणि पीर आपलीं भ्रष्टाकाराचीं दुकानें भराभर आटोपूं लागतील, आम्ही तर प्रत्येक हिंदूला उघडपणें सांगतों कीं, जर निरुपाय होईल तर चापून मुसलमानांचे घरीं खा, पाणी प्या; इंग्रजांचे घरीं खा, पाणी प्या; सर्व जगाच्या घरीं खा, पाणी प्या; आणि जेवण झाल्यावर लगेच मुखशुद्धीसाठीं एक तुळशीचें पान तोंडांत टाका कीं तुमची मुखशुद्धीच नव्हे तर आत्मशुद्धीहि होऊन आणि अन्न पार पचवून टाकून तुम्ही पुन्हां हिंदूंचे हिंदूच रहाल. कारण हिंदुधर्माचें वसतिस्थान तुमच्या पोटांत नसून रक्तांत आहे, बीजांत आहे.

हृदयांत आहे, आत्म्यांत आहे आणि तें हिंदु रक्त, हृदय, बीज आणि आत्मा मुसलमानादिकांच्या पाण्याच्या एका पेल्यांत तर काय पण उभ्या समुद्रांतही बुडून जाणें अशक्य आहे. ज्या रामनामाच्या आधारानें भवसमुद्रावर शिळा तरल्या त्या रामनामाचे उच्चारासरशीं, जर तो उच्चार पश्चात्तप्त अंतःकरणाचा असेल तर, महत्पापें देखील भस्म होतात तिथें मुसलमानी भाताच्या एका घांसाची कथा काय !

---

### आमच्या

## अस्पृश्य धर्मबंधूंस धोक्याची सूचना

( श्रद्धानंद ता. १।९।२७ )

आपल्या हिंदु समाजांत जी अत्यंत अन्याय्य आणि आत्मघातकी अशी अस्पृश्यतेची रूढि पडलेली आहे, तिचा नायनाट करण्यासाठीं आम्हीं किती तत्परतेनें झटत आहों हें 'श्रद्धानंदा'च्या वाचकांस तरी सांगावयास नकोच. अस्पृश्यता जी निघाली पाहिजे ती मुख्यतः आमच्या सात कोटि धर्मबंधूंस निष्कारण पशूहूनही दूर ठेवणे हा मनुष्य जातीचाच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या आत्म्याचाही घोर अपराध करणें होय म्हणून निघाली पाहिजे असें आमचें स्पष्ट मत आहे. अस्पृश्यतानिवारणानें आज आपल्या हिंदु समाजाचें हित आहे म्हणूनही ती निघाली पाहिजेच; पण वेळ प्रसंगी

त्या रूढीपासून हिंदु समाजाचा आंशिक लाभ जरी होत असता, तरीही आम्ही तिच्याविरुद्ध इतक्याच प्रबळपणें खटपट केली असती. कारण माझ्या अस्पृश्य समजलेल्या बंधूस जेव्हां मी तो केवळ अमक्या जातींत उत्पन्न झाला म्हणूनच त्याचे अंगास स्पर्श करीत नाहीं, आणि एखाद्या कुत्र्यामांजरास स्पर्श करतों, तेव्हां मी मनुष्यत्वाविरुद्धच एक अत्यंत गर्ह्य असा अपराध करीत असतों. केवळ आपद्धर्म म्हणून अस्पृश्यता काढणें अवश्य आहे इतकेंच नाहीं, तर धर्माचा कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरीहि त्या प्रस्तुतच्या अमानुष रूढीचें समर्थन करणें अशक्य आहे एतदर्थ धर्माची आज्ञा म्हणूनच ती रूढि नष्ट केली पाहिजे. न्यायाचे दृष्टीनें, धर्माचे दृष्टीनें, मानुषकतेचे दृष्टीनें तें कर्तव्य आहे म्हणूनच अस्पृश्यतेचें बंड आपण हिंदूंनीं साफ मोडून टाकलें पाहिजे. त्यापासून आजच्या परिस्थितींत लाभालाभ काय आहेत हा प्रश्न दुय्यम आहे. हा लाभालाभाचा प्रश्नच आपद्धर्म होय आणि अस्पृश्यतानिवारण हाच मुख्य आणि निरपेक्ष धर्म होय.

परंतु ज्याप्रमाणें भगवंताची भक्ति करणें हा मुख्य धर्म असला, तरीहि ज्यांस ती उच्च भावना भावतां येत नसेल त्यास आपण निःश्रेयसाकरितां निष्काम बुद्धीनें नसलें तर निदान अभ्युदयाकरितां, पुत्रधनदारारोग्यादिक ऐहिक सुखाचें साधन म्हणून तरी ईश्वरभक्ति कर म्हणून सांगणें युक्तच असतें, त्याचप्रमाणें केवळ न्यायासाठीं आणि आपला मनुष्यपणाचा धर्म म्हणून अस्पृश्यता त्याज्य समजण्याइतकी कोणाकोणाची उदारमनस्कता विशाल

झाली नसली, तरी धर्म म्हणून नसलें तर निदान आपद्धर्म म्हणून तरी ती अस्पृश्यतेची रूढि नष्ट कर हें सांगणें इष्ट असतें; इतकेंच नव्हे तर न्यायदृष्ट्या आणि नीतिदृष्ट्याहि तें कर्तव्यच असतें. शाळेंत शिकण्याकरितां जात नसशील तर निदान प्रत्यहीं खडीसाखर देत जाईन तीसाठीं तरी जा हें आपण मुलांस सांगतों. तें अशा बुद्धीनें असतें कीं, प्रथम खडीसाखरे-साठीं शाळेंत तो गेला तरी हळूहळू त्यास शिक्षणाची रुचि लागत तो पुढें शिक्षणासाटीच शाळेंत जाऊं लागेल. तीच स्थिति धर्माची उदार रहस्यें ज्या हिंदु समाजाच्या असंख्य अनुयायांतून लुप्त होऊन अन्याय आणि आत्मघातक रूढीच धर्म म्हणून समजल्या जात आहेत, त्या समुदायाची आहे. न्याय्य म्हणून अस्पृश्यता त्यागावी हे तुला पटत नसेल, तर तें तुला पटेतों थांबण्यास आतां वेळ नसल्यानें—ह्या अमानुष रूढीनें राष्ट्रपुरुषाचा प्राण कासावीस होऊं पहात असल्यानें तितका विलंब देखील आतां असह्य होणारा आहे म्हणून, निदान ही रूढि आत्मघातक आहे म्हणून तरी तूं सोड असें अनेक वेळेला सांगावें लागतें आणि तें सांगणें अगदीं अपरिहार्यच नव्हे तर अशा प्रसंगी एक पवित्र कर्तव्यच असतें. हें कर्तव्य करतांना वारंवार सिद्ध करून दाखवावें लागतें कीं, अस्पृश्य या अन्याय्य छळानें त्रासून परधर्मीयांच्या गोटांत शिर-ण्याच्या स्वाभाविक परंतु अत्यंत निंद्य मोहास बळी पडतात आणि त्यामुळे आमच्या हिंदु समाजाच्या संख्याबळाची आणि गुणबळाची भयंकर हानि होते. धर्मशास्त्रास अस्पृश्यता ही संमत आहे असें

क्षणभर गृहीत धरलें तरी देखील त्याच धर्मशास्त्रांत आपद्धर्म म्हणून प्रकरण सांगितलें असल्यानें आणि त्या प्रकरणांत कांहीं प्रसंगीं "राष्ट्रविप्लवे स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते" अशा अनेक स्पष्ट आणि निर्णायक आज्ञा सांगितलेल्या असल्यानें, धर्मशास्त्राच्या नसेल तर आपद्धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणें म्हणून ही अस्पृश्यतेची रूढि त्यागिणें हें कर्तव्य ठरत आहे, असे सापेक्षतः दुय्यम प्रतीचे कोटिक्रम करावे लागतात. अशा कोटिक्रमानें प्रथमतः हिंदुराष्ट्र-तारणास अवश्य म्हणून, धर्म नाहीं तर आपद्धर्म म्हणून, शेंकडों लोक अस्पृश्यतानिवारणास उद्युक्त होतात आणि त्याप्रमाणें एकदां त्यांचे पिढ्यान् पिढ्या मुरलेले ते अस्पृश्यतेचे दुष्ट संस्कार उलटा संवयीनें पुसट होत जातात आणि अस्पृश्यांविषयीं जे अनेक मूर्खपणाचे पूर्वग्रह झालेले असतात ते अस्पृश्यांच्या संगतीनें, अधिक विचारानें आणि संवयी संवयीनें खोटे आहेत हें त्यांचें त्यांच्याच लक्षांत येऊन ते अल्पावधींत आपद्धर्म म्हणूनच नव्हे तर धर्म म्हणून, लाभकारक म्हणूनच नव्हे तर न्याय्य म्हणून, उपकाराकरतां नव्हे तर माणुसकी म्हणून, अस्पृश्यांच्या रूढीचा मनःपूर्वक धिक्कार करूं लागतात. अस्पृश्य जातीस अस्पृश्य म्हणणें देखील जिवावर येऊन त्यांस पूर्वास्पृश्य—आणि तेंहि मोठ्या कष्टानें-म्हणूं लागतात. हा अनुभव आम्हांस शेंकडों ठिकाणीं, अगदीं प्रामाणिक पण पुराणप्रिय धर्मशास्त्र्यांपासून तों अज्ञानी आणि म्हणूनच त्या शास्त्र्यांहूनही अधिक रूढ्यंध अशा गांवढळ शेतकऱ्यांपर्यंत अनेक समयीं आलेच आहेत.

हें विवरण करण्याचा मुख्य उद्देश हा आहे कीं, 'श्रद्धानंद' पत्रांत जेव्हां अस्पृश्यतानिवारणापासून असुक लाभ आहेत म्हणून ते करा, धर्मशास्त्रांत तुम्हांस सांपडत नसेल पण आपद्धर्मांत तरी तुम्हांस आधार सांपडतात म्हणून तुम्हीं अस्पृश्य बांधवांस सन्निध करा, असें सांगण्यांत येतें, तेव्हां तेव्हां तें केवळ सापेक्षतः दुय्यम-पणाचा कोटिक्रम म्हणूनच सांगण्यांत येत असतें हें मर्म विशद व्हावें हा हेतु. 'श्रद्धानंदा'चे लेख नेहमीं समग्र न वाचणाऱ्या कोणा प्रामाणिक मनुष्याचा मधूनच कांहीं च्छेदक ( प्यारिग्राफ ) किंवा वाक्यें वाचून भ्रान्त समज होण्याचा संभव असल्यानें हें स्पष्टपणें आणि वारंवार सांगणें भाग आहे कीं, प्रस्तुतची अस्पृश्य तेची रूढि ही अत्यंत अन्याय्य आणि आत्मघातकी असल्यामुळें मुख्यतः केवळ माणुसकीसाठीं म्हणूनच तिचें आम्हां हिंदूंना निर्दा-लन केलें पाहिजे. इतर सर्व कारणें हीं दुय्यम होत, हेंच आमचें अबाधित मत आहे.

वर उल्लेखिलेल्या तात्त्विक आणि व्यावहारिक अशा दोन्हीही दृष्टीनें विचार केला असतां आम्हांस असें वाटतें कीं, जर आमच्या तथाकथित ( so-called ) अस्पृश्य धर्मबंधूंस निर्बंधाप्रमाणेंच ( कायद्याप्रमाणेंच ) प्राप्त झालेले अधिकारही उपभोगूं देण्यास यापुढेंही स्पृश्य लोक विरोध करतील, तर ते नैर्बंधिक अधिकार बजाविण्यासाठीं अगदींच अपरिहार्य तेथें तथाकथित अस्पृश्यांनीं सामसत्याग्रहही केल्यास त्यांत त्यांच्यांकडे कांहींहि दोष देतां येणार नाहीं. अर्थातच मनःप्रवर्तनाचे आणि

स्पृश्यांचें मन वळवूनच ते नैर्बंधिक अधिकार पदरांत पाडून घेण्याचे सर्व गोडीगुलाबीचे उपाय थकल्यानंतरच निरुपाय म्हणून असे सत्याग्रह केले जावे. अनेक ठिकाणीं स्पृश्य लोकांस न्यायतः आणि व्यवहारतः आज अस्पृश्यता सार्वजनिक प्रसंगीं तरी त्याज्य मानणें हें अवश्य आहे ही गोष्ट पटवितां येते, हें आम्हीं स्वानुभवावरून सांगूं शकतों आणि अशा बंधुप्रेमानेंच बहुतेक ठिकाणीं तो प्रश्न सुटेल ही आमची निश्चिति आहे. परंतु क्वचित् प्रसंगीं तो तसा न सुटला, तर आपल्या नैर्बंधिक अधिकारांचे संरक्षणार्थ आमच्या अस्पृश्य बंधूंस सत्याग्रह—सामसत्याग्रह—करण्याचें भागच पडेल हेंही आम्ही जाणून आहों. सत्याग्रह हें धोरण नाहीं. पण विशिष्ट आणि अपकारभूत प्रसंगीं अवलंबिण्याचा तो एक कडु पण अपरिहार्य असा अंतिम उपाय आहे. सार्वजनिक शाळा, पाणवटे, नळ, नगरसंस्था, जिल्हामंडळें, विधिमंडळें, सभा इत्यादि सर्व सार्वजनिक स्थलीं—विशेषतः जिथें मुसलमानादिक अहिंदु स्पृश्य समजले जातात तिथें तिथें आणि त्यांच्यापुढें एक पाऊल तरी—आमच्या तथाकथित अस्पृश्य बंधूंस आमच्या स्पृश्य बंधूंनीं येऊं दिलेंच पाहिजे. तो त्यांचा न्याय्य अधिकार आहे; तो त्यांचा नैर्बंधिक अधिकार आहे. यास्तवच

डॉ. आंबेडकर यांची महाडच्या सत्याग्रहाची चळवळ—ही आम्हांस दोषार्ह वाटत नाहीं हें आम्हीं स्पष्टपणें घोषित करूं इच्छितों. कारण महाडच्या प्रकरणीं इतर कितीहि गोष्टी खोट्या किंवा खऱ्या असल्या, तथापि ह्या दोन तीन गोष्टी अगदीं स्पष्ट-

पणें सिद्ध झालेल्या आहेत कीं, ज्या तळ्यावर मुसलमान लोक पाणी पितात आणि आपलीं भांडीहि धुतात, त्या तळ्यावर पाण्याच्या दुर्भिक्षतेच्या दिवसांतहि आपल्या 'अस्पृश्य' हिंदु बंधूंस पाणी पिण्याचा मज्जाव करण्यांत आला. इतकेंच नव्हे तर त्यांनीं शांतपणें त्या तळ्यावर येऊन पाणी पिण्यास नगर संस्थेच्या आज्ञेप्रमाणेंच आरंभ केला असतां महाडच्या शेंकडों स्पृश्य हिंदूंनीं त्यांस मारहाण केली. 'अस्पृश्य' देवळांत शिरणार अशा भुमकेनें ही गोष्ट झाली हें म्हणणें सर्वस्वी विश्वसनीय होऊं शकत नाहीं; कारण, नाहीं तर गोमूत्र शिंपडून त्या तळ्याची शुद्धि करण्यांत आली नसती. आपल्या धर्माच्या. रक्ताच्या, बीजाच्या हिंदु मनुष्याचे स्पर्शानें पाणी बाटतें आणि तें पशूंचें मूत्र शिंपडलें कीं शुद्ध होतें ! ह्या अत्यंत तिरस्करणीय विकारांत ती मानवी स्पर्शाच्या भ्रष्टतेची कल्पना अधिक धिक्कारणीय आहे किंवा ती पशूच्या मूत्रानें शुद्ध करण्याची भावना अधिक धिक्कारणीय आहे हें सांगणें कठीण आहे ! अशा रीतीनें नगरसंस्था आणि विधिमंडळें ह्या दोन्हीहि राजसंस्थांनी जे नैर्बंधिक अधिकार अस्पृश्यांस दिलेले होते, ते बजाविण्याची अनुज्ञा शक्य त्या त्या सामोपचारानें मिळविण्याची पराकाष्ठा केली असतांही ज्या महाडच्या लोकांनीं ती बंधुप्रेमानें दिली नाहीं आणि मुसलमान तळ्यावर पाणी पीत असतां हिंदूंस मज्जाव करून आपल्या हिंदुत्वास कलंक लावला, त्या महाडास जाऊन त्या तळ्यावर सामसत्याग्रहानें अस्पृश्यांस पाणी पिऊं देण्याचा यत्न करणें हें अस्पृश्यांचेंच नव्हे

तर सर्व हिंदुमात्राचें कर्तव्य आहे. जर ह्यांत कांहीं अतिरेक होत असेल तर तो डॉ. आंबेडकरांच्या सत्याग्रह–मंडळाकडून नसून तो महाडच्या धर्मविमूढ स्पृश्यांकडूनच होय आणि हा अतिरेक जर टाळावयाचा असेल तर डॉ. आंबेडकरांच्या मंडळास " जाऊं द्या हो " म्हणून सांगून चालणार नाहीं तर महाडच्या स्पृश्य मंडळाकडून " येऊं द्या हो " म्हणून सांगितल्यानें तो टाळतां येणार आहे. आमची

आमच्या महाडच्या हिंदुबंधूंस प्रेमाग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं अजून तरी सावध होऊन हा दुःखद प्रसंग टाळावा; आणि तो टाळणें किती सोपें आहे ! जर एक पत्र सर्व समाजाचे वतीनें किंवा नगरसंस्थेचे वतीनें आमचे महाडकर हिंदु बंधु आपल्या हिंदुधर्माचे नांवासाठीं त्यांचे जे काय अपमान झाले असतील ते विसरून, प्रसिद्ध करण्याचा उदारपणा दाखवितील कीं, ह्यापुढें ह्या तळ्यावर आमच्या 'अस्पृश्य' बंधूंनीं येऊन सुखानें पाणी प्यावें, तर आपसांत सत्याग्रह करण्याचा दुःखद प्रसंग आजच्या आज टळेल. हिंदूंनो, तहानेल्या हिंदूंस तळ्यावर पाणी पिऊं देऊं नये आणि ती गंमत त्याच तळ्यावर तेंच पाणी पीत उभ्या असलेल्या मुसलमानानें आणि ख्रिस्त्यानें खो खो हसत बघावी हें अत्यंत लाजिरवाणें दृश्य आतां आमच्या महाडकर हिंदूंनीं जगतास पुन्हां दाखवूं नये अशी आमची उत्कट प्रार्थना आहे. महाडकरांस एकमुखानें असें पत्र प्रसिद्ध नच करतां आलें तर त्यांनीं निदान इतकें तरी करावें कीं, जर आणि जेव्हां हे

आपले हिंदु बंधु पाणी पिण्यास दळवळासहित येतील, तर आणि तेव्हां त्यांस लवलेशही विरोध न करतां तें पाणी सुखेनैव पिऊं द्यावें; म्हणजे कलहप्रिय परधर्मीय लोकांचा सर्व खटाटोप व्यर्थ जाऊन शिकार न सांपडलेल्या व्याधाप्रमाणें ते परधर्मीय शत्रु फजिती पावतील. आणि आपले हे अस्पृश्य, आपले हिंदू धर्माचे बंधू प्रेमानें जिंकले जातील. आपल्या या अस्पृश्य धर्मबंधूंच्या स्वारीस आपल्या स्पृश्य बंधूंनीं स्वतःच पराजय पावून पराजित करावें. इंग्रजापुढें आणि मुसलमानी गुंडापुढें पराजय पावूं नये—काय धर्माभिमान आणि शौर्य असेल तें तिथें दाखवावें. ह्या आपल्याच ओंठांस आपल्याच दातांनीं कचकचून चावण्यांत काय पुरुषार्थ आहे!

ज्याप्रमाणें आमच्या 'स्पृश्य' धर्मबंधूंस आमची ही सूचना आहे, त्याचप्रमाणें आमच्या 'अस्पृश्य' बंधूंसहि एक धोक्याची सूचना देणें आम्हांस आमचें कर्तव्य वाटत आहे. ती ही कीं, त्यांनीं इतर हिंदूंस "अस्पृश्यता काढा नाहीं तर आम्ही चाटूं" असा

## धर्मांतराचा धाक घालूं नये!

कारण असें नुसतें म्हणणें देखील त्यांचें त्यांनाच अत्यंत लांछनास्पद आहे. अस्पृश्यता जो काढणार त्याचा तेवढा हिंदुधर्मा-वर अधिकार आहे आणि 'अस्पृश्य' तेवढा हिंदुधर्मांत आलेला एक उपऱ्या आहे कीं, ज्याला तो धर्म म्हणजे एखाद्याला वाटेल तेव्हां फेंकून देतां येणाऱ्या जीर्ण वस्त्राहून किंवा बाजारांत सवदा करण्यासाठीं आणलेल्या भाजीपाल्याहून अधिक महत्वाचा वाटत

नाहीं ! हिंदुधर्माची आणि हिंदु संस्कृतीची, हिंदु देशाची आणि हिंदु इतिहासाची, हिंदु तत्त्वज्ञानाची आणि हिंदु वाङ्मयाची थोडक्यांत म्हणजे हिंदुत्वाची ही आपली पूर्वार्जित मत्ता ही केवळ वसिष्ठासारख्या ज्ञानी ब्राह्मणांनीं किंवा श्रीकृष्णासारख्या गीताद्रष्ट्या क्षत्रियांनीं किंवा हर्षादिकासारख्या साम्राज्य चालविल्या वैश्यांनीं किंवा नामदेवातुकारामदिक वणिग्शूद्रांनीं वा शूद्रांनींच उपार्जित केलेली नसून, ती मिळकत मिळावयास चोखा महार, रोहिदास चांभार, सजन कसायी इत्यादि तुम्हां अस्पृश्य जातीचे अनेक पूर्वजही झटले आहेत. ह्या हिंदुत्वाचे रक्षणार्थ पूर्वी आणि आतांही हजारों 'अस्पृश्य' वीर रणांगणावर झुंजत आलेले आहेत. महाभारतांतील एक अत्यंत उज्वल अध्याय उपदेशिणाऱ्या व्याध-गीतेच्या त्या 'अस्पृश्य' द्रष्ट्यापासून तों खर्ड्यांच्या लढाईत हिंदु-त्वाच्या जरिपटक्याचे रक्षणार्थ धारातीर्थी म्लेंच्छांस मारीत मारीत मरणाऱ्या शिदनाइक महारांपर्यंत लाखों अस्पृश्य संत, तत्त्ववेत्ते आणि वीर ह्या हिंदुत्वाच्या समाईक संपत्तीची उपार्जना आणि जोपासना करण्यासाठीं झटत आलेले आहेत. हिंदुत्वाच्या गांवाच्या वेशीवर आज अनेक सहस्रकें जागता पहारा ज्या अस्पृश्य महा-रांनीं दिलेला आहे ते सर्व महार तुमचेच पूर्वज होते.

नव्हे, पूर्वजांविषयीं बोलावयाचें तर अनुलोम प्रतिलोमादिक विवाहांनींच अस्पृश्यादिक जातींची उत्पत्ति बहुशः झालेली अस-ल्यानें तुमचे पूर्वज आणि अस्पृश्यांचे पूर्वज एकच होते. अस्पृ-श्यांचें रक्त स्पृश्यांच्या अंगांत खेळत आहे आणि स्पृश्यांचें

अस्पृश्यांच्या, या विधानाच्या सत्याची साक्ष मनुस्मृति देखील देत आहे. कारण पंचमादिक वर्णाच्या उत्पत्तीची मीमांसा त्याच स्मृतीनें सांगितली आहे ! मग जर कांहीं काळापूर्वी

## आजच्या स्पृश्यांचे आणि अस्पृश्यांचे पूर्वज बहुशः एकच होते

तर अर्थातच ही हिंदुत्वाची मत्ता जितकी स्पृश्यांची तितकीच, अस्पृश्य हिंदूंचीहि पितृपरंपरागत स्वायत्त संपत्ति आहे. ती तुमच्या आणि आमच्या पूर्वजांनीं ते एकत्र होते तेव्हां आणि ते पुढें गांवांतल्या गांवांत स्पृश्यास्पृश्यादिक वादांनी विभक्त झाले तरीहि समाइक श्रमांनीं मिळविली आहे, समाइक शौर्यानें संरक्षिली आहे. तीवर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचाही वारसा आहे ! मग तुम्ही असें कसें विचारतां कीं, " ह्या हिंदुत्वावर आमचा अधिकार आहे कीं नाहीं ? हिंदुधर्म आमचा आहे कीं नाहीं ? "

ह्या प्रश्नांत तुम्ही नकळत हें गृहीत धरतां आहां कीं, हिंदुत्व ही जशी कांहीं एकट्या स्पृश्यांचीच मत्ता आहे ! तुम्ही होऊन तुमचा अधिकार असा कसा सोडून देतां ? एखाद्या राज्याचे दोन वारस असले आणि जर त्या वारसांतील एका वारसानें दुसऱ्यास हीन स्थितींत ठेवलें, तर त्या दलित वारसानें छलकाच्या त्रासास कंटाळून त्या राज्यासच सोडून देणें आणि दुसऱ्याच्या—परशत्रूच्या—दाराशीं तुकडे मोडीत पडणें हें श्रेयस्कर आणि वीरवृत्तीस शोभणारें आहे, का त्या वारसानें सांगितलें कीं, तूं राज्याबाहेर

चालता हो, तरी न जातां आपल्या बळानें किंवा बलिदानानें मरेपर्यंत लढून त्या राज्यावरील आपलें न्याय्य स्वामित्व गाजविणें हें खऱ्या वीरवृत्तीचें लक्षण आहे !

अस्पृश्य बंधूहो, तुम्हीं या हिंदुत्वाचा सनातन आणि पूर्वजार्जित साम्राज्यावर आपला अधिकार सांगा---दारापुढील भिकाऱ्यासारखें भिक्षा द्या, नाहीं तर चाललों दुसऱ्याच्या दारीं असें कार्पण्य प्रदर्शित करूं नका. घराच्या धन्यासारखे घरांत बरोबरीनें उभे रहा. तुमच्या स्पृश्य बंधूंनीं जरी म्हटलें, ' तूं हीन आहेस; हें हिंदुत्वाचें सांस्कृतिक महान् राज्य माझें एकट्याचें आहे, बाहेर जा ' : तर त्यांनाच उलट सांगा तें एकट्या तुझ्या बापानें संपादिलें नाहीं ! तें संपादण्यास आणि रक्षिण्यास सहस्रकांमागून सहस्रकें माझेही पूर्वज झटत आलेले आहेत; मी बाहेर जात नाहीं. मला बाहेर जा असें म्हणणारा तूं कोण ? ह्या आपल्या समाईक मत्तेचा आजवर बहुतेक उपभोग तूं घेतलास; आतां मी तो तुला तसा एकट्याला अन्यायानें घेऊं देणार नाहीं !

## हिंदुधर्म माझा आहे, तो सोडण्यास सांगणारा तूं कोण ?

असें उलट तुम्हींच स्पृश्यांस म्हटलें पाहिजे. हिंदुधर्मात राहूं देणारे किंवा न देणारे हे स्पृश्य लोक काय ते अधिकारी आहेत, अशी दरिद्री भावना आमच्या अस्पृश्य बंधूंनीं कधींहि करून घेऊं नये आणि ती दरिद्री भावना व्यक्त करणारी ' आम्हांस शिवा; नाहीं तर आम्हीं दुसरें घर पाहतों ' अशी अत्यंत भिकारडी आणि

नेभळ्या कुलकलंकासारखीं वाक्यें उच्चारून, आपल्याच पूर्वजांच्या घरास सोडून, त्यांच्या शत्रूंसच पूर्वज समजण्याचा भ्याडपणा कधींहि करूं नये. तर उलट पूर्वजांच्या ह्या स्वायत्त घरांत स्पृश्य बंधूंना बळेंबळें शिवून त्यांच्या बरोबरीनें नांदण्याचा आपला हक्क प्रस्थापित करावा. हेंच खऱ्या वीरवृत्तीस आणि माणुसकीस साजेसें आहे.

कारण हिंदुत्वावरचा अधिकार सोडणें म्हणजे

चोख्यामेळ्याच्या दैवतास मुकणें होय; सजन कसाई, रोहिदास चांभार, रामानंदानें स्थापिलेले त्यांचे अनेक डोम, मांग इत्यादि जातींतील संतशिष्य ह्या सर्वांनीं, अस्पृश्यांनो, ह्या तुमच्या अगदीं प्रत्यक्ष पूर्वजांनीं, उपार्जन केलेली मत्ता भित्रेपणानें सोडून पळून जाणें होय· हें हिंदुत्व तुमच्या हजारों पिढ्यांनी प्राणापलीकडे—हे अस्पृश्यतेचे हाल सोसून देखील—जतन केलें, तें हिंदुत्व धिक्कारून आणि त्या शतसहस्र पूर्वजांस मूर्खांत काढून आपल्या बापाचें नांव बदलणें होय! मग तुम्हांस शिवाजी आमचा, प्रताप आमचा, कृष्ण आमचा, बुद्ध आमचा, अजिंठा आमचा, काशी आमची, पंढरी आमची, कालिदास आमचा, ही हिंदु संस्कृति आमची म्हणून अधिकार सांगतां येणार नाहीं. तुमचा हा पूर्वजार्जित अधिकार असूनहि तुम्हीं त्यास आपण होऊन पारखे होणें हें हिंदुत्व सोडणें होय! तर आतां पुन्हां अशी अमंगळ भाषा तुमच्या स्वतःच्या जातीय अभिमानासाठींच बोलूं नका.

एका भावानें दुसऱ्यास छळलें तर त्या दुसऱ्यानें पहिल्याशीं

झुजून आपलें न्याय्य स्वत्व मिळवावें का त्या भावावरचा राग काढण्यासाठीं आपल्या बापास बाप म्हणणें सोडून देऊन श्राद्धाचे दिवशीं कोण्या दुसऱ्याचा आणि त्यांतहि ज्या दुसऱ्यांशीं आपले समाईक वाडवडील सारखे लढत आले अशा परशत्रूचा पितृपदीं अभिचार करावा ? एतदर्थ

## अस्पृश्य बंधूंनो, ही नीच भावना मनास देखील शिवूं देऊं नका.

अशी स्वधर्मत्यागाची भावना ज्याच्या मनांत उदय पावते तो मात्र खरा अस्पृश्य होय ! त्यानें त्वरित पश्चात्तापाचें प्रायश्चित्त घ्यावें. अशा वृत्तीनें मुसलमानांच्या दाराशीं देखील तुम्हीं गेलांत, तरी तुम्हांस तुकडेच मोडावे लागतील. त्यांच्यांतील हसन निजामीनें देखील आपल्या " भयसूचक घंटें " त स्पष्ट सांगितलें आहे की, 'उच्च कुलीन मुसलमानांनीं हिंदु भंगी, महार इत्यादि जे लोक मुसलमान होतील त्यांच्यांशीं बेटीव्यवहारादिक समव्यवहार करावा असें मी मुळींच म्हणत नाहीं !' मुसलमान झालेल्या महारादिकांचें पाणी निमाजास न घेणारे कित्येक मुसलमान आम्हीं स्वतः पाहिले आहेत. मागे बाटलेल्या अस्पृश्यांच्या अनेक जाती मुसलमानी समाजांत अजूनही जशाच्या तशा दूर ठेवलेल्या आहेत. खिस्त्यांमध्यें तर त्रावणकोरास स्पृश्य ख्रिश्चन आणि अस्पृश्य ख्रिश्चन ह्यांचे दंगे वारंवार होतात हें विश्रुतच आहे. तेव्हां मुसलमान होऊन म्हणजे मोठेंसें राज्य मिळणार आहे असें थोडेंच आहे ?

## परंतु तसें तें राज्य मिळतें

तरीहि तेवढ्यासाठीं तुमच्याच हजारों पूर्वजांच्या संस्कृतीस आणि तत्त्वज्ञान आणि धर्मास आणि समाजास अंतरून, जन्मदेत्या आईस आणि बापास सोडून, परशत्रूच्या पायीं शरण रिघणें ही अत्यंत नीच प्रवृत्ति होय. अशा नीच प्रवृत्तीस आमचे अस्पृश्य धर्मबंधु आजवर बळी पडले नाहींत—एवढा अमानुष छळ सोसीत पिढी पिढी मरणीं मेले पण बळी पडले नाहींत. त्यांनीं हिंदुत्वाच्या पूर्वार्जित राष्ट्राचा विश्वासघात केला नाहीं हें जितकें त्यांचा तसा छळ करणाऱ्या स्पृश्यांस लज्जास्पद आहे तितकेंच त्या अस्पृश्यांस भूषणावह आहे. यापुढेंहि हीच वीरवृत्ति ते राखून आपल्या पूर्वजांशीं आणि संस्कृतीशीं कृतघ्न न होतां, किंवा जें त्यांचें औरस धन आहे तें टाकून पळून जाण्याचा भ्याडपणा न करतां, त्या धनाचा उपभोग स्पृश्यांचे बरोबरीनें घेण्यासाठीं आणि आपल्या घरांचें स्वामित्व न्याय्य तितक्या प्रमाणांत इतर बंधूंसहच उपभोगण्यासाठीं शूरासारखे झुंजतील अशी आम्ही आशा करितों.

## हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक वेळ पडली तर आम्ही आपल्या रक्तानें धुवून काढूं

ही डॉ. आंबेडकरांची प्रतिज्ञा खऱ्या हिंदूस शोभण्यासारखी आहे. म्हणूनच त्यांच्या सत्याग्रहासही आम्हीं न्याय्यच समजतों; पण त्याबरोबरच अत्यंत प्रेमानें पण चिंतामग्न मनानें धोक्याची सूचनाही देतों कीं, ‘ हिंदु धर्म आमचा आहे कीं नाहीं तें सांगा ’

असे आत्मघातकी प्रश्न करून ' नाहीं तर आम्हीं हिंदुत्व सोडूं ' अशीं अभद्र आणि लाजिरवाणीं वाक्यें उच्चारण्याने तत्त्वतः जितका नाश होणार आहे, तितकाच व्यवहारालाही होणार आहे.

तीं एक युक्ति म्हणून देखील योजणें लज्जास्पद आहे.

कारण दुष्ट भावाला भिवविण्याकरितां कां होईना, पण तुझ्या बापाला मी आजपासून माझा बापच म्हणणार नाहीं हा धाक घालणें जितकें स्वतःसच लाजिरवाणें आहे, तितकेंच स्पृश्यांस धाक दाखविण्यासाठीं आपल्या पितृपूजित हिंदुत्वाचे तोंडावरच थुंकणें हें अत्यंत निंद्य आणि तुमच्याच आत्म्यास कलंक लावणारें आहे.

स्पृश्यही होईन आणि हिंदुही राहीन

ही प्रतिज्ञा करा. हिंदुधर्म, हिंदुसंस्कृति–हिंदुत्व एकट्या स्पृश्यांच्या बापाचें नाहीं; तीं दोघांच्याही बापाची समाईक मिळकत आहे. तीं सोडून जाऊं का, म्हणून स्पृश्यांसच काय विचारतां ? ते का तिचे धनी आणि तुम्हीं का चोर आहां आणि जे पापी आणि निर्दय स्पृश्य तुमचे लाखों लोक बाटून गेले, तरी अजून अस्पृश्यता काढण्यास मान्य होत नाहींत ते तुम्हीं आणखी कांहीं लाख निघून गेलेत तरी थोडेंच घाबरणार आहेत ? यासाठीं अशी अमंगळ भावना जितकी स्वतःस लज्जास्पद तितकीच परिणामीं विफल असल्यानें, आमच्या अस्पृश्य बंधूंनीं तिच्याशीं वरवर देखील आंगलट करण्याचें पातक करूं नये अशी आमची कळकळीची त्यांस विनंति आहे.

---

# जो दर्शनानें बाटतो तो देवच कसला !

[ श्रद्धानंद तारीख ८।९।२७ ]

मुंबईच्या ब्राह्मणसभेनें आपल्या गणपतीपुढें अस्पृश्य हिंदु–बंधूंचा मेळा येऊं द्यावा म्हणून जो ता. २८ आगस्टच्या सभेंत ठराव केला, त्यायोगें उभ्या महाराष्ट्रांत प्रत्येक संघटनाच्या पुरस्कर्त्यास मनःपूर्वक आनंद झालेला आहे. वास्तविक पहातां सभेनें हा ठराव केला यांत इतकें कांहींच आश्चर्य नाहीं. कारण कोंकणासारख्या ज्या प्रदेशास, नेकटाय कॉलरीनें चढावलेले, हे मुंबईचे कित्येक बी. ए. आणि एम्. ए., कित्येक शिक्षित आणि अशिक्षित ब्राह्मण इराणी उपहारगृहांत चहा पीत पीत " मागासलेला आणि पुराणवेडा प्रदेश " म्हणून तुच्छवीत असतात, त्याच कोकणांतील रत्नागिरीसारख्या ठिकाणीं, अस्पृश्यांचे मेळे सार्वजनिक गणपतींचे दर्शनास तर काय, पण पालखीभोंवती लगटून पहारा देण्यासही येऊं शकतात आणि नाशिकसारख्या धर्माचें आगर मानलेल्या तीर्थक्षेत्रीं आज तीन वर्षें ब्राह्मणादिक स्पृश्यांच्या सर्व गणपतींच्या पुढें अस्पृश्यांचा गणपति, हजारों लोकांच्या मिरवणुकींत प्रेमभरानें चालविलेला असतो. अशा स्थितींत इराणी उपहारगृहांतून चहा पिणाऱ्या, ट्रामवे आणि आगगाड्या यांतून रात्रंदिवस बिन्हाड पडलेल्या आणि मुकट्यास किंवा संध्येच्या पळीस, जुने ब्राह्मण अस्पृश्यास समजतात त्याहूनही अधिक अस्पृश्य

समजणाऱ्या, शेकडों अर्धवट ब्राह्मणांनीं आणि अनेक प्रामाणिक सुधारकांनीं गजबजलेल्या मुंबईस अस्पृश्यांचा मेळा गणपतीच्या नुसत्या दर्शनासही येऊं द्यावा कीं नाहीं, ह्या प्रश्नाचा विचार करावा लागावा हेंच लज्जास्पद होतें! अस्पृश्यांस देवदर्शन करूं दिलें तर म्हणे देव विटाळतो! हें विधान तत्त्वज्ञानाचा ज्या जातींत उदय झाला म्हणून जगांत यशोदुंदुभि निनादत आहे, त्या ब्राह्मण जातींत चर्चेस घेणें भाग पडावें हीच खरी लज्जेची गोष्ट आहे. ब्रह्मज्ञान झालें तो ब्राह्मण ना? मग ज्यास ब्रह्मज्ञान झालें, त्यानेंच भक्ताच्या दर्शनानें देव विटाळतो असें म्हणणें म्हणजे डोळसानें दिवस रात्र आहे, असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद नाहीं काय? आणि जर ब्रह्मज्ञानावांचूनही ब्राह्मणत्व येऊं शकतें असें म्हणाल, तर मग ह्या नामधारी ब्राह्मणांत आणि अस्पृश्यांत देहेंद्रियादिक मनुष्यत्वाचीं इतर गमकें, साधारणच असल्यानें महत्त्वाचा फरक असा कोणचा राहिला! ब्रह्मज्ञान किंवा शील किंवा उत्कट लोकहिततत्परत्व अंगीं नसतांही, ब्राह्मण म्हणवून घेऊं इच्छिणाऱ्यांत आणि साधारण अस्पृश्यांत मग जो एकच फरक उरतो, तो हा कीं, पहिल्यांचें हृदय अहंकारानें दगडाहून कठिण झालेलें असतें आणि दुसऱ्याचें तितक्या प्रमाणांत तरी तसें कठिण झालेलें नसतें. अस्पृश्य हिंदु पापी नसला तरी, आपण पतित आहोंत म्हणून भावीत असल्यानें स्वभावतःच लीन होतो; तर वरील नांवाचा ब्राह्मण पतित असूनही आपण मोठे पावक आहोंत म्हणून भावीत असल्यानें स्वभावतःच उद्धट आणि म्हणूनच अस्पृश्यांहूनही अस्पृश्य झालेला असतो!

तसें नसतें तर दर्शनानें देव बाटतो हा प्रश्नच ब्राह्मणांत उपस्थित झाला नसता. देव, तो बाटेल तरी कसा! अहो अस्पृश्यांच्या स्पर्शानें देव जर बाटला, तर ज्या दिवशीं त्यानें अस्पृश्यांस उत्पन्न केलें त्याच दिवशीं त्यांच्या स्पर्शानें तो बाटला आहे! देवाचें सर्वांत आवडतें नांव पतितपावन हें आहे. मग त्याच्या स्पर्शानें पतितच पावन होतील का पतितांच्या स्पर्शानें तो पावनच पतित होईल? आपला देव खराच का असा शेणामेणाचा आहे कीं, पाण्याच्या उत्तम तामसी हाताच्या स्पर्शाची उष्णता लागतांच तो वितळून जावा! महाराज, ही आपल्या देवाची आपण न कळत एवढी निर्भर्त्सना करीत आहां कीं, ती ऐकतांच नास्तिकांसहि लाज वाटावी! नाहीं: आपल्या हिंदूंचा देव असा शेणामेणाचा केलेला नाही. त्याची मूर्ति, त्याचें चित्र शेणामेणाचें असेल, पण तो भगवान पतिताच्या स्पर्शानें पतित होणारा नसून, आपल्या दिव्य स्पर्शानें पतितांसच पावन करणारा आहे. म्हणूनच त्यास देव म्हणतात. तो अच्छेद्योयम्, अदाह्योयम्, अक्लेद्योशोष्यएवच! असा आहे. तो शस्त्रानें छाटला जात नाहीं, तसाच तो स्पर्शानें बाटला जात नाहीं.

आपण ब्राह्मण स्वतःस भूदेव म्हणवितां आणि त्याच तोंडानें पुनः म्हणतां कीं, महारांच्या स्पर्शानेंच नव्हे, तर नुसत्या दर्शनानें तुम्ही आणि तुम्हां भूदेवांचा देवदेवही बाटेल म्हणून! देव पतितपावनः तुम्ही भूदेवः तुम्हीहि पतितपावन असावयास पाहिजे. पतित तुम्हांस स्पर्श करतांच, तोच पावन झाला पाहिजे. मग उलट

तुम्हीच त्याच्या स्पर्शास कसे भितां, दर्शनानें स्वतःच पतित व्हाल ही भीति कशी बाळगतां ? अग्नीला थंडी शिवली म्हणजे अग्नि का थंड होतो ! होत असेल तर तो अग्नीच नव्हे. दिव्याला स्पर्शतांच अंधकार दिव्य होतो का दिवा अंधळा होतो ? होत असेल, तर तो दिवाच नव्हे. गंगेस ओहळ शिवला तर गंगा का अपवित्र होते ? होत असेल तर " गंगा गंगेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि मुच्यते सर्वपापेभ्यो" ही स्मृति खोटी ठरली पाहिजे ! ओहळाला पावन करील तीच भागीरथी, तसा पतितांच्या दर्शनानें जो पतितासच पावन करतो तोच भगवान ! तोच आपल्या ब्राह्मण ज्ञातीच्या पितृपितामहांनीं, " वेदस्सांगपदक्रमोपनिषदैः " गायिला आहे ! श्रीहरीचा स्पर्श होतांच गजेंद्रासारखे पशुही उद्धरले, ही कथा प्रमाण मानणाऱ्यांनीं महारामांगादिकांसारखे प्रतिलोम विवाहापासून ज्यांची उत्पत्ति स्मृतींत दिली आहे असे आपल्या रक्ताचे, आपल्या बीजाचे, आपल्या हिंदु धर्माचे आणि आपल्या हिंदुदेशाचे बांधव आपले सख्खेभाऊ त्यांना देवाच्या दर्शनासही—स्पर्शाची गोष्ट दूरच, पण दर्शनासही—प्रतिबंध करावा ही केवढी खेदाची आणि अन्न दंभाची गोष्ट आहे !

नुसता शुद्धतेचा प्रश्न असेल तर मग ब्राह्मणादिक स्पृश्यांत जे पापी आहेत त्यांनाही मंदिरांत मज्जाव असावा, महारादिकांतील पाप्यांसही असावा आणि ब्राह्मणादिकांतील सुज्ञात, सुशील आणि सज्जन गृहस्थास दर्शन जसें घडतें तसें महारादिकांतील सज्जनांसही

घेऊं द्यावें. कारण महारादिकांतही असे धर्मभीरु लोक, आणि सच्छील आणि वारकरी आणि धारकरी शूर आहेत कीं, ज्यांच्या पायाची धूळ स्पृश्यांतील अनेक सूर्याजी पिसाळांनी आपल्या मस्तकीं धारण करावी. तेव्हां महार किंवा मांग किंवा चांभार म्हणून जाती-वर अस्पृश्यतेचा छाप अशुद्धतेच्या निमित्तानें मारतां येणार नाहीं. अशुद्धतेचाच प्रश्न असेल तर त्या मेळ्यांतील प्रत्येक महार मुलगा प्रातःकाळीं सर्वांसमक्ष अगदीं उत्तमांतील उत्तम साबण लावून स्नान करील, धुवून वस्त्रें नेसेल आणि ज्याच्या प्रभावानें "शत-जन्मकृतं पापं विनश्यति न संशयः।" तें रामनाम जपून तो तुमच्या गणपति मंदिरांत प्रवेश करील; मग तर झालें ना ?—ज्या गणपती मंदिरांत पारोशा चोरापोरांनाही ब्राह्मण म्हणवून घेतांच प्रवेश मिळतो आणि त्यांच्या दर्शनानें गणपति बाटत नाहीं, त्या गणपति मंडपांत अशा सुस्नात महार बंधूंचें प्रेमळ भजन करविलें तर आकाशांतून वज्राघात कोसळणार नाही किंवा भूकंपही उस-ळणार नाहीं, हें प्रतिज्ञेवर सांगण्यास कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं.

महारांची तर गोष्टच राहो; पण अगदीं ज्यांची माता प्रत्यहीं सकाळीं सार्वजनिक मलक्षालनाचें अत्यंत लोकोपकारक कृत्य करीत असते अशा भंग्याचा एक मुलगा रत्नागिरीच्या "पूर्वास्पृश्यांच्या" मेळ्याचा धुरीण आहे. त्याचा उच्चार, त्याचा आचार, त्याचा विचार आणि त्याची बुद्धिमत्ता पाहून, सांगितलें तरी तो भंग्याचा असावा म्हणून विचारण्यास लोक कचरतात. तो भंगी बालक परवांच्या गणेश चतुर्थीस रत्नागिरीच्या सार्वजनिक गण-

पतीच्याच नव्हे तर ब्राह्मणांच्या विशिष्ट गणपतीसही मिरवीत आणणाऱ्या मिरवणुकींत पालखीस लागून त्या मेळ्यांत 'भजन करीत होता ! रात्रीं उत्सवांत सर्व समाजांत, मुख्य देवालयाचे अंगणांत आणि ओट्यांत हिंदुत्वाचे जयजयकार हजारों स्पृश्यांचे खांद्याशीं खांदा लावून करीत होता. दिंड्यांतून सरमिसळ भजनांत दंग होता; पण 'भंग्यास' दर्शन घेऊं दिलें म्हणून गणपति अजून रागावलेले दिसत नाहींत, किंवा रत्नागिरीवर आकाशांतून एखादी वीज कोसळली नाहीं किंवा भूमि फाटून दुभंग होऊन रत्नागिरीला गिळती झाली नाहीं !

वास्तविक पहातां अस्पृश्यतेच्या हानिकारकपणाचा इतका खल गेल्या दोन तीन वर्षांत झाला आहे कीं, तिचें समर्थन करण्यास समर्थ असा एकही कोटिक्रम कोणापाशींहि उरलेला नाहीं. अजून कित्येक प्रामाणिक हिंदूंनाही जर अस्पृश्यास शिवणें कठीण वाटत असेल, तर तें युक्तिसंगत वा तात्विक उपपत्तीचे आधारानें नसतें, तर केवळ संवयीच्या प्रभावानेंच होय. जशी विडीची संवय लागली म्हणजे ती वाईट म्हणून पटते, तरी ती सोडवत नाहीं ! केवळ रूढी म्हणून ती अस्पृश्यता असावी असें वाटतें; स्मृति म्हणून नव्हे.

पण कोणी म्हणेलच कीं स्मृति तशा आहेत कीं नाहीं, तर त्यास इतकेंच उत्तर पुरे कीं, स्मृति अशाही आहेत कीं, " न वदेद्या-वनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि ! " मग किती ब्राह्मणांच्या मुलांनीं आणि मराठ्यांनीं इंग्रजी शिकणें सोडलें आहे ? म्लेंच्छांच्य

दास्यांत राहणाऱ्या, मुसलमानांस आपल्या मुलीबाळी पळवूं देणाऱ्या, आपलीं देवळें आणि सिंहासनें परकी उन्माद पायाखाली तुडवीत असतां कुत्र्यासारख्या शेंपट्या हालवीत नि तुकडे चघळीत जिवंत रहाणाऱ्या अशा प्रत्यहीं साहेबाच्या कचेरींत शालजोडीतले खाणाऱ्या कारकुनापासून तों शालजोडी पांघरून कॉलेजांतून युरोपियनास वेदविक्रय करणाऱ्या महामहोपाध्यायापर्यंत या पिढीं-तल्या कोणाहि हिंदूस स्मृतीचें नांव काढण्याचा लवलेश तरी अधिकार आहे काय ? अस्पृश्यांच्या विषयीं स्मृतीची आठवण होतांच आपण प्रांजलपणें आपल्या आत्म्यास विचारावें कीं, आज सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी किती कर्में स्मृतीला भिऊन केलीं ? म्हणजे प्रत्येक स्मृतिभक्ताच्या हेंहि निदर्शनास येईल कीं, अस्पृ-श्यता पाळा म्हणून म्हणणाऱ्या प्रत्येक स्मृतिश्लोकामागें अस्पृश्यता सोडा म्हणून सांगणाऱ्या स्मृतिश्लोकांचें अचकर हात धुवून लाग-लेले आहेत.

ब्राह्मण हो, क्षत्रिय हो, हे सात कोटी आपल्या धर्माचे आणि रक्ताचे भाऊ आज देवाची पूजा करावयास म्हणून आंत येऊं द्या, अशी करुण प्रार्थना करीत आहेत ! न्यायासाठीं, प्रेमासाठीं त्यांना आंत घ्या ! कुत्र्यास आपण शिवतों, तोंडाशीं तोंड लावितों—हीं आमच्यासारखींच मनुष्यें आहेत, आपल्या हिंदु-धर्माच्या विठ्ठलाचे वारकरी आहेत ! पण जर प्रेमानें नसेल, तर निदान भयानें तरी त्यांस देवदर्शन घेऊं द्या. आज ते तुमच्या

देवाचें पूजन करावयाचा सत्याग्रह करूं पहात आहेत: पण उद्यां दुष्ट म्लेंच्छाच्या पाखंडास बळी पडून, ते देवाचे भंजन करण्याचा शस्त्राग्रह करण्यास सिद्ध होतील, हें ध्यानांत धरा! पर-धर्मीय त्याचा बुद्धिभेद करीत आहेत: सहा कोटी मुसलमान आणि खिश्चन झाले, तसे अठरा कोटी मूर्तिभंजक उत्पन्न करावयाचे आहेत काय? जो अस्पृश्य ह्या छळानें बाटेल तो, त्याच्या आ-म्याचा तर घात करीलच करील, पण यासहच त्याच्या आणि आपल्या हिंदु राष्ट्राच्या आत्म्याचाहि घात करावयास चुकणार नाहीं! हें किती सांगावें: किती प्रकारांनीं सांगावें! ज्यास तुम्ही आपला देव समजतां त्याची भक्ती वाढविण्याचें तुमचें कर्तव्य आहे कीं घटविण्याचें!

केनियांत परधर्मी आणि परदेशी युरोपियन तुम्हांस अस्पृश्य समजतात; त्यांचेवर तुम्ही जळफळतां! तें न्याय्यच आहे. पण मग त्याच तोंडानें त्याच कोटिक्रमास उलटवून, ह्या तुमच्या स्व-धर्मीयांस स्वदेशांतच अस्पृश्य म्हणून तुम्ही जेव्हां धिक्कारतां, तेव्हां परमेश्वर तुमच्या या अहंकारी भोंदूपणानें संतुष्टच होत असेल नाहीं का? हा अन्याय श्रुतिस्मृतींला संमतच आहे नाहीं! याचा कांहीं विचार करा. आतां कसल्या स्मृति आणि श्रुति! स्मृतींचें आणि श्रुतींचें अस्तित्वच लुप्त होण्याचा, हिंदुराष्ट्र नामशेष होण्याचा प्रसंग जेथें आला आहे, तेथें ज्या ज्या उपायानें त्यांचें रक्षण करतां येईल, हें हिंदुराष्ट्र जिवंत आणि

विवर्धमान ठेवतां येईल, तें तें साधन स्मार्त आणि श्रौत आहेच आहे. जुन्या स्मृति अनुकूल आहेतच. पण नसल्या तरी नवीन करावयास पाहिजे होत्या. राष्ट्रासाठीं स्मृति आहेत; ज्यांनीं राष्ट्रनाश होतो त्या स्मृतिच नव्हत. धारण करीत नाहीं तो धर्मच नव्हे.

एतदर्थ तुटेल तों ताणूं नका. देव पतितपावन आहे, म्हणून पतिताला त्याचें दर्शन घेऊं द्या; न्यायासाठीं घेऊं द्या; अस्पृश्य आपल्या हिंदुधर्माचे भाऊ म्हणून घेऊं द्या; परधर्माच्या पंजांत फसून, त्यांनीं नरकांत पडूं नये आणि त्यांचे पतनाच्या भारासरशी तुम्हांसही नाशाच्या नरकांत पडणें भाग पडूं नये, बरी त्यांस देवदर्शन घडूं द्या; देवाचें नुसतें दुरून दर्शन ! अस्पृश्यांची ही मागणीहि ज्यास अधिक वाटते, तो मनुष्यच खरा खरा अस्पृश्य होय आणि पतित होय ! मग त्याला चारी वेद मुखोद्गत कां असेनात !

आमची मुंबईच्या ब्राह्मण वर्गास अशी हात जोडून विनंति आहे कीं, अस्पृश्यांचा मेळा गणपतीसमोर येऊं द्यावा म्हणून, ब्राह्मणसभेनें केलेल्या ठरावास त्यांनीं प्रबळ पाठिंबा द्यावा. जर कांहीं जुन्या प्रामाणिक लोकांनीं किंवा नव्या ढोंगी आणि उपद्यापी मंडळींनीं तो ठराव बदलून घेण्याचा घाट घातला, तर हातांपायां पडून ह्या दुष्ट व राष्ट्रघातक वृत्तीपासून त्यांस परावृत्त करा. एवढ्यानेंही काम भागत नसेल तर मुंबईतील हिंदु धर्माचा लव लेश तरी अभिमान असणाऱ्या प्रत्येक ब्राह्मणानें उद्यां ता. ९

दिवशीं ५ वाजतां सी. पी. टँक रोडवरील रामबागेंत भरणाऱ्या ब्राह्मण सभेच्या सभेला आपल्या मंडळींच्या टोळ्याच्या टोळ्या करून जावें. ब्राह्मण कारकुनांनीं त्या वेळे-पुरतीं कार्यालयें सोडून द्यावीं, कॉलेजांतील आणि शाळांतील झाडून साऱ्या नवविचारांच्या संघटनप्रेमी ब्राह्मण तरुणांनीं आणि किशोरांनीं कॉलेजें व शाळा सोडून द्याव्या, ठिकठिकाणच्या हिंदु सभांनीं ब्राह्मण वर्गाच्या मोठ्या मिरवणुकी काढून सभा-स्थानाकडे लोटावें आणि तें सभागृह शिस्तीनें, शांततेनें, नैर्बंधिक [ कायदेशीर ] विनयानें पण अदम्य उत्साहानें आणि चिकाटीनें नुसतें वेष्टून टाकावें आणि हिंदु-धर्मकी जयच्या गर्जनांचे पाऊस पाडीत सांगावें कीं, स्पृश्यांचा जो देव तोच अस्पृश्यांचा आहे ! तुम्ही आम्ही सकल हिंदु ! बंधु बंधु ! हिंदुत्वाच्या देवाचें दर्शन करण्याचा अधिकार प्रत्येक हिंदूस आहे. म्हणून अस्पृश्यांचा मेळा ब्राह्मण-सभेच्या गणपती-पुढें आलाच पाहिजे ! पतितास जर तो दिसत नसेल तर देवाच्या पतितपावनत्वाचा काय उपयोग ! पतितपावनाच्या दर्शनाचा पतितांसच प्रथमाधिकार आहे ! महारांतच पतित नसतात आणि मराठ्यांत असतात, ब्राह्मणांत असतात हें खोटें आहे ! ”

मुंबईच्या ब्राह्मणांनीं व ब्राह्मण तरुणांनीं, विद्यार्थ्यांनीं, प्रचंड समुदायानें झेंडे फडकवीत सभेकडे जावें आणि सांगावें, देवाच्या दर्शनास हिंदु अस्पृश्यांस कां येऊं देत

नाहींत ? माणसांत अस्पृश्यत्व असूं शकेल ! देवास दर्शनाची अस्पृश्यता ! भक्ताच्या दर्शनानें देव बाटतो ! थोतांड ! थोतांड ! हिंदु मात्र हिंदु देवतेच्या दर्शनाचा अधिकारी आहे ! कारण जो दर्शनानें बाटतो तो देवच नव्हे !

---

# श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य मठ संकेश्वर यांचें अभिनंदन

[ श्रद्धानंद तारीख ८।९।२७ ]

संकेश्वर मठाचे श्रीशंकराचार्य ( श्रीमान् शिरोळकर स्वामी ) यांनीं पंढरपूरला एका नायकिणीस शुद्ध करून घेतली, ही बातमी 'श्रद्धानंदा'च्या वाचकांस आठवतच असेल. ज्याअर्थी अनेक पत्रांतून ही बातमी प्रसिद्ध झाली असतां, तिचा अजून प्रतिवाद करण्यांत आला नाहीं त्याअर्थी ती बातमी खरी असली पाहिजे. जर नसेल तर श्रींनीं तिचा प्रतिवाद करावा. पण आमची तर उत्कट इच्छा आहे कीं, देव करो आणि ही बातमी खरी ठरो.

संकेश्वर मठांतूत अशा शुद्धी पूर्वी झालेल्या आहेत ही गोष्ट मराठी साम्राज्यांतील अनेक ऐतिहासिक पत्रांवरून निर्विवाद सिद्ध झालेली असून, त्यांतील एक दोन कागदपत्र श्रींच्या संकेश्वराच्या लिखाणांतच सांपडलेले आहेत. तेव्हां परंपरेची अडचणही नडत

नाहीं. तेव्हां त्यांनीं आतां हें शुद्धिकार्य श्रीमत् श्रीशंकराचार्य डॉ कुर्तकोटीप्रमाणेंच प्रबळलेनें पुढें ढकलावें अशी आमची त्यांस विनंति आहे. मठ करवीर आणि मठ संकेश्वर असे दोन्ही शंकराचार्य जर ह्या शुद्धीस उचलून धरतील, तर नष्ट होऊं पहाणाऱ्या हिंदु राष्ट्रांत नवीन चैतन्य संचरविण्याचें महच्छ्रेय त्यां उभयतांस लाभणारें आहे.

हिंदुस्थानांत गेल्या तीन चार वर्षांत दोन लाखांवर शुद्धी झालेल्या आहेत. यावरून समाज आचार्यांच्या पुढें शतकभर आधींच निघून गेला आहे हें स्पष्ट आहे. आतां तरी आपण फार पुढें गेलों तर समाजसंबंधच विच्छिन्न होईल ही भीति आचार्यांस धरण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट ते फार मागें राहिल्यानेंच समाजसंबंध विच्छिन्न होण्याची भीति आहे !

## हिंदु नायकिणींस एक अगत्याची सूचना

वरच्या लेखांत उल्लेखिलेल्या हिंदु नायकिणीनें जी आपली हृदयविदारक कहाणी जगद्गुरूस सांगितली तिचा वृत्तांत मागें आम्हीं श्रद्धानंदांत दिलाच आहे. त्या कहाणींत तिनें म्हटलेंच आहे कीं कोणीहि हिंदु स्त्री नायकिणीचा व्यवसाय सुरू करूं लागतांच तिला अशी थाप मारण्यांत येते कीं ह्या व्यवसायांत येण्याचे आधीं तुला मुसलमानी धर्माची दीक्षा घेतलीच पाहिजे ! कित्येक हिंदु नायकिणी स्वतः जन्मभर हिंदुधर्माप्रमाणें वागत असतांही आपल्या उपवर मुलीस आपल्या पिढीजाद व्यवसायास लावण्याचे आधीं केवळ रूढी म्हणून वरील थापेस बळी पडतात

आणि आपल्या त्या नवीन मुलीस कोणा मुसलमानाकरवीं थोडेसें साखरपाणी पाजवून नांवापुरती मुसलमानी दीक्षा देतात ! ज्या लुच्चा मौलवी लोकांनीं ही रूढि पूर्वी बादशाही दिवसांत पाडली त्यांचा कावा असा असे कीं, अशा नायकिणींच्या मुलांसही खास मुसलमान म्हणून कळकावतां यावें. हसन निजामी मुसलमानी वेश्यांचाही मुसलमानी धर्मप्रसाराचे कार्यी उपयोग करून घेतो म्हणून त्याची छीःथू करणाऱ्या हिंदूंनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, मुसलमानांत वेश्यांचा असा उपयोग करून घेण्याची परंपराच आहे. या त्यांच्या नीच कावयास विफल करण्यासाठीं आमची सर्व हिंदु नायकिणींस अशी प्रकट विनंति आहे कीं, त्यांनीं मुसलमानी लोकांनीं पाडलेल्या या रूढीस यापुढें बळी पडूं नये आणि नायकीण व्हावयाचें तर मुसलमानी धर्माची दीक्षा घ्यावीच लागते ही समजूत साफ सोडून द्यावी.

हें पहा: नायकीण होण्याचें दुर्दैवानें ज्यांस प्राप्त होतें किंवा ज्यांचा तो पूर्वापार ज्ञाति-व्यवसाय म्हणून ठरलेला आहे, त्यांनाही हिंदु धर्मात सद्गति मिळूं शकते. हरिनामाच्या साध्या साधनानेंही मन निर्मळ होऊन पांडुरंगाच्या भजनीं लागल्यानें, देहाच्या मलीनतेचा अपराध क्षम्य ठरला आणि अनेक धर्मनिरत गणिका भगवत्कृपेनें ह्या हिंदु धर्माची कास धरून आजवर मुक्त झाल्या ! ‘ गणिका नामेंच तारिली । चोखा म्हणे मात केली ’ हीं संतवचनें आणि ‘ अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।

साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ’ हीं भगवद्वचनें याची साक्ष देत आहेत.

नायकिणीच्या व्यवसायांत देहमलिनत्वाचें पातक लागतें. पण धर्मभगिनींनो ! आपल्या या हिंदुधर्मत्यागानें तर आत्मादेखील मलीन होतो; परधर्मग्रहणानें—व स्वधर्मत्यागानें आत्माच नाश पावतो ! धर्मत्यागाच्या आत्मघातक अशा या घोरतर पापानें तुमच्या व्यवसायाचें देहमालिन्याचें साधारण पाप नष्ट होईल हें संभवतें तरी कसें ! तेव्हां यापुढें कोणत्याही हिंदु नायकिणीनें आपल्या मुलामुलींस मुसलमानांच्या धर्माची नांवापुरती कां होईना पण दीक्षा देण्याची रूढि साफ सोडून द्यावी आणि आपल्या आत्म्याचें आणि आपल्या मुलींच्या आत्म्यांचें तरी हिंदुधर्मत्यागाच्या महा पापानें घोर पतन करून घेऊं नये. नायकीण व्हावयास हिंदु धर्म सोडण्याचें घोर पातक करावें लागतें ही समजूत अगदीं खोटी आहे. त्या व्यवसायाचें दैहिक पाप भस्म करण्याइतकें बळ आपल्या श्रीहरीच्या नामसंकीर्तनांत आहेच आहे, यावर आमच्या त्या धर्मभगिनींनीं विश्वास ठेवावा आणि आपणांस सदोदित हिंदु म्हणूनच म्हणवावें.

जी दुसरी भोळसर कल्पना त्यांस नडते तीहि त्यांनीं टाकून द्यावी. चुकून माकून घेतलेल्या मुसलमानी पाण्याच्या घोटांत हिंदुत्व बुडून जाण्यासारखें कांहीं तें क्षुल्लक व निर्जीव नाहीं ! तुमचें रक्त हिंदूचें, तुमचें मन हिंदूचें, तुमचें बीज हिंदूचें—तें

सर्व मुसलमानी पाण्याच्या एका शिंतोड्यासरशीं किंवा गुळणी, सरशीं बदलणें शक्यच नाहीं. एक गुळणी तर काय पण मुसलमानाचे घरचें रांजणभर पाणी जरी तुह्मी प्यालां असाल तरी तें जिरवून पुन्हां हिंदूंच्या हिंदूच रहा; आपल्या हिंदु अगस्तीनें एका आचमनांत समुद्र पचविला; मग त्या पाण्याच्या शिंतोड्याची काय कथा! मुसलमान नायकिणी हिंदूंचें खाऊन, हिंदूंचें पिऊन, हिंदूंना लुबाडून पुन्हां मुसलमानच्या मुसलमानच राहूं शकतात. आमच्या हिंदु नायकिणीचा हिंदुधर्म तर असा अग्निसारखा जाज्वल्यच असला पाहिजे कीं, त्यांस मुसलमान स्पर्श करूं पहातांच त्याचें मुसलमानीपण जळून जाऊन तोच हिंदु व्हावा! भगवंताचें श्रीहरि हें मंजुळ आणि परमपवित्र नाम तेंवढें जपत जा म्हणजे तुमचा आत्मा कधींहि मलिन होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यायोगें हलुहलु तुमचें देहमालिन्यही भक्तिगंगेत न्हाऊन धुवून दूर होईल व तुमचा देह शुद्ध बनेल.

पदाब्जरज जें तुझें सकल पावनाधर तें
अघाउरीह तारिले बहु तुवांचि राधारतें
अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
अशां गति दिली, उरे तृण न भेटतां इंगळा

# संघटन-शक्तीचा प्रभाव !

## हिंदुधर्माकरितां स्पृश्य-अस्पृश्यांचें सहकार्य

[ श्रद्धानंद तारीख ८।९।१९२७ ]

गोकुळअष्टमीस रत्नागिरी नगरांत चार पांच ठिकाणीं उत्सव असतात; अर्थात् काल्याचे समारंभांत तितक्या ठिकाणीं हिंदु-समाज पांगला होता. विठोबाच्या मुख्य देवळांत लाठीचे खेळ आणि मेळे होऊन बॅ. सावरकर यांचे हस्तें पारितोषकें वांटण्यांत येऊन त्यांचें लहानसें भाषण झालें. त्यांत त्यांनीं राधाकृष्णाचे वैश्यबंधूंच्या पालखीसही परवाना मिळाल्याविषयीं आनंद आणि अभिमान व्यक्त केला. तोंच 'हिंदुधर्मकीजय' च्या गर्जना उठून विठोबाची पालखी बाहेर पडली. मिरवणूक अर्ध्या मार्गावर येतांच मुसलमानांतील सारे पुढारी तिला आडवे झाले आणि दंडेलीच्या गोष्टी बोलूं लागले; परंतु हिंदूंनीं साफ उत्तर दिलें, 'आम्ही पालखी वाजत नेणार; ही आमची वहिवाट आहे. काय बनेल तें करून घ्या.' पोलिस अधिकाऱ्यांनींही तसेंच उत्तर दिलें. पालखीबरोबरचा समाज तर "हिंदुधर्मकी जय" करीत सारखा पुढें रेटीत चालला. तेव्हां मुसलमान दबले आणि 'ह्या जुन्या पालखीस आम्ही जाऊं देतों, पण नवीन अडविणार' म्हणून म्हणत मागें हटले. पालखी मोठ्या उत्साहानें मशीदीवरून वाजत गाजत आली. पण ती येते तों राधाकृष्णाची पालखी निघावयाची वेळ झाली. मुसल-मान ह्या पालखीस अडवणार म्हणून बातमी त्वरित गल्लोगल्लींत

धाडण्यांत आली. जेथें जेथें हिंदूंचे समारंभ चालले होते तेथें तेथें मंडळीनें ते तसेच सोडून मंडळी राधाकृष्णाच्या पालखीचे रक्षणार्थ धावूं लागली. ज्या वैश्य मंडळीचा सहा वर्षांचा त्या राधाकृष्णाचे चालकांशीं तीव्र वाद होता, तीच वैश्य मंडळी तो वाद तात्काळ विसरून आणि आपली पालखी देवळांत तशीच ठेवून परत राधाकृष्णाचे वैश्यांच्या खांद्याशीं खांदा लावून उभी राहिली. श्री. पटवर्धनबंधू यांचेकडील उत्सवांतील काला खेळलेली मंडळी स्नान करीत होती. पण असाल तसे निघा, पालखी अडली, अशी बातमी येतांच अर्धे ओलेते, जो जसा होता तसा, लाठी घेऊन बाहेर पडला. ब्राह्मणांची, भिक्षुकांची, वैश्यांची, महारांची, चांभारांची टोळकीं सर्व मार्गांतून धांवपळ करीत राधाकृष्णाकडे लोटूं लागलीं. मुसलमान आडवे आले— पण त्यांनीं अपेक्षा केल्याप्रमाणें हिंदूंच्या घरगुती फुटीनें त्यांचा समाज विछिन्न न होतां असा एकसारखा भरत चाललेला पाहून ते दबले. हिंदूंची राधाकृष्णाची पालखी वाजत मशीदीवरून जाण्याची वहिवाट नाहीं, असें त्यांनीं म्हणतांच हिंदूंनीं सांगितलें कीं, आम्हीं प्रतिज्ञेवर सांगतों कीं, आमची पालखी आम्हीं वाजत मशिदीवरून सदोदीत आणलेली आहे. पोलीस अधिकारी श्री. राजे यांनी मुसलमानांस परत जाण्याचा हुकूम सोडला आणि मिरवणुकीची उत्तम व्यवस्था आणि संरक्षण केलें. मुसलमानांचे भर वस्तींतून मशिदीवर मिरवणूक चालली असतां दोन्ही बाजूंला शेंकडों मुसलमान उघड आणि छपून दंडेली व

विरोधास सज्ज राहिलेले दिसत होते. पण तो हिंदूंचा अलोट आणि कृतनिश्चयी जमाव व पोलिसांची न्याय्य आणि निःपक्षपाती व्यवस्था यांपुढें त्यांची पुढे येण्याची छातीच होईना ! वाद्यवाल्यांस हिंदूंतील एकानें सांगितलें कीं ' जर दंग्यास आतां तोंड लागलें आणि तुम्हीं घाबरून वाद्यें टाकलींत तर हात तोडून टाकूं ' डॉ. शिंदे म्हणाले, " ढोल माझ्याकडे द्या, मी गळ्यांत घालून वाजवितों. मग बघूं कोण बंद ठेवतो तें ! " यावरून हिंदूंचा उत्साह दिसून येईल. मशिदीवर ' हिंदुधर्मकी जय ' च्या गर्जनांस नुसता ऊत आला होता. महारांपासून भिक्षुकांपर्यंत खांद्याशीं खांदा भिडवून लोक उभे होते. मिरवणूक परत आली तरी शहरच्या मंडळीच्या लाठीबंद टोळ्या बातमी ऐकल्यानें पालखीच्या रक्षणास येतच होत्या ! जो तो म्हणे " पालखी कोणाचीही असली तरी देव हिंदूंचा आहे. तुम्हीं आम्हीं सकल हिंदु, बंधु बंधु. "

रत्नागिरीत हिंदुसंघटनाचें कार्य किती झालें त्याची काल परीक्षा होती ! दंगा होणार हें ऐकतांच असलेले लोक घरांत दडण्याची —"मला काय त्याचें " ची प्रवृत्ति पुष्कळ अंशीं टार होऊन दंगा होणार हें ऐकतांच अर्धे अर्धे ओलेते, उघडे वाघडे—जसा होता तसा हिंदु लाठी घेऊन घराबाहेर पडला आणि देवाच्या नांवानें रंगणांत उतरला ! रत्नागिरीची कालची परीक्षा उतरली. अशीच उद्यांची—आणि परवांची—आणि ती शेवटची परीक्षाहि उतरो ! आणि कृष्णाचे कृपेनें कृष्णभक्तांचा तो अश्वमेधीय अंतिम विजय होवो ! !

आमची अजूनहि असीच इच्छा आहे की, आतां तरी आ-
मच्या मुसलमान नागरिकांनीं पाण्यांत राहून मांशाशीं वैर करण्याचें
सोडून द्यावें. मशीदीवरून वाद्यें बंद करण्याचा त्यांचा हट्ट दुर-
भिमानाचा आणि धर्मवेडाचा आहे. हिंदु कधीं म्हणतात का कीं
तुम्हीं आमचे देवळांवरून वाजतगाजत जाऊं नका म्हणून ,
आमचीं कथा–कीर्तनें चालू असतां तुमच्या मोहरमच्या मिर
नाचत ओरडत जातातच. मग तुमचीच प्रार्थना बिघडते दु-
केवळ ढोंग आहे. आज पन्नास वर्षें जाणाऱ्या पाल क्ष-
बिघडत नाहीं आणि राधाकृष्णाचे पालखीनें ती बिघ कीं,
पणाचें म्हणणें सोडून द्या. हिंदूंच्या देवळांवरून णतां,
तुमच्या मशिदींवरून हिंदु जातील. नगरमार्ग सार्वा हिं वेळ
हवें त्यांस वाजत जाण्याचा अधिकार आहे. उद्यां तुर आहे !
चर्चवर प्रार्थनेसाठीं म्हणून वाद्यें वाजविण्यास हरकाणि बोलतांना
तुम्ही काय म्हणाल ? तेव्हां शहाणपणानें हा दुराग्र अशी एकीवर
खेळीमेळीनें देशबंधूसारखे नांदा. हिंदु तुमचे आ ा कीं, ीं च्या
दंडेली करण्याचें मनांत आणाल तर हें ध्यानांत आम्ही
आतां हिंदुसंघटनाचे आणि शुद्धीचे युगांत आप आहों. गखी
कालच्या प्रकारावरून तुम्हीं पाहिलेंच असाल कीं-

कलहीं परस्परांच्या आम्ही शतसंख्य आ पांच । तो च
परि अन्यशत्रुघातीं हिंदु आहोंत एकशें ॥

---

# स्वराज्यासाठींच संघटन हवें

## कारण

# ज्यांत स्वत्व राहवें तेंच स्व-राज्य होय !

( श्रद्धानंद, ता. ५।५।२७ )

हिंदुसंघटनाविषयीं पुष्कळ प्रामाणिक लोक देखील ही शंका घेतात कीं, " जातिविषयक भावना प्रबळ करविणारी ही संघट[illegible]ची चळवळ राष्ट्रीय भावनेस हानिकारक तर होणार नाहीं ना ? [illegible] मुसलमानादिक सर्व धर्मांचे आणि जातींचे लोक जोंवर एकत्र [illegible]चंन राष्ट्रीय जीवन जगविण्यास किंवा त्या जीवनाचे प्राप्तीसाठीं [illegible] हित मरण्यास सिद्ध झालेले नाहींत तोंवर स्वराज्य मिळणें [illegible]नागि असल्यानें, मुसलमानांस ज्यायोगें दुःख होतें अशा [illegible] दंगाहि हिंदवी ( हिंदुजातिविशिष्ट ) चळवळी काढून हिंदु-"मला कल निरनिराळया जातींत वैमनस्य उत्पन्न करण्याचे प्रयत्न होणार हेच होणारे आहेत, स्वराज्यासाठीं ही संघटनविषयक [illegible] तसा हिंडुडणें हें राजनीतीचे दृष्टीनेंही अत्यंत शहाणपणाचें [illegible] कांहीं दिवस जर आपण मुसलमानांच्या वाटेल त्या [illegible] केल्या आणि त्यांस रुचतील त्याच अटींप्रमाणें [illegible]दुमुसलमानांची एकी साध्य होऊन स्वराज्य प्रस्थ-[illegible]ल. तें महान् श्रेय आपल्या राष्ट्रास इतकें लाभ-

कारक आहे कीं, त्याच्या प्राप्तीसाठीं वाटेल त्या तडजोडीचें आणि पडेल त्या स्वार्थत्यागाचें मूल्य हें स्वस्तेंच होणारें आहे. तेव्हां स्वराज्य हिंदुमुसलमानांच्या एकीवर अवलंबून असल्यानें आणि हिंदुमुसलमानांची एकी हिंदुसंघटनानें बिघडण्याचा निश्चित संभव असल्यानें स्वराज्यासाठीं आपण हिंदुसंघटन सोडून दिलें पाहिजे. राजनीतीच्या दृष्टीनेंहि हें आपल्या राष्ट्रास हितावह होणारें आहे."

वरील शंकेनें विचलित झालेले जे लोक प्रामाणिकपणें हिंदु-संघटनावर उपर्युक्त आक्षेप आणितात, त्यांस हिंदुसंघटनाचे पक्ष-पाती तितक्याच प्रामाणिकपणानें चटकन् उत्तर देतात कीं, 'तुम्ही स्वराज्यप्राप्तीचे मार्गांत येतें म्हणून संघटन त्याज्य म्हणतां, पण ही तुमची समजूत मूळांतच लटकी आहे. आम्हांस एक वेळ स्वराज्य न मिळालें तरी चालेल पण आम्हांस संघटन हवें आहे !' हिंदुसंघटनाचे अभिमानी पुढारी हे वारंवार लिहितांना बोलतांना आढळून येतात कीं, स्वराज्य हें हिंदुमुसलमानांच्या एकीवर अवलंबून आहे हें अगदीं खरें आहे. परंतु त्या एकीसाठीं ज्या हिंदुत्वविघातक अटी मुसलमान घालीत आहेत, त्या आम्ही कधींहि मानणार नाहीं. मग त्यापायीं आम्हांस स्वराज्य आणखी हजार वर्षें न मिळालें तरी चालेल !

केव्हां केव्हां एखादा प्रश्नच असा चकवून घातलेला असतो की त्याचें उत्तर, त्या प्रश्नांतील हेत्वाभासामुळेंच हटकून चुकलेलेंच यावें. पठाण लोकांस कारागारांत असाच एक प्रश्न विचारून फसवितांना आम्ही कित्येक विनोदी लोकांस पाहिलें आहे. नवीन

पठाण बंदिवान येतांच त्यास इतर बंदिवानाप्रमाणें नांव गांव विचारून झटकन् विचारलें जाई कीं, " तूं कोण? पठाण कीं मुसलमान ? " अर्थात् तो नवागत बंदी झटकन् सांगे, ' मी पठाण !' तर मग तूं मुसलमान नाहींस तर ? असें विचारतांच तो मनुष्य सहजच गोंधळे आणि आजूबाजूस हंशा पिके. पठाणपण आणि-मुसलमानीपण हीं परस्परविरुद्ध नसल्यानें, मी दोन्हीहि आहें हें खरें उत्तर, त्या प्रश्नांतील हेत्वाभासामुळें सहसा सुचेनासें होऊन हटकून चुकीचें उत्तर येई. मुलांतहि असा एक खेळ असतोच. प्रथम त्यास दहा पांच प्रश्न, तूं शहाणा कीं वेडा, पुरुष कीं बायको, इत्यादि पूर्वार्धइष्ट असलेल्या उत्तरांचे विचारीत चटकन् विचारिलें कीं, तूं गाढव कीं गद्धा, कीं तो चटकन् सांगतो कीं मी गाढव ! आणि अगदीं चाणाक्षपणें पूर्वार्ध टाळण्याचें ध्यानांत आलें तर उत्तरार्ध तरी तोंडांतून निघून जातोच कीं " गाढव नाहीं, गद्धा " !

" स्वराज्य हवें कीं संघटन " हा प्रश्नहि अशाच प्रकारच्या हेत्वाभासानें दूषित झालेला आहे. आणि म्हणूनच त्याचे उत्तर बहुतेक संघटनावादी लोक चटकन देऊन बसतात कीं " संघटन ! स्वराज्य मिळालें नाहीं तरी चालेल पण आम्हीं संघटन सोडणार नाहीं ! " अर्थात् " स्वराज्य हवें कीं संघटन " या प्रश्नांतील हेत्वभावामुळेंच " स्वराज्य नको, संघटन हवें, " हें चुकीचें उत्तर सहजच देण्यांत येतें आणि त्या उत्तरांतील चुकीही अप्रिय वाटत असतांहि, ध्यानांत येत असतांहि, ती टाळावी कशी

हें, ज्यांचें स्वराज्यावरहि आणि संघटनावरहि उत्कट प्रेम आहे अशा पुष्कळ प्रामाणिक माणसांस सहसा उमगत नाहीं.

परंतु 'स्वराज्य हवें कीं संघटन' या प्रश्नांतील हेत्वाभास स्पष्टपणें विवृत केला असतां, वरील उत्तरांतील हा विचारविभ्रम सहज टाळतां येतो. 'स्वराज्य हवें कीं संघटन' या प्रश्नाचें सरळ उत्तर हें आहे कीं, या दोहोंमध्यें 'हें कीं तें' असला मूलतः विरोधच नाहीं. संघटन हें साधन आणि स्वराज्य हें साध्य आहे. 'स्वराज्य कीं संघटन' हा प्रश्न नसून सध्यांच्या परिस्थितींत संघटन केलें तरच स्वराज्य मिळणें शक्य आहे. आम्हांस स्वराज्य आणि संघटन हीं दोन्हींहि हवीं आहेत. कारण आम्हां हिंदूंस अभिप्रेत असलेलें स्वराज्य, हिंदु संघटनावांचून मिळणें शक्यच नाहीं, हें पूर्वींहि कांहीं विचारवंत देशभक्तांच्या ध्यानांत आलेलेंच होतें—आज तें मध्याह्नींच्या दिवसाइतकें सुस्पष्टपणें प्रत्येक हिंदूच्या प्रत्ययास येत आहे.

कारण ज्या स्वराज्याकरितां आम्हीं धडपडत आहों, ज्या स्वराज्याकरितां सत्तावनच्या क्रांतियुद्धापासून शेकडों, हजारों क्रांतिकारक हिंदु वीर सशस्त्र प्रतिकार करीत रणांत मेले, फांशीवर लटकले, अंदमानांत सडले, कारागारांत पडले, देशोधडीं लागले, ज्या स्वराज्याकरितां राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून तों असहयोगाच्या आंदोलनापर्यंत शेकडों नेमस्त आणि हिंदु पुढारी निःशस्त्र प्रतिकार करीत आणि लोकमान्यांपासून महात्माजींपर्यंत खटपटत आले तें स्वराज्य म्हणजे हिंदुस्थान देशाचें एकराष्ट्रीय, स्वायत्त, लोक-

स्वलोक आणि स्वतंत्र राज्य हेंच होय. या स्वराज्यांत हिंदी नागरिक असलेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषाचें जातिपंथनिर्विशेष असलेलें स्वत्व राखिलें जाईल. प्रत्येक धर्मास आणि जातीस, तदितर धर्मास आणि जातीस आपआपल्या संख्यांप्रमाणें जे न्याय्य अधिकार उपभोगितां येतात, ते समानत्वें बजावतां येतील. हें स्वराज्य केवळ हिंदूंचेंहि नसेल, तें अहिंदूंचेंहि नसेल; तर तें प्रत्येक हिंदी मनुष्याचें असेल आणि त्यांत प्रत्येकास आपलें न्याय्य स्वत्व न गमावत नांदतां येईल.

या स्वरूपाचेंच स्वराज्य तुम्हांस अभिप्रेत आहे ना ? मग हिंदु संघटनाचें ध्येयहि याच स्वरूपाचें स्वराज्य हें आहे, यामुळें "संघटन कीं स्वराज्य" हा प्रश्नच चुकीचा ठरत असून, स्वराज्यासाठींच संघटन हवें हें सिद्ध होत आहे.

स्वराज्याचें स्वरूप असें असलें पाहिजे असें तुम्ही म्हणतां ना कीं त्यांत हिंदु किंवा मुसलमान अशी कोणचीही धार्मिक भेदाभेदाची कल्पना न शिवतां त्याचें स्वरूप केवळ हिंदीपणाचें असावें आणि त्यांत मुसलमानादिक प्रत्येक धर्म–पंथ–जातिमात्राचें स्वत्व समप्रमाणानें आणि यथान्याय राखिलें जावें ? ठीक तर: जर या स्वराज्यांत प्रत्येक धर्मपंथाचें स्वत्व राखिलें जाणार आहे, तर मग त्यांत हिंदुधर्मांचेंहि स्वत्व समप्रमाणानें आणि यथान्याय राखिलें गेलें पाहिजे नाहीं काय ? इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील लोकसंख्येचा दोन तृतीयांश भाग ज्या हिंदूंचा आहे, त्यांचें स्वत्व ज्या स्वराज्यांत इतर अत्यल्प किंवा

अल्प अशा अहिंदु समाजाच्या स्वत्वाच्या अतिरेकी मागण्यांस बळी दिलें जातें, तें स्वराज्यच नव्हे—तुम्हीं म्हणतां त्या व्याख्येप्रमाणें देखील तें स्वराज्यच नव्हें हें मानलेंच पाहिजे नाहीं काय? तर मग या प्रमेयावरून दुसरें प्रमेयहि आपोआपच अनुमानिलें जातें कीं नाहीं कीं, अशा रीतीनें हिंदूंचें स्वत्व इतर अहिंदु समाजांच्या अवास्तव आणि अवाच्या सवा मागण्यांस आम्ही बळीं देऊं देणार नाहीं आणि उलटपक्षीं त्या आमच्या अहिंदु राष्ट्रबंधूंच्या न्याय्य मागण्यांचा प्रतिकार न करितां जे पंथ—स्वातंत्र्याचे अधिकार आम्हीं भोगूं इच्छितों तेच इतरांसहि उपभोगूं दिल्यावांचून आम्हीं राहणार नाहीं म्हणून प्रतिज्ञाबद्ध असलेलें हिंदुसंघटन हें त्या स्वराज्याच्या विरुद्ध जात नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याच्या सिद्धीसाठीं प्राणपणानें झटत आहे. “ संघटन स्वराज्यास हानिकारक आहे काय ” हा प्रश्न हेत्वाभासानें इतका दुष्ट झालेला आहे कीं, संघटनावांचून स्वराज्य शक्य नाहीं हें उलट विधानच काय तें त्याचें यथार्थ उत्तर होऊं शकावें. कारण वर विवरण केल्याप्रमाणें ज्यांत हिंदूंचें सत्व हें निदान इतरांच्या स्वत्वाइतकें तरी अबाधित राहूं शकेल तेंच स्वराज्य अभिप्रेत असल्यानें त्याच हेतूसाठीं यत्न करीत असलेलें संघटन, त्याच स्वराज्याचें एक अत्यंत उपकारक साधन आहे, हें सिद्ध होत आहे. संघटनाचा हेतु साध्य झाला कीं स्वराज्याची प्राप्ति झालीच. कारण तो हेतु इतर कोणचाहि नसून स्वयमेव स्वराज्य हाच होय.

परंतु ज्याअर्थी स्वराज्य हें ज्यांत आमचें हिंदूंचें स्वत्व स्थिर आणि

अभंग राहून इतर राष्ट्रीय बंधूंशीं आम्हांस सहनागरिकत्व भोगतां येईल तें स्वराज्य होय, त्याअर्थी स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं मुसलमानांशीं वाटेल त्या अटींवरहि कां होईना पण एकी करावी या नेभळट धोरणाचा हिंदु संघटन तिरस्कार करितें. खिलाफतीसारख्या त्यांच्या निर्भेळ धार्मिक असणाऱ्या, इतकेंच नव्हे तर ज्यांतील मूल तत्व हिंदी राष्ट्रीय भावास अत्यंत हानिकारक आहे अशा चळवळींहि केवळ मुसलमानांस प्रसन्न ठेवण्याकरितां अंगिकारिल्या जाव्या हें हिंदुसंघटनास आत्मघातकी वाटतें, तें यासाठींच. आमच्या खलिफाशीं लढणें हें आमच्या मुसलमानी धर्माविरुद्ध आहे, हें राष्ट्रीय भावास अत्यंत घातक असलेलें तत्व त्या खिलाफती बुडाशीं होतें. उद्यां स्वराज्य प्राप्तीनंतर हिंदुस्थानची तुर्कस्थानशीं किंवा अजूनहि खलिफा असलेल्या मोरोक्कोशीं लढाई जुंपली तर याच तत्वानें प्रस्फुरित झालेले हिंदी मुसलमान ह्या तत्वाची हीच कट्यार याच हिंदुस्थानचे पोटांत खुपसुन तुर्कस्थानच्या किंवा मोरोक्कोच्या पक्षास मिळून हिंदुस्थानांत स्वराज्याशीं बंड करून उठण्यास सज्ज होणार! असल्या राष्ट्रघातक आणि धर्मवेडाच्या चळवळीसहि हिंदूंनीं लाखों रुपये देऊन आणि शेंकडों जणांना कारावासांत धाडून साह्य करावें—कां तर म्हणे त्यायोगें मुसलमान संतुष्ट होतील, त्यामुळें एकी होईल आणि त्या एकीनें स्वराज्य प्राप्त करितां येईल! आज जुन्या मशिदींवरून प्रार्थनेच्या वेळेस वाद्यें बंद करा, उद्यां सदोदित बंद करा, परवां नव्या मशिदीवरूनहि बंद करा, आणि तेरवां गांवांतील बहुतेक राजमार्गांवर नवीन मशीद झाल्यानें वाद्यें

वाजविण्याचा तुमचा धार्मिक हक्क आमूलतःच मृतप्राय होऊं द्या. इतकेंच नव्हे, वाद्यें ज्या अर्थी आमच्या निमाजास अडथळा करितात म्हणून बंद करावयाचीं, त्याचप्रमाणें आणि त्याच अर्थी तुम्हीं तुमच्या घरांतहि शंख, तास, टाळ आणि घंटा मोठ्यानें वाजवूं नका. भजनें देखील संघानें करूं नका; कारण आमच्या शेजारच्या घरीं किंवा मशिदींत निमाज पढतांना त्या गोंगाटानें चित्त व्यग्र होतें ! आम्हां मुसलमानांची एकी हवी तर, ही अट आहे--काल्पनिक नव्हे तर उत्तर हिंदुस्थानांत प्रत्यहीं अशा अटी मुसलमानांनीं घातल्याविषयींच्या आणि हिंदूंच्या घरांत दंडेलीनें घुसून त्या पाळविल्याच्या वास्तविक बातम्या येत आहेत. बंगाल मध्यें तर खेडेगांवांतून हिंदु वस्तीस तुमच्या अमुक अमुक कन्यका मुसलमानांस देत असाल तर एकी होईल, नाहीं तर तुम्हांस लुटून कुटून नष्ट करण्यांत येईल म्हणून मुसलमानांकडून उघड उघड सूचना दिल्या जात आहेत आणि त्यांची भयंकर पूर्तताहि कित्येक ठिकाणीं झालेली असून, त्या त्या हिंदु कन्यकांस बळानें ओढून नेण्यांत आलें आणि ती ती हिंदूंची वस्ती मारहाणीनें आणि जाळपोळ करून त्रस्त करण्यांत आली, हें ‘ श्रद्धानंदां ’ तून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेलेंच आहे. आणि हा अत्याचार आम्ही काय म्हणून सोसावा, तर म्हणे त्यायोगें ‘एकी’ होईल—आणि त्या एकीनें स्वराज्य मिळेल ! मलबारच्या कत्तलीविषयीं आम्ही मूग गिळून बसावें, लारखाना बंगाल—कोहाट येथें प्रत्यहीं घडणाऱ्या राक्षसी दंग्याच्या आणि धर्मवेडी आततायीपणाच्या छळाविषयीं नुसत्या

शब्दानेंहि प्रतिकार किंवा स्पष्ट स्पष्ट निंदा न करितां हिंदु आणि मुसलमान हे दोघेहि दोषी आहेत म्हणून, अत्यंत असत्य आणि भ्याडपणाचीं विधानें करावीं–कां, तर त्यायोगें एकी होईल आणि तीमुळें स्वराज्य मिळेल ! मुसलमानांनीं हिंदूंना भ्रष्ट करणें हा त्यांचा धर्मच आहे, करूं द्या त्यांना भ्रष्ट. पण तुम्हीं हिंदूंनीं मात्र शुद्धी करतां कामा नये. तसें केलेंत तर आणि तुमच्या वतीनें न्यायालयांत जरी तुमचा तसें करण्याचा हक्क प्रस्थापित झाला, तरी आम्हीं लारखान्याप्रमाणें तुमचीं डोकीं सड-कून जाळपोळ करीत दंगे करूं–तें सर्व तुम्हीं हिंदूंनीं 'एकी' हवी तर सहन केलें पाहिजे. आम्हांस आज पांच जागा विधि-मंडळांत अधिक द्या, उद्यां पन्नास द्या, परवां सिंधसारखे प्रांतचे प्रांत आम्हांस स्वतंत्रपणें तोडून द्या–कारण आम्हीं 'मुसलमान' आहोंत, आम्हांस हिंदूंहून विशिष्ट अधिकार दिले पाहिजेत. नाहीं तर ! एकी होणार नाहीं–एकी नाहीं झाली तर स्वराज्य मिळणार नाहीं ! त्याच्याहि पुढें जाऊन, जे शब्द ऐकतांच कोणाहि अस्सल हिंदूचें रक्त संतापानें भडकून जावें, किंवा लज्जेनें गारठून जावें ते निर्लज्ज शब्द उच्चारण्यास न कचरतां कांहीं लोक, कांहीं खिलाफती हिंदु लोक, असें स्पष्टपणें म्हणतांना आम्हीं ऐकले आहेत कीं, फार काय एकीसाठीं "हिंदूंनीं मुसलमान देखील व्हावें ! आणि स्वराज्य मिळवावें !"

स्वराज्य अशा अटीवरच जर मिळत असेल तर त्याला आग लागो आणि स्वराज्य मिळविण्यासाठीं हिंदूंनीं मुसलमान देखील

व्हावें म्हणून म्हणणारी ती जिव्हा झडून पडो ! ज्या स्वराज्यासाठीं हिंदूंना मुसलमान व्हावें लागतें त्या स्वराज्याचें हिंदुसंघटन तोंड देखील पाहूं इच्छित नाहीं. कारण हिंदूंनीं मुसलमान होऊनच जें मिळतें किंवा ज्यांत वर वाणलेल्या अटी हिंदूंना पाळाव्या लागल्यानें, हिंदूंस मुसलमानांच्या ताटाखालील मांजरें बनून राहावें लागतें, तें स्वराज्यच नव्हे; तें मुसलमानी राज्य आहे. ज्यांत स्वत्व अबाधित राहूं शकतें तें स्वराज्य. ज्यांत आम्हांस प्राणापलीकडे प्रिय असलेलें आमचें स्वत्व—आमचें हिंदुत्व आम्हांस सोडावें लागतें किंवा त्याच्या सन्मानाचा ध्वज अहिंदूचे पायावर नमवावा लागतो, तें आम्हां हिंदूंचें स्वराज्यच नाहीं ! तें मुसलमानी राज्यच होय. आमच्या स्वत्वाप्रमाणें मुसलमानांसहि न्याय्य अधिकार मिळून त्यांचें स्वत्वहि—न्याय्य स्वत्वहि—ज्यांत राखलें जाईल, अशा स्वराज्यास आम्ही आपली निष्ठा अर्पण करूं. किंबहुना हिंदु संघटनाचें हेंच ध्येय आहे, हें पूर्वीच आम्हीं सांगितलें आहे. परंतु पदोपदीं जातीय अपमानानें मान खालीं घालावयास लावणाऱ्या वर वर्णन केलेल्या मुर्दाड आणि आततायी अटींवरच जी एकी आणि जें स्वराज्य मिळूं शकतें, त्याचा आम्हीं हिंदू शतवार धिक्कार करितों. या मुर्दाड आणि आततायी अटी आजच्या त्यांच्या परतंत्र आणि पतित स्थितींतहि घालण्यास जे मुसलमान कमी करीत नाहींत, ते त्या अटीप्रमाणें आम्ही वागलों तरी स्वराज्य मिळाल्यानंतर तेच मुसलमान सबळ आणि स्वतंत्र झाले असतां यांहूनहि भयंकर

अर्जी घालीत घालीत आणि हिंदूस दडपीत, त्या स्वराज्यास औरंगजेबी बादशाहीचेंच स्वरूप देण्यास थोडेच कचरणार आहेत ? मुसलमान होऊन जें मिळतें तेंच जर स्वराज्य म्हणावयाचें तर मग एवढा उपद्याप तरी कां करा ? आज ख्रिश्चन होतांच इंग्रजी राज्यही स्वराज्य--स्वधर्मी राज्य--होणारें आहे.

छेः छेः अशा अर्टीवर मिळणारें हिंदुस्थानचें राज्यच काय पण इंद्राचें राज्य देखील आम्हांस नको आहे. हिंदू राहून आम्हांस स्वतंत्र व्हावयाचें आहे. आम्हांस स्वतंत्रही पण व्हावयाचें आहे आणि हिंदुत्वहि पण राखावयाचें आहे. ज्यांत आमचें हिंदु स्वत्व राहील तें स्वराज्य !

तें हिंदुत्व आम्हीं विकूं ? शिवाजी आणि प्रताप, संग आणि पृथ्वीराज, यांचे जन्म जसे कांहीं झालेच नाहींत ! पानिपतला मराठ्यांची दोन लाख बांगडी जशी कांहीं फुटलीच नाहीं ! भाऊसाहेबांच्या घणानें दिल्लीचें सिंहासन जसें कांहीं चूर्ण केलें गेलेंच नाहीं ! गुरु गोविंदसिंगाचे वीरतनय जसे कांहीं भिंतींत चिणून मारले गेलेच नाहींत आणि वीरबंदानें सूड उगविलाच नाहीं ! जसें कांहीं मुसलमानांचीं होतीं तीं प्रचंड साम्राज्यें हिंदूंच्या पराक्रमाचा घोडा आपल्या टापाखालीं तुडवीत त्याचा चक्काचूर झालेल्या धुळीवर रामेश्वरापासून अटकेपर्यंत आणि अटकेपासून काबुल नदीपर्यंत अप्रतिहतपणें नाचत गेलाच नाहीं ! त्या इतिहासाचें एक पान, एक ओळ, एक आठवण तरी जोंपर्यंत आमच्या रक्तांत रुजलेली आहे तोंवर तरी, हिंदु लोकांस असल्या अपमाना-

स्पद आणि निर्लज्ज अटी स्वीकारण्याचें कारण नाहीं. मुसलमानहो एकी हवी असेल—तुम्हांस हवी असेल, तर या. स्वत्व रक्षण ज्यांत होऊं शकेल—तुमचें आणि आमचें दोघांचेंहि—त्या स्वराज्यास स्थापूं या आणि एकी करूं या. पण तसें नसेल तर, जा, काय वाटेल तें करा जा. आम्हीं हिंदु तुमच्या एकीवांचूनहि जिवंत राहूं शकतों, जसा शिवाजी तुमच्या एकीवांचून जिवंत राहूं शकला. आम्हीं हिंदु एकटे स्वतःच्या सामर्थ्यानें तुमच्याच नव्हे तर अिंग्रजांच्याहि पारतंत्र्यांतून मुक्त होऊन स्वराज्य स्थापूं शकूं—जसें ग्रीकांच्या हातून मुक्त होऊन यशोवर्मन् स्थापूं शकला. तो कांहीं जिनांच्या सहानुभूतीसाठीं थांबला नव्हता, हसन निजामीच्या नीच जाळ्यांत फसला नव्हता, मोपल्यांच्या गुंडशाहीस भ्याला नव्हता किंवा आपल्या कन्यका विकून एकी खरेदी करणाऱ्या शहाण्या गाढवपणास राजनीति म्हणून समजत नव्हता. त्यानें ग्रीकांच्या सम्राटांच्या मुली घेतल्या, आपल्या दिल्या नाहींत ! त्या चंद्रगुप्ताचे, यशोवर्म्याचे आणि भाऊंचे आम्हीं हिंदु वंशज आहोंत. आम्ही तसेच संघटित होऊं. आणि वेळ पडली तर एकटे झुंजून, एकटे मरून, एकटे मुक्त होऊं—स्वतंत्र होऊं ! कारण आम्हां संघटनवाद्यांचा हा सिद्धांत आहे कीं, ज्यांत स्वत्व अबाधित राहतें तेंच स्वराज्य, इष्ट आहे आणि असें स्वराज्य, हिंदु मुसलमानांची एकी झाली नाहीं तर मिळणारच नाहीं, हा घंटणाचा महामंत्र आमूलाग्र भ्रामक आहे ! ! !

---

# स्वराज्यासाठींच संघटन हवें

## वेळच पडली तर एकटे हिंदु देखील स्वराज्य मिळवूं शकतील

[ श्रद्धानंद ता. २।६।२७ ]

स्वराज्यासाठींच संघटन हवें या लेखाच्या पूर्वार्धांत आम्हीं हें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, स्वराज्याची खरी व्याख्या केवळ भौगोलिक नसून सांस्कृतिक असली पाहिजे. स्वराज्य म्हणजे या हिंदुस्थान देशाचें राज्य इतकाच अर्थ घेऊन चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानची भूमि ही तर आमची भूमि आहेच. ती आम्हांस प्रिय आहेच. पण ती प्रिय एवढ्याचसाठीं आहे कीं, ती आमची पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे. म्हणजे आमच्या हिंदुसंस्कृतीचें तें सनातन अधिष्ठान आणि आमच्या हिंदु राष्ट्राची ती जननी आणि धात्री आहे, म्हणून ती प्रिय आणि पूज्य आहे. अर्थात् जर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यांत आणि स्वराज्यांत आमच्या हिंदु संस्कृतीचें आणि हिंदु राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि स्वराज्य समाविष्ट होणें शक्य असेल, तरच तें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य म्हणजे आमचें स्वातंत्र्य आणि हिंदुस्थानचें स्वराज्य म्हणजे आमचें स्वराज्य होऊं शकेल. नाहीं-तर केवळ हिंदुस्थानदेशाचें स्वातंत्र्य म्हणजे आमचें स्वातंत्र्य किंवा स्वराज्य होऊं शकत नाहीं. पूर्वी मोंगल बादशाहीच्या वेळींहि हिंदुस्थान देश हा मुसलमानी दृष्टीनें स्वतंत्रच होता आणि जाग-

तिक राष्ट्रमंडळानें त्याचें स्वराज्यहि मानिलेलेंच होतें. पण तें स्वराज्य 'आमचें स्वराज्य' नसून तें मुसलमानी राज्य होतें. आज इंग्रजहि हिंदुस्थानास ब्रिटिश साम्राज्याचा अंतर्गत भूभाग म्हणून त्या साम्राज्याच्या स्वतंत्रतेच्या भाषेंत तो स्वतंत्रच आहे, असें म्हणूं शकतील—म्हणू पहातात देखील. पण म्हणून तें स्वातंत्र्य आमचें स्वातंत्र्य होऊं शकतें कीं काय? तेव्हां उद्यां हिंदुस्थानदेश इंग्रजांचे हातून सुटून योगायोगानें येथील मुसलमानांचे हातीं आला, तर भौगोलिक अर्थानें त्यास स्वतंत्र किंवा स्वराज्यशाली म्हणून जरी म्हणतां आलें तरी आम्हांस तो औरंगजेबाचे हातीं असतांना जितका परतंत्र आणि परराज्यदलित वाटत असे तितकाच वाटणार; कारण त्यांत आम्हां हिंदूंचें स्वत्व सुरक्षित राहणारें नसल्यानें आम्हां हिंदूंची संस्कृति परसंस्कृतीच्या राक्षसी अत्याचाराखालीं कदाचित् आजच्याहूनही अधिक चिरडली जाणारी असल्यानें आम्हांस हिंदुस्थानचें तें केवळ भौगोलिक स्वातंत्र्य आणि स्वराज्य, पारतंत्र्य आणि परराज्यच वाटणारें आहे. एतदर्थ खरें स्वराज्य तेंच कीं, ज्यांत आम्हां हिंदूंची ही हिंदुस्थानची पितृभूमि भौगोलिक अर्थींच नव्हे तर सांस्कृतिक अर्थींहि स्वतंत्र आणि स्वराज्यशाली होऊं शकेल. तेंच स्वराज्य कीं, ज्यांत हिंदूंचें स्वत्व संरक्षित आणि वृद्धिंगत होऊं शकतें. ज्या स्वराज्यासाठीं आमच्या पिढ्यान् पिढ्या आम्हीं हिंदु लोक झटत आणि झुंजत आलों तें स्वराज्य म्हणजे या हिंदुस्थानांत हिंदूंना आपलें हिंदुत्व न गमावितां आपल्या हिंदु संस्कृतीचा ध्वज विजयानंदानें फडकावित

ठेवितां येईल असलें भारतीय साम्राज्य होय. त्या साम्राज्यांत भारता-मधील इतर संस्कृतींसहि न्याय्य अधिकार उपभोगितां येतीलच. त्यांचेंहि स्वत्व त्यांत न्याय्य त्या प्रमाणानें अबाधित राहीलच. पण आम्हां हिंदूंचेंहि स्वत्व त्या इतरांप्रमाणेंच निर्भयपणें आपलें मस्तक कोणापुढेंहि न वांकवितां या भारतभूमींत नांदेल. स्वराज्याची ही सांस्कृतिक व्याख्या आम्हांस अभिप्रेत असल्यानें त्या स्वराज्यासाठीं जेव्हां कोणी मुसलमानादिकांशीं एकी करण्याचे वेडांत त्या स्वत्वाचाहि बळी देऊं लागतो, तेव्हां आम्हीं त्याचा तीव्र प्रति-वाद आणि प्रतिकार करून सांगतों कीं, "ज्यांत स्वत्व राहील तें स्वराज्य. जें स्वराज्य हिंदूंच्या स्वत्वाचा मुसलमानी अरेरावी पुढें बळी देऊन असल्या एकीनें साधलें जातें तें स्वराज्य नसून तें मुसलमानी राज्य आहे! तें आम्हांस इंग्रजी राज्याहून हानि-कारक आणि घृण्य वाटतें. अशा एकीचा आणि स्वराज्याचा आम्ही शतवार धिक्कार करितों!"

पण पुष्कळ प्रामाणिक माणसांना याविषयीं विचार करित असतां असें भय पडतें कीं, जर आपण आपल्या हिंदु स्वत्वा-स्तव मुसलमानांची अरेरावी चालूं दिली नाहीं, जर आम्हीं शुद्धि संघटन इत्यादि चळवळी मुसलमानांना त्यांचा राग येत असतांहि चालविल्या तर एकी बिघडेल आणि हिंदु-मुसलमानांची एकी झाली नाहीं तर स्वराज्य—कोणत्याहि प्रकारचें स्वराज्य-मिळणें अशक्य होईल! तेव्हां आतां या दुहेरी संकटांतून मार्ग कसा काढावा? एकी केली तर मुसलमानांच्या आकांक्षा हिंदुस्थानांत

मुसलमानी राज्य स्थापन झाल्यावांचून तृप्त होणाऱ्या नसल्यानें मुसलमानांच्या ताटाखालीं मांजरें होऊन रहावें लागणार ! एकी न केली तर स्वराज्य मिळणें असंभव होऊन इंग्रजांचे पायाखा-लील पादपीठ होऊन रहावें लागणार, याला तोड काय !

तीच तोड सुचविण्याचा हेतु ह्या लेखांकाचा आहे. वर वर्णि-लेल्याप्रमाणें ज्या आमच्या हिंदु बांधवांना हें दुहेरी संकट भेडसा-वतें, त्यांच्या विचारसरणींत एक जो मोठा हेत्वाभास गर्भित झालेला असतो, तोच त्यांस हें संकट दुहेरी आहे असें भासवितो. तो हेत्वाभास हाच होय कीं, हिंदुमुसलमानांची एकी झाली नाहीं तर स्वराज्य किंवा स्वातंत्र्य मिळणेंच अशक्य आहे, ही गोष्ट ते उपजतच गृहीत धरितात. त्या हेत्वाभासाच्या पाशांतून आपल्या बुद्धीची मुक्तता करण्यांतच या दुहेरी संकटांतून सोडविणारी तोड सांपडणार आहे.

ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं, जर मुसलमानांच्या मनांतहि राष्ट्रीय भावाचा प्रबळ उदय होता आणि तेहि समसमान अधि-कारांवर संतुष्ट राहून आपल्या आणि आमच्या, दोघांचेहि स्वत्वास न गमवितां, केवळ हिंदुस्थानी—केवळ राष्ट्रीय अशा स्वराज्यास स्थापन करण्याचे कार्यी आम्हांसह झटते, एक होते, तर स्वराज्य लवकर मिळूं शकतें, तर फार उत्तम होतें. परंतु इंग्रज लोकहि जर आपण होऊन हिंदुस्थानांतून चालते होते किंवा हिंदुस्थानास पर-तंत्र करण्यास येतेच ना, तर त्याहूनहि उत्तम होतें ! परंतु आतां प्रश्न 'काय झालें असतें तर उत्तम होतें' हा नाहीं. आतां प्रश्न-

'काय होतें' याचा नसून 'काय आहे' याचा आहे. ज्या परिस्थितीचा पेंच पडूं नये, पण येऊन पडला आहे, त्या परिस्थितीस तोंड कसें द्यावें हा प्रश्न आहे.

आतां ही गोष्ट अगदीं स्वयंसिद्ध झाल्यासारखीच आहे कीं, हिंदुस्थानचें राज्य सोडून इंग्रज लोक आपण होऊन कांहीं परत जात नाहींत, तसेंच मुसलमानहि त्यांच्या हिंदुस्थानांत इस्लामी राज्य स्थापन करण्याच्या राक्षसी उपायांनींहि हिंदूंस मुसलमान करून, हिंदुस्थानास मुसलमानमय बनविण्याच्या आकांक्षा आपण होऊन कांहीं त्यागित नाहींत. व्यक्तींचा प्रश्न नाहीं; समाजाचा प्रश्न आहे. मुसलमानी समाज कितीहि 'हांजी हांजी' केली तरी इंधनाबरोबरच वाढणाऱ्या आगीप्रमाणें, जों जों मऊ द्यावें तों तों कोंपरानें खणण्यास मागें घेत नाहीं. हत्या, स्त्रिया पळविणें दंगे करणें, गांवेंचीं गांवें उध्वस्त करणें, बलात्कारानें बाटवित चलणें, त्याचप्रमाणें हिंदूंच्या सर्वमान्य पुढाऱ्यांच्या प्राणांभोंवतीं यमदूत होऊन घिरट्या घालणें, धमक्या देणें, या साधनांनीं हिंदु संस्कृति उध्वस्त करण्याचे रानटी अत्याचार या विसाव्या शतकांत हिंदुस्थानांत मुसलमानांकरवीं प्रत्यहीं आणि प्रत्यक्ष घडत असतां मुसलमानी समाजानें किंवा संस्थेनें त्यांचा निष्कपट निषेध केला नाहीं. तसा निषेध करणें त्यांस त्यांच्या विपर्यस्थ धर्मवेडाच्या धुंदींत शक्य नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. तेव्हां मुसलमान एक होते तर किती बरें झालें असतें, ही वेडगळ लालसा 'इंग्रज हिंदुस्थानांत आलेच नसते तर किती बरें झालें असतें' या लाळघोट्या

ल्हाडीपणासारखीच आम्हां हिंदूंनीं लाथाडून दूर फेंकून दिली पाहिजे.

मुसलमान हे ज्यांत हिंदूंचेंहि स्वत्व अक्षुण्ण राहूं शकेल अशा स्वराज्याच्या स्थापनेच्या कार्यांत एक होत नाहींत. पण हिंदूंस स्वराज्य तर स्थापावयाचें आहे. एक हिंदु जोंवर जिवंत आहे तोंवर ही पितृ-परंपरागत आकांक्षा, हें राष्ट्रिय ध्येय मरत नाहीं. मग ह्यास एकच उपाय आहे कीं, हिंदूंनीं आपल्या स्वतःचे बळावर आपल्या स्वतःच्या हातानें तें स्वराज्य हिसकावून घेतलें पाहिजे तसें तें हिसकावून घेणें अशक्य आहे ? होय, सध्यांच्या हिंदु समाजाच्या आत्मविस्मृत असंघटित स्थितींत तें अशक्य नसलें, तरी फार दुर्घट आहे. परंतु जर हा हिंदु समाज, हें महान् हिंदु राष्ट्र, थोडेंबहुत संघटित आणि आत्मावलंबी झालें, तर तें दुर्घट कार्यहि साध्य होईल. ह्यासाठींच आम्ही म्हणतों कीं, स्वराज्यासाठींच संघटन हवें. कारण संघटित हिंदु राष्ट्र वेळच पडली तर—आणि ती वेळ पडलीच आहे !—एकटें झुंजूनहि स्वराज्य मिळवूं शकेल.

तें कसें याचें विवेचन करण्यापूर्वीं प्रथम थोडक्यांत हें पाहूं कीं जगतांत ज्या ज्या देशांनीं स्वातंत्र्य किंवा स्वराज्य प्रस्थापित केलें त्यांनीं तें आपलें

### राष्ट्रीय स्वातंत्र्य कोणाच्या बळावर संपादन केलें ?

इटली, अमेरिका, जर्मनी किंवा अगदीं आपल्या इकडचें शिवाजीच्या वेळचें महाराष्ट्र, यांनीं स्वातंत्र्ययुद्धें केलीं तीं काय त्या त्या देशांतील अगदीं एकूण एक मनुष्य, देशभक्त आणि

स्वातंत्र्येच्छु होऊन असें राष्ट्रचें राष्ट्र एकमुखानें आणि एक हस्तानें समरांत उतरून केलीं ? मुळींच नाहीं.

पारतंत्र्य आहे तोंवर कोणत्याहि राष्ट्रांत अगदीं संपूर्ण एकी नांदणें शक्यच नाहीं. एकूणएक मनुष्य जेथें स्वातंत्र्येच्छु आणि स्वातंत्र्यास्तव स्वार्थत्याग करणारा होतो तें राष्ट्र परतंत्रच नसतें. खरी राष्ट्रीय एकी स्वातंत्र्यसंपादनानंतरच घडली तर घडते. पारतंत्र्य आहे तोंवर राष्ट्रांत बेकी असणारच. दास्यसुलभ कापुरुषता, राष्ट्रद्रोह, बजबजपुरी या दुर्गुणांचा पूर्ण उच्छेद, पारतंत्र्य आहे तोंवर कोणत्याहि राष्ट्रांत झालेला नाहीं, होणें शक्य नाहीं. मग हीं राष्ट्रें जीं स्वतंत्र्य झालीं तीं कशाच्या बळावर ? अखंड एकीच्या नव्हे, बहुमताच्या बळावरहि नव्हे तर त्या त्या राष्ट्रांतील परिणामकारक अल्पमताच्या बळावर. जे कांहीं लोक संघटनेच्या आणि उत्कट स्वातंत्र्यवीरत्वाच्या बळावर कर्तव्यसमरांत उतरले आणि कृतनिश्चयानें झुंजले, त्या मूठभर लोकांनीं आपआपलीं राष्ट्रें स्वतंत्र केलीं आहेत. पुष्कळ उदासीन होते. पुष्कळ विरुद्ध होते, पुष्कळ शत्रुपक्षास मिळत होते, तरीहि त्या हजारामागें एक जो, शिर हातावर घेऊन उठे, तो तशा आणखीं कांहीं निश्चयी वीरांसह लढून राष्ट्रस्वातंत्र्य मिळवित आला. अमेरिकेंत शेंकडों लोक इंग्रजांचे बाजूचे होते, इटलींत तर प्रांत प्रांतांशीं उघडपणें लढत आणि नेपल्सची पिडमॉंट आणि पिडमॉंटची रोम, कत्तल करीत चालले होते. तरीहि ही यादवी आंत आणि परशत्रु पुढें, अशा दुहेरी सामन्यांत त्या राष्ट्रांतील मूठभर

स्वातंत्र्यवीरांनीं तीं राष्ट्रें स्वतंत्र व संयुक्त राष्ट्रें केलीं. शिवाजी उठला तेव्हां काय महाराष्ट्र माणसामाणसापर्यंत एक होता? मुसलमान तर तेव्हां शत्रू होतेच; पण हिंदूंत, मराठ्यांत शेंकडों त्याचेविरुद्ध होते, हजारों उदासीन होते. प्रत्यक्ष मामे आणि काके देखील एक नव्हते; मग इतरांची कथा काय? परंतु बहुमताच्या मृगजळाला न भुलतां जें अल्पमत संघटित करितां आलें, त्या बळावर त्यानें काम करून दाखविलें. हा सिद्धांत आहे कीं, सर्वच्या सर्व राष्ट्र दास्यत्वाचें विष अंगांत पिढ्यान् पिढ्या मुरलेलें असतां अकस्मात् स्वातंत्र्यप्रवण होत नाहीं. यादवीस आणि परशत्रूस एक-समयावच्छेदें तोंड देऊन

**अर्थं वा साधयेत्, देहं वा पातयेत्, अशा निष्ठेचा एक यथाप्रमाण अल्पसंख्याक संघ स्वातंत्र्य-समरांत उडी घेऊन राष्ट्र स्वतंत्र करितो.**

बहुसंख्या मग अनुकूल होते. अर्थात्च ही अल्पसंख्या अत्यल्प असून उपयोगी नाहीं. म्हणूनच आम्हीं यथाप्रमाण-म्हणजे ज्या मानानें शत्रुसंख्या असेल त्या मानानें असली म्हणजे झालें असें म्हटलें आहे.

हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि हाच नियम ध्यानांत ठेविला पाहिजे. तीस कोटी एक होतील आणि मग आपण स्वातंत्र्य मिळवूं, असें म्हणणें म्हणजे घरोघर चरखा फिरविला गेला कीं, एका वर्षात स्वातंत्र्य मिळवूं, असें म्हणण्याइतकेंच अशक्य आणि म्हणूनच हास्यास्पद आहे. जेव्हां केव्हां हिंदुस्थान स्वतंत्र होईल

तेव्हां तो, बहुसंख्या त्याच्या स्वातंत्र्यार्थ स्वार्थत्याग करण्यास सिद्ध झालेली आहे म्हणून होणार नाहीं. कारण परतंत्र देशांत बहुसंख्या सदोदित अशीच दरिद्री म्हणूनच राष्ट्रीय दृष्टीनें निर्बळ, पापी, दास्यप्रवण, असंघटित आणि भ्याड असणारच. कोणचा तरी संघटित, निर्भय आणि कृतनिश्चयी स्वातंत्र्य—वीरांचा अल्प संख्याक संघच—यथाप्रमाण अल्पसंख्याक संघच, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, इतरांची वाट न पाहतां आणि इतरांशीं सामना देत जेव्हां हिंदुस्वातंत्र्यार्थ कर्तव्यसंगरांत उतरेल, तेव्हांच हिंदुस्थान स्वतंत्र होईल.

आतां अशी अल्पसंख्या हिंदु स्थानांतील कोणत्या जातींत वा—पंथांत संघटित करणें अधिक सुलभ आहे? मुसलमानांत का हिंदूंत? एखाद दुसरा मुसलमान राष्ट्रीय वृत्तीचा असेल; पण हजार मुसलमानांत अरेबियास पुण्यभूमि मानणारेच मुसलमान अधिक असलेच पाहिजेत. खलिफाविरुद्ध हिन्दुस्थान लढलें तर आम्ही खलिफाच्या वतीनें हिन्दुस्थानाशींच लढूं, कारण तो आमचा धर्म आहे; अफगाणिस्थानच्या नेतृत्वाखालीं मुसलमानी सत्ता हिंदुस्थानांत स्थापन झाली तर ती गोष्ट इस्लामी गौरवाचीच असल्यानें आम्हीं आमच्या मुसलमानी झेंड्यावर हिंदूंचे वतीनें आघात करणार नाहीं; हिंदूंच्या मुली जर कोणी मुसलमानानें—मोपल्यांनीं पळविल्या तशा पळवून आणि गांजून देखील मुसलमान केल्या तर आम्हीं त्या मुसलमानांचा गौरवच करूं; आणि त्यांतील जर एखादी हिंदु मुलगी पुनः हिंदु नेऊं

लागले तर तिला आम्हीं जाऊं न देतां लाखान्याप्रमाणें हिंदूंची उभी वस्तीची वस्ती नेस्तनाबूद करूं; असें म्हणणार मुसलमानच नऊशें नव्याण्णव निघतील, ही अनुभवाची गोष्ट आहे. मुसलमानी शास्त्राप्रमाणेंच जगताच्या अमुसलमानी तुकड्यांत हिंदुस्थान पडत आहे. त्यांत जोंवर हिंदु लोक आहेत तोंवर, किंवा त्यावर मुसलमानी राजसत्ता चालू झाली नाहीं तोंवर, तो हिंदुस्थान मुसलमानांस राहण्यास पवित्र भूमि होऊं शकत, तो यांचा देश होऊं शकत नाहीं. जर या सर्व हिंदूंना ते मुसलमान करूं शकले किंवा जर या राष्ट्रावर कोणत्याहि कां होईना पण मुसलमानांची सत्ता स्थापूं शकले तरच, या हिंदुस्थानावर ते स्वराष्ट्राप्रमाणें प्रेम करूं शकतील, ही वस्तुस्थिति आहे.

आतां हिंदूंची स्थिति पहा. त्यांना हिंदुस्थान हीच पितृभूमि, हीच पुण्यभूमि. त्यांच्या हजारांत नऊशें नव्याण्णव उपजतच तिच्यावरच प्रेम करण्यास शिकण्यासारखे असणारच. राष्ट्राची कल्पना येतांच ते स्वयमेवच सांगतील कीं, " हेंच आमचें राष्ट्र ! हाच आमचा देश ! " हीहि वस्तुस्थिति आहे. येथें कल्पनेचें कांहीं काम नाहीं.

तर मग हिंदुस्थानच्या राष्ट्र--स्वातंत्र्य--संपादनार्थ जें कृतनिश्चयी, विश्वासु आणि सुसंघटित अल्पसंख्याक राष्ट्रवीरांचें दळ उत्पन्न करावयाचें, तें अल्पायासांत, सापेक्षतः थोड्या परिश्रमांत कोठें उत्पन्न करतां येणें अधिक संभवनीय आहे ? मुसलमानांची धर्मान्धता दूर करण्यास कितीहि झटलें तरी ते जोंवर मुसलमान

आहेत तोंवर, हिंदुभू त्यांची पुण्यभू होऊं शकत नाहीं. त्यांची प्रीति नेहमींच द्विधा राहणार. हिंदु, जोंवर तो हिंदु आहे तोंवर, तिलाच पितृभू आणि पुण्यभू म्हणणार. त्याची धर्मांधता ही त्याची राष्ट्रप्रीति उत्कट करण्यासच कारणीभूत होणार ! हिंदुस्थानचा हिंदु राष्ट्र हा मुख्य पाया आहे. हिंदुस्थानचाच नव्हे पण हिंदी राष्ट्रांच्याहि जीवनगंगेचा मुख्य ओघ, हिंदु जाति हा आहे; जसा तुर्कस्थानचा तुर्कजाति आणि अमेरिकेचा अँग्लो सॅक्सन. मुसलमान, पारशी, ज्यू इत्यादि आमच्या देशबंधूंच्या संस्कृतीचे ओघ पुढें मागें तिला मिळतात; पण तीं त्या जीवनगंगेची उपांगें आहेत. त्यांच्या मिळण्यापूर्वी आणि ते सुकल्यानंतरहि, हिंदु जाति हीच हिंदुस्थानी राष्ट्र–गंगेचें मुख्यजीवन होतें–आहे–राहील. तेव्हां या हिंदी राष्ट्राचे स्वातंत्र्यार्थ आणि स्वराज्यार्थ अढळ निर्धारानें आणि अनन्य निष्ठेनें झुंजणारी ती यथाप्रमाण अल्पसंख्या या हिंदु जातींतच उत्पन्न होणें अधिक संभवनीय आणि अधिक द्रुततर साध्य आहे, हें सत्य सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे.

एतदर्थ अशी कृतनिश्चयी अल्पसंख्या उत्पन्न करण्यासाठीं जे प्रयत्न करावयाचे, ते हिंदुजातींतच विशेषतः केले पाहिजेत. इतर कोणत्याहि जातीस, हिंदी राष्ट्राच्या कोणत्याहि अहिंदु घटकांस निष्कारण धिक्कारून नव्हे, त्याची अन्यायानें मृगया करण्याकरितां नव्हे, तर हिंदी राष्ट्राच्या हितार्थ ज्या कोण्या जातींतून अधिकांत अधिक सैनिक, हीमांत

शीघ्र अशा अवधींत भरती करतां येतील, त्या त्या जातींतून ते भरती करून घेणें, हें राष्ट्रीय दृष्ट्याहि अपरिहार्य कर्तव्यच ठरत असल्यानें सर्वांप्रथम हिंदुजातींतच स्वातंत्र्य-वीरांची सेना उत्पन्न करण्यासाठीं प्रचंड जागृति आणि प्रबळ संघटना करणें अवश्य आहे, असें न्यायाचें राजनीतीचें आणि व्यवहार-पटुत्वाचेंहि आग्रहाचें सांगणें आहे.

हिंदुजातीजी अशा राष्ट्रीय दृष्टीनें आणि राष्ट्रहितार्थच संघटना करीत असतां हिंदुस्थानच्या झुंजत्या विशिष्ट सेनेंत मुसलमानहि, कोणी कोणी तरी, येतील तर तेहि समाविष्ट होतीलच. पण ते न आले तर अडून बसावयाचें नाहीं. बावीस कोटी हिंदूंत ती यथाप्रमाण अल्पसंख्या उत्पन्न होऊं शकेल. हिंदुस्थानचें स्वराज्य म्हणजे ज्यांत हिंदी राष्ट्राच्या हिंदु मुसलमानादिक सर्व घटकांचें स्वत्व न्याय्य प्रमाणांत संरक्षिलें जाईल तें होय. ही आमची स्वराज्याची व्याख्या असल्यानें आम्ही कोणाहि अहिंदु देशबंधूस, तो येत असतांहि, दूर ढकलणार नाहीं. त्यानें यावें म्हणून शक्य तों तडजोडीनें नव्हे, लाडीगोडीनेंहि घेऊं. पण प्रस्तुतच्या आणि भूतकाळच्या अनुभवानें स्पष्ट दिसून येणारी जी भविष्यकालीन संभवनीयता आहे तिकडे कानाडोळा न करतां, वेळच पडली तर या हिंदुसंघटनाचे बळावरच आणि केवळ एकट्या हिंदु सेनेसहच विपक्षाशीं झुंजून हा भारत देश आपलें स्वातंत्र्य संपादण्यास कमी करणार नाहीं. या आमच्या निश्चयाच्या भक्कम पायावरच आम्हीं आमच्या राष्ट्रीय भविष्याचें महान् मंदिर उभारण्यास कचरणार नाहीं.

प्रत्येक देशास पारतंत्र्यांतून सोडवून स्वतंत्र करण्याचें कार्य अंतीं तेथील निर्धारी आणि वीर्यशाली अशा यथाप्रमाण अल्पसंख्येलाच करावें लागतें. तशी स्वातंत्र्य-वीरांची अल्पसंख्या हिंदी राष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितींत हिंदु जातींतच सापेक्षतः कमी प्रयत्नांत आणि अधिक द्रुततेनें उत्पन्न आणि सुसज्ज होऊं शकणार आहे आणि ती तशी उत्पन्न व्हावी म्हणूनच संघटन हिंदुराष्ट्रांतील सुप्त शक्तीस जागृत करून त्यास सबळ, संघटित आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यास सक्षम करण्याचे यत्न करूं निघालें आहे. एतदर्थच आम्ही म्हणतों कीं, ज्याअर्थी वेळ पडली तर हिंदु एकटे लढून देखील आपलें स्वातंत्र्य आणि स्वराज्य स्थापूं शकतील हें सत्य आहे, त्या अर्थी हिंदुसंघटन हें स्वराज्याचेंच एक अत्यंत परिणामकारक साधन आहे. स्वराज्यासाठीच संघटन हवें आहे.

---

# आर्यांचा पूर्वकालीन गौरव व सद्यःकालीन अधःपात

[ ‘ आर्यमित्र ’ पत्रांत पं. सूर्यदेव शर्मा ह्यांनीं ‘ हम कौन थे और क्या हो गये ’ ह्या शीर्षकाखालीं लिहिलेल्या लेखाचें तारीख १२।१।२८ च्या श्रद्धानंदांत आलेलें रूपांतर. ]

आपला हा भारतवर्ष ईश्वरानें नैसर्गिकरीत्या सुरक्षित व संपन्न बनविला आहे. येथें सर्व प्रकारची साधन सामुग्री विद्यमान

आहे. यामुळेंच एके काळी आपले पूर्वज अभिमानानें म्हणूं शकले कीं, जर एखादा देश सर्व जगाचा गुरु होण्यास योग्य असेल तर तो फक्त हा आपला आर्यावर्तच होय. भगवान् मनु म्हणतात कीं,

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥

मॅक्समुल्लरही आपल्या " India, what it can teach us" या पुस्तकाच्या १५० व्या पृष्ठावर लिहितात कीं, " Whatever sphere of the human mind you may select for your special study......every-where you will have to go to India whether you like it or not " भाषा, धर्म, दर्शन, गणित, विज्ञान वगैरेपैकीं कोणत्याही विषयांचा विशेष व्यासंग करण्याचें ठरवा. त्याकरितां आपणांस आर्यावर्ताकडे जाणें आवश्यक आहे. मग हें आपणांस आवडो अगर न आवडो.

पुराणवस्तुसंशोधक खात्यामार्फत होणाऱ्या शोधांमुळें मॅस्कमुल्लर यांचें वरील विधान सार्थ असल्याचें आपोआप सिद्ध होत आहे. प्राचीन भारतीय सभ्यतेचीं अवशेष चिन्हें आज पृथ्वीवरील बहुतेक देशांत आढळून येत आहेत व पृथ्वीच्या पोटांतून बाहेर काढलीं गेलेलीं प्राचीन शहरें आमच्या संस्कृतीचीं जिवंत उदाहरणें बनत आहेत. इ. स. १९२४ मध्यें पंजाबमधील दर व सिंध-मधील मोहनडंडेरो या ठिकाणीं मिळालेले भांड्याचे तुकडे आणि

मध्य आशियांत गोबीमधील रेगिस्थान येथें प्रोफेसर ल्डस यांना मिळालेल्या वस्तू ऐकेकाळीं आपली संस्कृति तेथेंही असल्याबद्दल पुरावा देत आहेत. त्याचप्रमाणें अफगाणिस्थान व बलुचिस्थान या देशांत क्राथ व मस्तुंग या दोन ठिकाणीं आजसुद्धां शंकराच्या व कालीच्या देवालयांचे अवशेष दृष्टीस पडतात. जत्था जाताच्या बलुची लोकांत अजूनही विवाहादि संस्कारांतले पुष्कळसे रिवाज आमच्यासारखेच आहेत. खान क्राथमधील मकरान येथें राहणारे गिचकी लोक आपल्या पूर्वजांचीं नांवें जसवन्तसिंह, मानसिंह वगैरे असल्याचें आनमितीसही सांगतात.

इ. स. १९०७ सालीं मेसोपोटेमियांत प्रो. विकलर्स यांना मिळालेल्या दोन शिलालेखांवरून ३५०० वर्षांपूर्वीं तेथें इन्द्र, वरुण, मित्र वगैरे वैदिक देवतांची पूजा अर्चा होत असल्याचा व तेथील राजांचीं नांवें सुबंधु, सर्वदत्त, सुतरण, दशरथ, आर्तमन्यु वगैरे असल्याबद्दल पुरावा मिळतो.

इराण व युनान या दोन् देशांचे राजे आपणांस आर्य म्हणवीत होते. इराणचा बादशहा दारा यानें एका प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें होतें कीं, " मी आर्य आहें आणि माझे वाडवडील पण आर्यच होते. " मिसर देशांत नील नदीच्या कांटावर आर्य लोकांच्या वसाहती होत्या.

उत्तर अमेरिकेंत मेक्सिकोमध्यें " राम–सीतळ " उत्सव साजरा केला जाणें आणि दक्षिण अमेरिकेंतील पेरू देशांत सूर्य मंदिराचे अवशेष सांपडणें हे आर्यांची त्या त्या ठिकाणीं वसति असल्याचे दाखलेच होत.

आतां पूर्व दिशेकडे नजर फिरविली असतां काय दिसतें तें पाहूं. सियाम देशाचा सध्यांचा राजा मंत्री आणि सेनापति यांचीं नांवें राम पंचम, धर्मराज, यमराज वगैरे आहेत. अनाथ येथील जंगलांत शिव मंदिराचे अवशेष आहेत आणि सुमात्रा, जावा, वाली वगैरे बेटांत महाभारत आणि गीता हे ग्रंथ आढळतात. बोर्नियोंत तर महाराज मूलवर्मा याचे संस्कृत भाषेंत खोदलेले चार शिलालेख गेल्या वर्षीच सांपडले आहेत. या सर्वांवरून पश्चिमे-प्रमाणें पूर्व देशांतही एका काळीं आर्य संस्कृतीचा बोलबाला असल्याचें दिसतें.

केवळ संस्कृतीचाच फैलाव झालेला नसून सर्व जगतीतलावर आर्य लोकाचें साम्राज्यहि पसरलें असल्याचें महाभारतावरून दिसून येतें. चीनचा भगदत्त, अिराणचा शल्य, युरोपमधील बिडालाक्ष व अमेरिकेचा बभ्रुवाहन यांनीं मांडलीक म्हणून भारतीय व नंतरच्या युद्धांत भाग घेतला होता.

दुसरे लोक ज्या वेळीं कपड्याचा उपयोग करणें सुद्धां जाणत नव्हते, त्या वेळेपासून विद्येच्या बाबतींत आमची प्रख्याति आहे. गणित, विज्ञान, ज्योतिष यांची रचना प्रथम भारत वर्षांतच झाली असें कोलब्रूकचें मत आहे. युनानी लोक दशांश व भूमिति ( इसवी सना पूर्वी ८०० वर्षे ) भारतीयांपासून शिकले, पुढें इटलींतील पिरून शहरच्या लिओनार्डोनें ती विद्या उचलली व त्याच्यापासून युरोपियन लोक शिकले. हारून रशिदनें मनका व सलेह या नांवाच्या दोन भारतीय वैद्यांना आपल्या दरबारी

बोलावून त्यांचा सन्मान केला. जगद्विख्यात शिकंदर बादशहा महात्मा कल्याण मुनीच्या (Kalonos) तत्वज्ञानापुढें नम्र झाला. या सर्वांहून विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष येशु ख्रिस्तसुद्धां हिंदुस्थानांत येऊन विद्या शिकला असल्याचें गेमन्ना पाद्री निकोलस नोटोविच आपल्या 'Life of Christ' या पुस्तकांत लिहितो.

येथपर्यंत आमच्या पूर्व वैभवाविषयीं झालें. आतां वर्तमान स्थितीकडे पाहिलें असतां काय दिसतें तें पाहूं.

एके काळीं आम्हीं सर्व जगाचे गुरू म्हणविले जात होतों; पण आज आम्हांस शिष्य म्हणूनहि जवळ करण्यास कोणी तयार नाहीं! १९१७ सालीं दक्षिण आफ्रिकेंत हिंदी मुलांकरितां एक शाळा स्थापण्याचा पं. भवानी दयाल यांचा विचार होता व त्यासाठीं एका युरोपियन शिक्षकासाठीं त्यांनीं ज़ाहिरात दिली. त्या जाहिरातीला अनुलक्षून एका पादरी महाशयांनीं त्यांना धाडलेलें पत्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपल्या पत्रांत ते पाद्री लिहितात, "आम्ही शासनकर्ते गोरे लोक हिंदुस्थानी कुली लोकांच्या मुलांना शिकवूं इच्छित नाहीं!!"

हाय! हाय!? एका काळीं सगळ्या जगाचे गुरु म्हणविणाऱ्या लोकांची संतति आज "कूली" म्हणून गणली जावी ना? यापेक्षां दुसरें दुर्दैव तें कोणतें?

काय काय म्हणून सांगावें? आमचें प्राचीन साहित्यसुद्धां हा देश सोडून परदेशांत गेलें आहे! आज सर्व जगांत संस्कृत

भाषेची मोठी लायब्ररी बर्लीन शहरीं असून तींत ४४००० हून अधिक हस्तलिखित प्राचीन संस्कृत ग्रंथ आहेत. इंडिया ऑफि- सांत २००००, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत १६००० व पॅरीस विश्वविद्यालयांत १२००० प्राचीन संस्कृत हस्तलिखित ग्रंथ आहेत!

एके काळीं चक्रवर्ति राज्य उपभोगित असलेले लोक आज दास्यतेच्या शृंखलेंत जखडून गेले आहेत. जगभर वसाहती कर- णाऱ्या लोकांची आज हिन्दुस्थानाबाहेर वसाहत नाहीं आणि सर्वत्र फैलावणारी आर्य संस्कृति आज हिंदुस्थानांतच दिवसेंदिवस नष्ट होऊं पहात आहे ! ! तसेंच ३३ कोटी देवता म्हणून सम- जल्या जाणाऱ्या भारतीयांची आज गुलामांहून अधिक किंमत नाहीं ! ! !

एके काळीं आर्यांची लोकसंख्या सर्वांहून जास्त होती; पण त्यांची संख्या किती राहिली आहे व नवे धर्म कसे झपाट्यानें वाढत चालले आहेत तें पहा:—

| | |
|---|---|
| पृथ्वीवरील एकंदर जनसंख्या | १,६४,६४,०१००० |
| ख्रिस्ती | ५४,४५,१०,००० |
| बौद्ध | ४६,३८,७०,००० |
| मुसलमान | २२,१८,२५,००० |
| हिंदु | २१,६७,३४,५८६ |
| रानटी | १५,८२,७०,००० |
| यहुदी | १,२२,०५,००० |
| इतर | १,५२,८०,००० |

या आंकड्यांवरून असें दिसेल कीं, ६० कोटी लोकसंख्या असलेला हिंदुधर्म आपल्या प्रथम स्थानापासून च्युत होत जाऊन ढकलत ढकलत ४ थ्या स्थानावर आला आहे. पण लाठीबंदी व रोटीबंदी या अन्याय्य जुलमाला कंटाळून सात कोटी अस्पृश्य परधर्मांत गेले तर हिंदूचा नंबर आणखी खालीं जाईल.

आतां हिंदुस्थानच्या गेल्या ४–५ वेळच्या खानेसुमारीच्या आंकड्यावरून तरी काय दिसतें तें पाहूं.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सन | १८८१ | मध्यें | शेंकडा | ७४.६ | हिंदु | होते. |
| | १८९१ | ,, | ,, | ७३.४ | ,, | राहिले |
| | १९०१ | ,, | ,, | ७१.८ | ,, | ,, |
| | १९११ | ,, | ,, | ६९.२ | ,, | ,, |
| | १९२१ | ,, | ,, | ६८.६ | ,, | ,, |

या आंकड्यांप्रमाणें आणखीं ४० खानेसुमारी होतांच हिंदूंची संख्या शून्यावर येईल. सन १९११ त हिंदु २१,७५,८६,८९२ होते, परंतु १९२१ त ते २१,६८,३४,५८६ राहिले. ख्रिश्चन लोक सन १९११ त ३८,७६,२०३ होते, ते १९२१ त ४७,५४,०७९ इतके झाले. म्हणजे दहा वर्षांत ८॥ लाख हिंदु कमी झाले व ९ लाख ख्रिश्चन वाढले. तात्पर्य प्रत्येक दिवशीं सुमारें २४४ हिंदु ख्रिश्चन होतात.

वरील आंकडे १९२१ च्या खानेसुमारीचे आहेत. १९२५ त मद्रासचे एक पाद्री यांनीं ख्रिस्ती धर्मप्रसाराचें जें प्रतिवृत्त प्रसिद्ध केलें आहे त्यावरून हिंदूंचें हें रोजचें बाटण्याचें प्रमाण २४४ वरून ३०० वर आलें आहे.

ज्या शुद्धीकरणाला आमच्यांतले कैक लोक शुद्ध पोरखेळ समजतात त्याच पोरखेळानें इतर लोक काय करीत आहेत तें पहा!

फक्त हिंदूंना बाटविण्यासाठीं हल्लीं हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं १३७ मिशनरी संस्था कार्य करीत आहेत. या संस्थांमधून १८७७६ पाद्री व ५०० डॉक्टर प्रचाराचें कार्य करीत आहेत. याखेरीज ४०३ अनाथालयें आणि ४३ छापखाने असून त्यांतून ९९ वर्तमानपत्रें प्रसिद्ध होतात. याशिवाय ५१ कॉलेजें, ६१० शाळा व ६१ ट्रेनिंग स्कूल्स या संस्थांमार्फत शिक्षण चालू असून त्यांत ४८०४४ विद्यार्थी शिक्षण संपादन करीत आहेत.

याशिवाय मुक्ति फौज काय करीत आहे तें पहा. सन १९२१ च्या प्रतिवृत्ताप्रमाणें यांचे ३०८ युरोपियन अधिकारी, २८८६ हिंदुस्थानी प्रचारक, ५०७ प्राथमिक शाळा, २२ अनाथालयें, ९००० जयराम पेशावाले लोक, १७ वसाहती, ३२,४२० एकर जमीन व ११ मासिकें आहेत. शिवाय यांच्या ५६४ सामाजिक संस्था असून त्यांत २६८०३ मनुष्यें पोसलीं जातात.

मिशनरी लोकांशिवाय मुसलमान तर उचित अनुचित उपायानें आपली संख्या वाढविण्यांत गढलेले आहेतच. सन १९११ पासून १९२१ पर्यंत त्यांची संख्या २५॥ लाखांनीं वाढली. आज जे सात कोटी मुसलमान आहेत हे कांहीं अरबस्थान, इराण किंवा तुर्कस्थान मधून आलेले नसून आमच्या निष्काळजीपणानेंच ते हिंदुधर्मापासून विमुख झाले आहेत. परंतु आज हेच हिंदुधर्माचा नायनाट करण्यासाठीं तनमनधनानें प्रयत्न करीत आहेत.

ख्रिश्चन लोकांप्रमाणें हे आपल्या संस्थांचे अधिकारी प्रकाशित करीत नाहींत; परंतु यांचें काम गाजावाजा न करतां फार जोरानें चालू आहे. एकट्या दिल्लीच्या जुम्मा मशिदींत जानेवारी १९२७ पासून आगस्ट १९२७ पर्यंत ३९३६ मनुष्यें मुसलमान केलीं गेलीं. म्हणजे प्रत्येक दिवशीं १८ मनुष्यें मुसलमानी धर्माची दीक्षा घेत होते.

आतां गल्या खानेसुमारीवरून कोणते धर्म किती वाढले किंवा घटले हें पाहूं:—

मुसलमान शेंकडा ३$\frac{3}{4}$ टक्के वाढले
बौद्ध ,, ८$\frac{1}{2}$ ,,
ख्रिस्ती ,, २२$\frac{1}{2}$ ,,
आणि हिंदु ३९ टक्यानें कमी झाले आहेत.

म्हणजे फक्त हिंदु लोकच कमी होत आहेत. हें असेंच चाललें तर परिणाम काय होईल हें निराळें सांगण्याची गरज नाहीं.

येथपर्यंत भारतीयांच्या गौरवाचें व अधःपाताचें चित्र रेखाटलें आहे. आज हिंदुसमाज आपल्या पूर्वकालीन वैभवास पोंचण्यासाटी धडपड करीत आहे. अशा वेळीं ती स्थिति प्राप्त करण्यासाटीं काय केलें पाहिजे हें जे धर्म आज त्या स्थितीला पोंचले आहेत त्यांनीं कोणते उपाय अवलंबिले व सध्यां अवलंबित आहेत, त्यावरून समजून येण्यासारखें आहे. शुद्धि व संघटन हेच ते मार्ग होत. इतर धर्मीयांना आपल्या धर्माची दीक्षा देण्यानेंच हे नवे नवे धर्म झपाट्यानें वाढत चालले आहेत व जवळ जवळ ६० कोटी-

पर्यंत त्यांची संख्या आली आहे. तेही आज तोच मार्ग चोखा-ळीत आहेत.

गेल्या हजार वर्षांत आमच्या लोकांची जर कांहीं घोडचूक झाली असेल तर ती हीच होय. परमेश्वराच्या कृपेनें महर्षि दया-नंद सरस्वतींनीं ही चूक दुरुस्त करून शुद्धीचा मार्ग सुरू केला व स्वामी श्रद्धानंदांनीं आपल्या पवित्र रक्तानें त्याचें सिंचन केलें आहे अितक्या बहूमूल्य किमतीनें प्राप्त झालेला हा मार्ग जर कोण-त्याही कारणास्तव हिंदु धर्मीय सोडतील, तर त्यांच्यासारखे हतभागी तेच असें म्हणावें लागेल.

आतां राहिलें संघटन. याबाबतींत सुद्धां महर्षि दयानंदांचेच उपकार मानणें आवश्यक आहे. जोंपर्यंत ७ पुरभय्ये व ११ चुलें असा प्रकार हिंदु लोकांत चालू आहे तोंपर्यंत तरी जातीय दृष्टीनें हिंदु लोकांचें राष्ट्र निर्माण होणें अशक्य आहे. आजच्या स्थितींत पंजाबी हिंदु, महाराष्ट्रीय हिंदूला जर्मन मनुष्याइतकाच जवळाचा आहे. अशा स्थितींत पंजाबमध्यें झालेल्या अत्याचाराचें महाराष्ट्रीयाला विशेष असें दुःख कसलें ?

संघटनाच्या मार्गांत रोटीबंदी व लोटीबंदी हे दोन मोठे अड-थळे आहेत. जोंपर्यंत या बंद्या हिंदु लोकांतून कायमच्या उठल्या नाहींत तोंपर्यंत टिकाऊ संघटन होणें शक्य नाहीं. आज इतर कोणच्याही धर्मांत या बंद्या नाहींत व पूर्वकालीं आमच्यांतही त्या नव्हत्या.

या दोन बंद्या उठविण्याविरुद्ध हल्लीं एक मोठी भीति दाख-विली जाते. या दोन बंद्या उठविल्यानें बेटीबंदीही आपोआप

नाहींशीं होऊन सर्व गोलंकार होईल. आतां ज्या समाजांत ह्या बंद्या नाहींत त्यांची स्थिति काय आहे तें पाहूं. आज युरोपांत ह्या दोन्ही बंद्या नाहींत म्हणून कांहीं फ्रेंच, इंग्लीश व जर्मन लोकांत मोठ्या प्रमाणांवर मिश्रविवाह होत असल्याचें दिसत नाहीं. ख्रिस्ती लोकांची गोष्ट सोडली तरी जो धर्म असल्याच बंद्या मानींत नाहीं, त्या मुसलमानी धर्मांत सुद्धां सर्रास मिश्र-विवाह होत असल्याचें दिसत नाहीं. यावरून या बंद्या मानणाऱ्या धर्मांच्या लोकांतून सुद्धां जर बेटीबंदी उठलेली दिसत नाहीं तर ती आमच्यांतून उठेल हें कशावरून ?

आतां आमच्या धर्मांतील ज्या समाजांत या दोन्ही बंद्या नाहींत, तेथें काय स्थिति आहे तें पाहूं. देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या जातींत तरी या दोन्ही बंद्या नाहींत. या दोन्ही बंद्या नसल्यामुळें जर बेटीबंदी उठते हें खरें मानावयाचें असेल, तर या तिन्ही जातींत सर्रास मिश्रविवाह होत असले पाहिजेत. पण वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. मग जी गोष्ट आज कैक वर्षांच्या अनुभवानें सिद्ध आहे तिच्याविरुद्ध मोठा बाऊ दाखवून उगीच लोकांना घाब-रवून सोडण्यांत काय अर्थ आहे ?

उलट या बंद्या उठविल्या गेल्यानें कोणच्याही देशाचा कोण-त्याही जातीचा हिंदु कोठेंही गेला तरी त्याचा आपलेपणा कायम राहून व त्याला हल्लीं वाटणारा परकेपणा नाहींसा होऊन प्रेमवृद्धि होईल व त्यामुळें एक प्रकारचा जातीय अभिमान अखिल हिंदु समाजांत उत्पन्न होईल.

महाराष्ट्रीय लोक बुद्धिमान् व कर्तबगार असल्याबद्दल त्यांची ख्याति आहे. त्यांचा पूर्वकालीन इतिहास उज्वल आहे. उत्तरेत मुसलमानी सत्तेविरुद्ध उत्पन्न झालेल्या चावटळींचा शेवट लावून त्यांनीं हिंदुजातीचें नांव एके काळीं राखलेलें आहे. आज सुद्धां त्यांच्यांत विद्वान् व कर्तृत्ववान् पुरुषांची वाण नाहीं. तरी सध्यांच्या या संस्कृतीच्या झगड्यांत आपल्या पूर्वजांच्या लौकिकास साजेलें पौरुष व कर्तृत्व दाखवून महाराष्ट्रीय लोक आपलें नांव अजरामर करतील काय ?

---

# महात्मा गांधी आणि बॅ. सावरकर ह्यांची अपूर्व भेट

[ महात्मा गांधी गत वर्षाच्या मार्च महिन्याच्या आरंभीं रत्नागिरीस गेल्या वेळीं त्यांची व बॅ. सावरकर यांची जी महत्त्वाची भेट झाली त्यावेळीं उभयतांमध्यें झालेल्या संवादांतील शुद्धिसंघटन-विषयक भाग श्रद्धानंदाच्या ता. १०।३।२७ च्या अंकावरून येथें दिला आहे. ]

सावरकरः—अस्पृश्यतेच्या प्रकरणीं आपलें व माझें मत सर्वांशीं जुळतें आहे, ही गोष्ट सहज उघड झाल्यानें, जरी माझा हेतु या आपल्या घरगुती स्वागत प्रसंगीं आज कोणचीहि वादविषयक चर्चा करण्याचा नव्हता, तरी एक दोन वाक्यांत शुद्धीविषयींहि आपलें काय मत आहे हें थोडक्यांत आपण सांगावें.

गांधीजी:—मला वाटतें कीं, हिंदु मनुष्य बाटतो ही कल्पनाच चुकीची आहे. जर मी रामाचा खरा भक्त आहें, तर बळानें माझ्या अंगावर कोणी कोणचेंहि संस्कार केले तरी मी मनांतून हिंदु आहेंच. मला मुसलमानांनीं मारून मुटकून तूं मुसलमान झालास म्हणून म्हटलें तरी मीं मनांतून हिंदूचा हिंदु आहेंच. मग शुद्धि कसली ?

सावरकर:—हें आपलें म्हणणें एका अर्थी अगदीं ठीक आहे. खाण्यानें किंवा पिण्यानें हिंदू बाटतो ही समज मलाहि अत्यंत हास्यास्पद वाटत असून मीं कंठरवानें माझ्या या इष्टमित्रांस व्याख्यानांतून तें अनेक वेळां सांगितलें आहे. प्रत्यक्ष सुंतेविषयींहि मीं सांगत असतों कीं, अरे खड्डयांत पडून अथवा मारामारींत किंवा चाकू लागून नाहीं का अंगाचें कातडें अनेक वेळां खरचटत ? अवयवचे अवयव कापले जात ! तसेंच मूर्खपणाच्या खड्डयांत पडून किंवा आततायांच्या चाकूनें थोडें कातडें कापलें गेलें–सुंता झाली–म्हणून तुमचें हिंदु बीज, हिंदु रक्त, हिंदु मन, कसें मुसलमान होईल ? एक लहानसा कातड्याचा घाव लागला इतकेंच. मनानें हिंदुत्व ज्यानें सोडलें नाहीं तो हिंदूच आहे. तो भ्रष्टलाच नाहीं ! तसें मानणारी घातक समज त्याज्य आहे हें मीहि हजारों वेळां सांगत असतों. परंतु आपल्या जातिसंस्थेच्या पूर्वापार कल्पनेप्रमाणें जोंवर खाण्यापिण्यादिक दोषानें पतितत्व येतें ही भावना, समाजाची आणि त्या बलात्कारिक व्यक्तीची आहे तोंवर तिच्याच आधारानें तिचेंच निर्दालन करण्यासाठीं तशा स्ना-

ःकारित व्यक्तीस–तूं समाजांत परत स्थापला गेलास–हें दाखविण्यासाठीं एखादा संस्कार असला म्हणून तरी काय बिघडलें? त्यायोगें त्या व्यक्तीची आणि समाजाची दोषनिवारणाची भावनाही समाधान पावून, त्यांस आत्मप्रसन्नता लाभते. इतर कारणें सोडलीं तरी या एका कारणाकरितांहि एखादा संस्कार असल्यास हरकत काय?

गांधीजीः—मुळींच हरकत नाहीं. दोषांची भावना जाऊन त्या व्यक्तीला आत्मप्रसन्नता लाभण्यासाटीं असा संस्कार असला तरी चालेल.

सावरकरः—ठीक तर. तेव्हां शुद्धीच्या पायरीपर्यंत तर आपलं ऐकमत्य झालें; आतां मग पुढची कोणची पायरी आपणांस संमत नाहीं?

गांधीजीः—मला बलात्कारानें बाटविलों गेलों म्हणून समजणाऱ्या व्यक्तीची शुद्धि मान्य असली तरी तिच्यापुढें जाऊन जे पिढ्यान् पिढ्या त्या बाटलेल्या कुळांत उत्पन्न झालेले आहेत किंवा मूळचेच जे ख्रिश्चन वा मुसलमान आहेत, त्यांस जाऊन हिंदु करून घेणें हें संमत नाहीं.

सावरकरः—त्याचीं कारणें!

गांधीजीः—त्यायोगें "झंजट" म्हणजे कलह आणि झेंगटें वाढतात. मीं श्रद्धानंदांशीं याविषयीं पुष्कळ संवाद केला आहे. पण मला वाटतें कीं, हिंदुधर्म मला प्रिय आहे म्हणून मीं हिंदु रहावें म्हणजे झालें. मी दुसऱ्यास जावून 'तूं हिंदु हो' म्हणून सांगत सुटण्यांत मला कसेंसेंच वाटतें.

सावरकरः—प्रथम आपला किंवा माझा किंवा कोणत्याहि व्यक्तीचा प्रश्न बाजूस ठेवूं. सामान्यतः मी असें विचारतों कीं, जर एकादी गोष्ट सत्य आहे आणि ती गोष्ट म्हणजे इतकी महत्वाची आहे कीं, तीयोगें उभ्या मनुष्य जातीचें ऐहिकच नव्हे तर परालौकिक हितहि निश्चयानें साधणारें आहे, अशी एखाद्याची अविचल निष्ठा असेल तर त्या सत्याचा, त्या तत्त्वाचा, जगांत प्रसार करण्याचा त्यास अधिकार असलाच पाहिजे नाहीं का ? साधारण शास्त्रीय किंवा सामाजिक तत्वांचा प्रसार करण्याचा अधिकार, त्या तत्त्वाच्या सत्यावर ज्यांचा विश्वास आहे त्यांस न्यायतःच प्राप्त आहे असें जर आपण समजतों, जर खादी-सारख्या अगदीं व्यावहारिक गोष्टीहि आपणास समाजहितकारक वाटतांच, त्यांचें तें हितकारकत्व लोकांस पटवून देण्यासाठीं त्याचा प्रचार करीत हिंडणें आपणांस न्याय्य वाटतें, तर मग ज्यांची हिंदु धर्मावर आणि संस्कृतीवर इतकी निष्ठा असेल कीं, त्यांतील तत्वें हींच सत्य आहेत आणि त्यांतील तत्वज्ञान आणि संस्कृति यांनीं मनुष्य जातीचा ऐहिक आणि पारलौकिक उद्धार होणार आहे, तर त्यास तें सत्य प्रचार करण्याचा, अर्थातच न्याय्य मार्गानें आणि केवळ शांत बुद्धिवादानें प्रसृत करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. इतकेंच नव्हे तर, ज्या जनहितकारक सत्यावर निष्ठा आहे, तें सत्य लपवून न ठेवितां जनहितार्थ त्याचा प्रचार करणें, हा त्याचा नुसता अधिकार नसून तें कर्तव्यच आहे.

गांधीजीः—हें खरें आहे. परंतु हिंदुधर्माची शिकवणच अशी

आहे कीं, ' स्वधर्मे निधनं श्रेयः ' कोणालाही तूं अमुक धर्मात ये, हें न सांगतां त्याला वाटेल त्यानें वाटेल त्या धर्मात रहावें.

सावरकरः—होय, वाटेल त्यानें वाटेल त्या धर्मात रहावें. पण तें ' वाटणें ' अर्थातच निरनिराळ्या संस्कृतींच्या तुलनेवर अवलंबून असणार. हिंदुधर्म आणि संस्कृति, हींच मनुष्य जातीस कल्याणप्रद आहेत, अशी ज्यांची निष्ठा आहे, त्यांनीं हिंदुधर्मातील सत्य उपदेशावें हें जसें न्याय्य आहे, तसेंच तें स्वातंत्र्य इतर सर्व मतांसहि घेतां यावें हेंहि न्याय्यच आहे. मीं इतरांसहि तेंच स्वातंत्र्य आहे असें म्हणतों. याप्रमाणें निरनिराळ्या ऐहिक किंवा पारलौकिक हिताच्या साधनांविषयीं चर्चा होऊन मगच ज्याला त्याला आपआपल्या स्वभावानुरूप कोणतें तें साधन स्वीकारतां येईल. वाटेल त्यानें वाटेल तो साधनमार्ग स्वीकारावा ह्या मत-स्वातंत्र्याचा हा अर्थ आहे. आतां ह्याच उदाहरणावरून पहा कीं, हिंदुधर्मातील किंवा संस्कृतींतील हें उदारमतस्वातंत्र्याचें तत्व ज्यांस इतर संस्कृतींतील किंवा धर्ममतांतील दुराग्रही तत्वांहून अधिक न्याय्य असें मनःपूर्वक वाटतें, त्यानें त्या तत्वाचा म्हणजेच हिंदुसंस्कृतीचा प्रचार करणें, हें त्याचें जनहितदृष्टीनें कर्तव्यच आहे कीं नाहीं ? मुसलमानी कुराण मी अनेक वेळां भाष्यांसह वाचलें. आपणहि तें अवलोकन केलेलें आहे. बायबलचा मींहि अभ्यास केला आहे, आपणहि केलेला आहे. हिंदुधर्म तर आपणां दोघांचा धर्मच आहे. तेव्हां या आणि इतर धर्मांत आणि संस्कृतींत कांहीं महत्वाचा फरक आहे, हें आपणा उभयतांपुरतें तरी सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं. मग जर कोणाला त्या फर-

कांचा विचार करतां, हिंदुधर्म हाच सत्य आणि आत्मिक कल्याणाचा श्रेष्ठ मार्ग आहे असें प्रामाणिकपणें वाटलें तर त्यास, त्या सत्याचा उपदेश आणि प्रचार करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. आणि तो प्रचार करितांना दोन पिढ्यांचा धर्मग्रस्तच काय, पण अगदीं कधींहि हिंदु नसलेला मनुष्य जरी म्हणाला ' मला हिंदु धर्मांतील हें तुम्हीं उपदेशिलेलें सत्यच विश्वसनीय वाटत आहे; ' तर तें ग्रहण करण्याचा त्यालाहि अधिकार असला पाहिजे.

गांधीजी—असला पाहिजे खरें. मी देखील याच दृष्टीनें स्लेड बाई हिंदु आहेत, म्हणून काशीला सांगितलें होतें. आतां अडचण हीच कीं, धर्म हा बुद्धिगम्य विषय नसून भावनामय असल्यानें त्याचा प्रचार कसा करणार ?

सावरकरः—आपण बुद्धिगम्यतेविषयीं जें म्हणतां तें माझ्या धर्मविषयक विचारांशीं जुळत आहे. परंतु धर्माच्या ज्या अंगाविषयीं मीं बोलत आहें, तो केवळ भावनामय असणाऱ्या भागाविषयीं नसून त्याचा जो बुद्धिगम्य भाग आहे त्याविषयीं होय. माझीं धर्ममतें तरी मीं केवळ बुद्धिगम्य सिद्धांतांवर उभारलेलीं असून, तीं इतकीं भावनानिरपेक्ष आहेत कीं तीं ऐकून आपणहि चमकून उठाल. पण तो विषय बाजूस ठेवून, मी इतकेंच म्हणतों कीं, हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान बुद्धिगम्यच आहे आणि हिंदुधर्माचा एक व्यावहारिक धर्म म्हणूनहि भाग आहे, त्यास मघां मीं हिंदु संस्कृति म्हणून म्हटलें. इतर धर्मांचेहि असे भाग असून अशाच संस्कृतिहि आहेत. त्या संस्कृतींमध्यें आणि बुद्धिगम्य तत्वज्ञानामध्यें हिंदु संस्कृति आणि तत्वज्ञान हेंच श्रेष्ठ

होय, अशी जर कोणाची अव्यभिचारी निष्ठा असली तर तें सत्य प्रचार करण्याचा त्याला किंवा तसा उपदेश ऐकून ज्याला तें सत्य पटेल त्याला तें स्वीकारण्याचा अधिकार असलाच पाहिजे, नाहीं काय ? मग तो कितीहि पिढया कोणत्याहि धर्मांत कां राहिलेला असेना ?

गांधीजी:—अर्थात्, तो अधिकार प्रत्येकास असला पाहिजे.

सावरकर:—ठीक तर, हें तरी पक्कें ना ? तर मग मी तरी निदान शुद्धीच्या कार्याची हीच रूपरेखा मानीत असल्यानें या कार्यांत आपलें आणि माझें अर्थात्च ऐकमत्य—इतक्यापुरतें तरी आहेच आहे. उत्तम झालें. आतां मघां आपण झंझाटाचा—कलहाचा प्रश्न काढिला होता. मीं प्रथम तो टाळला; पण आतां तत्वाचा प्रश्न सुटल्यानें विचारतों कीं, सत्य प्रतिपादन करणें हें प्रत्येकाचें इतकें उत्कट कर्तव्य आहे कीं, तें अपरिहार्य कलहास किंवा झंगटास भिऊन सोडून देणें हें कधींहि योग्य होणार नाहीं. नव्हे काय ? सदिच्छेनेंच कां होईना पण मला प्रथमपासूनच ही शंका येत असे कीं आपण शुद्धीस जे अंगाबाहेर टाकतां तें कलह नको, याच भीतीनें होय. इतर निमित्तें हीं केवळ आनुषंगिक साह्य देण्यापुरतीच असतात. परंतु महात्माजी, सत्यप्रतिपादनास झंगटासाठीं विन्मुख होणें हें गर्हणीय आहे हें आपणासारख्या सत्याग्रहाच्या पुरस्कर्त्यास तरी सांगावयास नको आहे. आपलें आयुष्यच आपणास वाटत असणारीं सत्यें उपदेशितांना कराव्या लागणाऱ्या युद्धांतच गेलें ! हिंदुधर्म आणि संस्कृति सत्य आहे अशी ज्यांची निष्ठा आहे, त्यांनीं असत्याशीं अपरिहार्य असा झगडा करूनहि सत्याचा प्रचार केलाच पाहिजे. ' स्वधर्मे

3450



निधनं श्रेयः " अशी आपण हिंदुधर्माची आज्ञा सांगितलीत. पण हिंदुधर्माची स्वतःपुरती ती स्थितिशील आज्ञा जशी आहे तशीच समाजासाठीं गतिशील आज्ञाहि आहेच. ' विश्वमार्य कुर्वन ' ही वेदांचीच गर्जना आहे ! सत्यपालन तर करच, पण सत्यप्रचारहि कर ! मग संकटें येवोत वा न येवोत. " खादीसारख्या व्यावहारिक चळवळीहि आपण झंझाटासाठीं सोडीत नाहीं. आपलें आयुष्य युद्ध करण्यांतच गेलें: ( हंसून ) ह्या शब्दास हिंसेचा तर वास येत नाहींना !

गांधीजी:—( हंसून ) मला एकदां कलकत्त्यास एकानें म्हटलें, 'तुम्ही रेव्होल्यूशनिस्ट आहां.' तेव्हां मीं म्हटलें, ' होय, मी एव्होल्यूशनिस्ट रेव्होल्यूशनरी आहेंच. '

सावरकर:—पण मींहि तसाच नाहींका ? What is a revolution ? it is but a step in the process of evolution itself. Revolution is but evolution in leaps.


गांधीजी:—आपण युद्ध म्हटलेंत हें ठीकच होतें. सत्याग्रहही एक युद्धच नाहीं का ?

सावरकर:—अर्थात् आणि म्हणूनच सत्याचे प्रचारासाठीं वेळ पडली तर विरोधासहि तोंड दिलेंच पाहिजे.

गांधीजी:—याविषयीं मला आपल्याशीं पुष्कळ बोलावयाचें आहे. आपलें उभयतांचेंहि ध्येय एकच आहे. आपल्या हिंदुस्थानच्या आणि हिंदुधर्माच्या गौरवार्थ आपण दोघेहि झटत आहोंत. × × × ×

---

# टिळक; खरे आणि कंपनी.




वॅाचमेकर्स, नं. १९६ काळ्बादेवी रोड, मुंबई नं. २ चांदीची पट्याची उत्तम रु. १७ ते २२. नं. २ मेटल मध्यम आकार सुबक व टिकाऊ रु. ११ ते १७॥ नं. ३ अमेरिकन अलार्म टाईमपीस ५ ते १५ ठोकेसह. बिगदेन ८ रु. नं. ४ अमेरिकन फॅन्सी कॅन्सिको ८ दि. क्लॉकें फार वर्षे चालणारीं २० ते २३ रु. अलार्मसह नं. ५, वेस्टेंड व झेनिथवर भरपूर कमिशन मिळेल. नं. ६ नांवाचीं घड्याळें रिस्ट व पॉकेट २० पासून ३२ पर्यंत मिळतील ( रिपेअरींग कामें उत्तम व लवकर मिळतील. ) ८१ आ. कॅटलॉग मागवा.

---

## अगदीं फुकट.

### घड्याळें आणि टाईमपीस.

### केशवर्धक हेअर ऑईल.

हें तेल केशाची वृद्धी करून केश मऊ आणि गुळगुळीत होतात, सुगंध इतका मधुर आणि टिकणारा आहे कीं, वापरून मनाला आनंद वाटेल. किं. बाटली. आणे १२. ६ शी शी घेणारास रासकोप १२ वर रिष्टवाच.

### दद्रुविनाशक

गजकर्ण खरूजवर रामबाण मलम आपले त्वरित गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकिटें मिळालेलीं आहेत. किंमत ४ आणे.

१२ डब्यांवर टाईमपीस, २४ वर रासकोप, ३६ वर रिष्टवॉच फुकट.

**किंग जार्ज कारोनेशन कंपनी, मुंबई नं. ४.**

# "सब घोडे बारा टक्के"




( रजिस्टर्ड )

नव्हेत. तसे, बाम झाले म्हणून सर्व सारखे नव्हेत. कफ, थंडी, मस्तक-दुखी, संधिवात, मुरगळा वगैरे वेदना अचुक नाहींशा करणारा म्हणून सर्वतो-मुखी झालेला.

## अमृतांजन पेन बाम

कोणीकडे व रंगासारखा रंग अगर बाटलीसारखी बाटली असणारे नकली बामें कोणीकडे ? तरी घेणारांनीं घेतांना अमृतांजनच पाहून घ्यावें. किं. १० आणे ट. ख. नि. सर्वत्र मिळतें.

# अमृतांजन डेपो

## मुंबई व मद्रास

# सालाची बेगमीची

## घडोती पातळें व लुगडीं

### रंग पक्का लांबी १७॥×२॥।

पदर रेशमी

| | | रु. आ. |
|---|---|---|
| सूत नं. ४० पटीकिनार पातळ | ... ... | ६—४ |
| ,, ,, ,, रुइफुली ,, | ... ... | ७—० |
| ,, ,, ६० ,, ,, | ... ... | ८—० |
| ,, ,, ,, चमेली ,, | ... ... | ९—० |
| ,, ,, ,, बकुळ ,, | ... ... | ९—० |
| ,, ,, ,, जरी रुइफूल | ... ... | १०—८ |
| ,, ,, ४० सुती महेश्वर काठ | ... ... | ६—४ |

**जोडी मागें ०८ सवलत. ट. ख. माफ.**

**जरी मोठे काठ लुगडीं, मरसराईज पोताची लुगडीं तयार आहेत. तसेच खण**

कॅटलाग मागवा

**जोशी ब्रदर्स-झांशी**

# बी. ए. तारकर यांचीं

## भांडी कां वापरावीं ?

दिसण्यांत सुबक, वापरण्यांत टिकाऊ, अखंड, उत्कृष्ट पॉलीस, चोख शुद्ध कलई, इ. अनेक गुणांनीं परिपूर्ण.

## मग तीं वापरतांना स्वस्त कां पडूं नयेत ?

गरीबांच्या व श्रीमंताच्या गृहसंसारास सारखींच शोभविणारीं

खरीदते वेळीं "ॐ" छाप ट्रेडमार्क पाहूनच खरेदी करा.

व्यापाऱ्यांस वि. सवलत. माहितीकरितां १ आण्याचें तिकीट पाठवून क्याटलॉग मागवा.

तांबा, पितळ, जर्मनसिल्व्हर व चांदीचीं
उत्कृष्ट भांडीं बनविणार.

**शाखा** { लालबाग-परेल नं. १२,
गिरगांव ट्राम नाका नं. ४ }

बी. ए. तारकर,
हेड ऑफीस—५२०
कांसार चाळ, मुंबई नं. २

## आपल्या विहीरीवर पंप बसवितांना

# किर्लोस्कर पंपाचीच योजना करा !

सर्व प्रकारचे किर्लोस्कर हात पंप, पॉवर पंप, स्प्रे पंप वगैरे सर्व प्रकारचे पंप आमचेकडे तयार आहेत. तसेंच—

किर्लोस्कर पंप



आजच मागवा.

किर्लोस्कर नांगर, चरक, स्प्रिंग कॉटस्, खुर्च्या, स्टुलें, अमेरिकन हातानें दळण्याचीं यंत्रें, वगैरे मांल आमचेकडे मिळतो.

कॅटलॉग मागवा:—

**के. वी. जोशी आणि कं. ( पंपवाले )**

**सोल एजंट:—किर्लोस्कर पंप.**

३२१, हॉर्न्बी रोड, फोर्ट, पो. बॉ. नं. ५३४, मुंबई.

## शास्त्रोक्त, स्वादिष्ट व पाचक

# शशांक द्राक्षासव

याचे सेवनानें अजीर्ण, अपचन, अग्निमांद्य, मलावरोध, मूळ संग्रहणी, जीर्णज्वर, खोकला, धातुविकार इत्यादि विकार साफ बरे होतात; लहान मुलांचे डांग्या खोकल्यावर तर हें अप्रतिम आहे. रात्रीं जेवल्यानंतर **शशांक द्राक्षासव** घेतलें असतां अन्न पचन होऊन मलशोधन चांगलें होतें. हें पौष्टिक असल्यामुळें अशक्त मनुष्यांनीं नेहमीं घ्यावें. हें सर्व ऋतूंत सारखेंच गुणकारी असल्यामुळें केव्हांही घेण्यास हरकत नाहीं. मोठी बा० किं० १८१२ लहान बा० किं० ८१२

'**शशांक द्राक्षासव**' व इतर औषधें विकण्याकरितां सर्वत्र एजंट पाहिजेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं पत्रव्यवहार करावा.


## शशांक आयुर्वेदिक फार्मसी

**मुंबई नं. ४.**

# केव्हांही स्टोव्ह घेतांना,

# " लॅक्स ".

## मेकरचा स्टोव्ह घ्या.




कारण, हे स्टोव्ह फार मजबूत असून टिकाऊपणामध्यें सर्वांत उत्तम आहेत. ह्यामुळें आक्सीडेंट होण्याची मुळींच भीती नाहीं किंमतीही फारच स्वस्त आहेत. कॅटलॉग मागवा.

लॅक्स नं. १ किं. रु. ५॥-

सोल एजंट

**डी. आर. वागळे, लक्स स्टोव्ह डेपो.**

गिरगांव--मुंबई.


REFBK-0003560

# लक्ष्मी वैभव प्रेस व बुकडेपं

## बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

### प्रार्थना समाजसमोर, गिरगांव मुंबई.

आमच्याकडे सर्व तऱ्हेचीं मराठी, इंग्रजी, व गुजराथी, शालोपयोगी पुस्तकें, धर्मग्रंथ, पोथ्या, स्तोत्रें, नाटकें, कादंबऱ्या, एक्सरसाईजेस [ वह्या ], कॉपी बुकें, ड्रॉइंग बुकें, वगैरे जिन्नस मिळतात.

---

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे !

## दागिने

खमीस बटणें रु. ३, चंद्रहार-रु. ५, सरी रु. ५ ठुशी रु. ८, वज्रटीका रु. ५, नथ मोत्याची रु. ६ आंगठी रु. १, पाटल्या जोडी रु. २॥, गोटजोडी रु. ३ बांगड्या जोडी रु. २॥, सल्ले जोडी रु. २, कुडीमोत्याच रु. ३, वड्याळाचा छडा रु. ३.

### केंस काळे करण्याचा साबण.

केंस काळे होऊन कायम राहतात. तीन वड्यांचें बॉक्स रु. १॥.

**मगनलाल के. गिरगांव, मुंबई**